सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, दि. १२ सप्टेंबर २०२५ | वर्ष - तिसरे | अंक १५९ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## शिवाजीनगरचं नाव सेंट मेरी करण्याचा काँग्रेसचा प्रस्ताव

मुंबई : शिवाजीनगरचं नाव सेंट मेरी स्टेशन करण्याचा प्रस्ताव काँग्रेसने सादर केला आहे. काँग्रेसच्या या प्रस्तावावर भाजपने सडकून टीका केली आहे. बंगळुरू शहरातल्या शिवाजीनगर मेट्रो स्टेशनचे नामांतर करण्याचा प्रस्ताव कर्नाटक काँग्रेसने सादर केला आहे. शिवाजीनगरचं नाव सेंट मेरी स्टेशन करावं असा प्रस्ताव कर्नाटक काँग्रेसने सादर केला आहे. कर्नाटक काँग्रेसच्या या प्रस्तावावर भाजपने टीका केली आहे.

## जगातील पहिले महिला नौकायन अभियान मुंबईत



मुंबई: ११ सप्टेंबर २०२५ रोजी इतिहासाची नोंद झाली, जेव्हा जगातील पहिले त्रि-सेवा सर्व-महिला नौकायन अभियान, समुद्र प्रदक्षिणा, ला प्रतिष्ठित गेटवे ऑफ इंडियामधून हिरवा झेंडा दाखवण्यात आला. एका आभासी समारंभात, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी या अभियानाला महिला सक्षमीकरण, भारतीय सशस्त्र दलांची एकता आणि देशाच्या आत्मनिर्भर भावनेचे एक शक्तिशाली प्रतीक म्हणून गौरविले. पुढील नऊ महिन्यांत, लष्कर, नौदल आणि वायुसेनेच्या दहा महिला अधिकाऱ्यांचे पथक जगभरात २६,००० नॉटिकल मैलांचा प्रवास करेल. त्या स्वदेशी बनावटीच्या ५०-फूट जहाजावर, 'आयएएसव्ही त्रिवेणी'वर प्रवास करणार आहेत. त्यांचा प्रवास सर्व प्रमुख महासागरांना पार करून, दोनदा विषुववृत्त ओलांडून, आणि जगातील सर्वात आव्हानात्मक पाण्यासाठी ओळखले जाणारे तीन मोठे केप्स - लीउविन, हॉर्न आणि गुड होप - पार करून जाईल.

## सोलापूर जिल्ह्यात अतिवृष्टी, अनेक घरांमध्ये घुसले पाणी

सोलापूर : लवकरच परतीचा पाऊस सुरू होईल असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. पण राज्यातील काही भागांमध्ये पाऊस धुमाकूळ घालत आहे. सोलापूर जिल्ह्यात २४ तासांत झालेल्या अतिवृष्टीमुळे सखल भागांमध्ये पाणी साचले आहे. अनेक घरांमध्ये गटाराचे पाणी घुसले आहे. रात्रभर विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसामुळे सोलापूर जिल्ह्यात वाताहात झाली आहे. अनेक ठिकाणी पूरसदृश्य स्थिती निर्माण झाली आहे. हवामान विभागाने सोलापूर जिल्ह्याला २४ तासांसाठी रेड अलर्ट दिला होता. जिल्ह्यात २४ तासांत ११८.३ मिमी पावसाची नोंद झाली. सोलापूर शहरासह अक्कलकोट तालुक्यातील सांगवी खुर्द, सांगवी बुद्रुक, चपाळगाव, चुंगी या गावांमध्ये रात्रभर मुसळधार पावसाची नोंद झाली. जोरदार पावसामुळे जिल्ह्यातील सर्व नदी, नाले, ओढे ओसंडून वाहू लागले.

# सरकारी सेवा अन् योजनांचं काम व्हॉट्अपवरुन

## आपलं सरकारचं दुसरं व्हर्जन येतय; मुख्यमंत्र्यांचा निर्णय

मुंबई : मी पहिल्यांदा मुख्यमंत्री झालो तेव्हा सेवा हमी कायदा केला होता, याची आपल्याला कल्पना आहे. आता आपले सरकारचे व्हर्जन जुने झाले असून आपण समग्र नावाच्या संस्थेशी करार केला आहे. त्यानुसार, नागरिकांना कोणत्या योजनांची निकड आहे, याचा अभ्यास केला आहे. आता आपण डिजिटाइज पद्धतीनं सेवा देण्याचा प्रयत्न करणार आहोत. लोकांकडून जी मागणी येते, त्यात सेवा आणि योजनांची मागणी येते. त्यामुळे, डिजिटाइज पद्धतीने सेवा देण्याचं काम सरकार सुरू करत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. तसेच, नागरिकांना आता व्हॉट्सअपवर सेवा मिळणार आहेत, त्यामध्ये २०० सेवा आणि योजना २६ जानेवारीपर्यंत नागरिकांना डिजिटाइज पद्धतीने मिळण्यास सुरुवात होणार आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी म्हटले.

राज्यात सेवा आणि सुविधांसंदर्भातील डिजिटाइज पद्धतीचा पहिला टप्पा २६ नोव्हेंबरपर्यंत पूर्ण होईल. तर, २०० सेवा आणि योजना २६ जानेवारीपर्यंत आणि संपूर्ण सेवा १ मे पर्यंत पूर्ण करण्यात येतील, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी पत्रकारांशी बोलताना दिली. सरकारकडील रेकॉर्ड वरुनच आपण माहिती भरणार आहोत. त्यामुळे, आपले सरकारचं हे दुसरं व्हर्जन येत आहे. त्यामध्ये, ४ टप्पे असतील, त्यामुळे नागरिकांना केलेला अर्ज सध्या कुठे आहे? हेही पाहाता येणार आहे. लोकांना डिजिटल सेवा मिळणं आणि प्रेडेक्टिबल होणार, व्हॉट्सपवर देखील सेवा उपलब्ध करुन देणार आहोत, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. त्यामुळे, शासन दरबारी मारावे लागणारे खेटे कमी होतील, असेच दिसून येत आहे.



महाराष्ट्रातील गुंतवणूक १ लाख ५०० हजार कोटी

महाराष्ट्रातील गुंतवणुकीत आपण जी आघाडी घेतली आहे, ती पुन्हा एकदा १ लाख ५०० हजार कोटींवर गेली असून याचे करार झाले आहेत. त्यामुळे, आज याचा आनंद वाटतो आहे, ज्यातून ४७ हजार जणांना रोजगार मिळेल. डेटा सेंटरची उभारणी रायगडमध्ये होईल, नाशिकमध्ये नंदूरबारमध्ये २१०० कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे, ज्यातून ६०० लोकांना रोजगार मिळेल. विदर्भात रिलायन्स फूड पार्क आणि शीतपेय पार्क तयार करणार आहोत. तिथे १५०० कोटींची गुंतवणूक करणार आहोत. अदानींची देखील ७० हजार कोटींची गुंतवणूक असणार आहे, असे म्हणत राज्यातील उद्योजकीय गुंतवणुकीवर मुख्यमंत्र्यांनी समाधान व्यक्त केलं आहे. कर्नाटकातील शिवाजीनगर मेट्रो स्टेशनच्या नामांतवरुन बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काँग्रेसला लक्ष्य केलं. शिवाजी नगर मेट्रो स्टेशनचे नाव सेंट मेरी स्टेशन करण्याचा मी निषेध करतो. कर्नाटक सरकार शिवाजी महाराजांचा अपमान करत आहे. पण, शिवाजी महाराजांना अपमानित करण्याची परंपरा ही काँग्रेसमध्ये जवाहरलाल नेहरु हे पंतप्रधान असण्यापासून आहे, असा इतिहास देवेंद्र फडणवीस यांनी सांगितला. तसेच, डिसकव्हरी ऑफ इंडिया हे पुस्तक पंडित जवाहरलाल नेहरुंनी लिहिलं होतं, त्यामध्ये त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांबद्दलचे जे मत व्यक्त केलं होत, हे आपल्याला माहिती आहे. काँग्रेसच्या सरकारमध्ये सातत्याने तीच परंपर दिसत आहे. ईश्वराने काँग्रेसच्या मुख्यमंत्र्यांना सुबुद्धी द्यावी. धार्मिक विरोधी व्यवस्था उभी करत ते तेढ निर्माण करणार नाहीत ही माझी अपेक्षा आहे, असेही फडणवीसांनी म्हटले.

# मॉरिशससोबत स्थानिक चलनात होणार व्यापार

नवी दिल्ली : आंतरराष्ट्रीय व्यापार, प्रामुख्याने तेलाशी संबंधित व्यापार अमेरिकन डॉलरमध्ये होत होता. पण भारताने मित्र देशांशी स्थानिक चलनात व्यापार करण्याचे करार केले आहेत. या करारांमुळे भारत आणि भागीदार देश आपापसांत चलनाचा विनिमय दर ठरवून त्याआधारे व्यापार करतात. डॉलरचा विचार केला जात नाही तसेच डॉलरचा वापर कटाक्षाने टाळला जातो. यामुळे दोन्ही देशांना व्यापारातून फायदा होतो. भारताने गुरुवारी ११ सप्टेंबर रोजी मॉरिशससोबत स्थानिक चलनात व्यापार करण्याचा करार केला. या करारामुळे भारत आणि मॉरिशस यांच्यातील व्यापारावरील अमेरिकन डॉलरचे वर्चस्व संपणार आहे.

भारत आणि मॉरिशसच्या नेत्यांनी द्विपक्षीय बैठकीत अनेक मुद्द्यांवर सविस्तर चर्चा केली. महत्त्वाच्या विषयांवर सहकार्यासाठी करार झाले. अनेक कागदपत्रांची देवाणघेवाण झाली. पंतप्रधान मोदी म्हणाले,



'आम्ही चागोस मरीन प्रोटेक्टेड एरिया, एसएसआर आंतरराष्ट्रीय विमानतळाचा एटीसी टॉवर आणि महामार्ग आणि रिंग रोडचा विस्तार या प्रकल्पांवर वेगाने काम करू. हे पॅकेज केवळ मदत नाही तर आमच्या सामायिक भविष्यातील गुंतवणूक आहे. गेल्या वर्षी मॉरिशसमध्ये यूपीआय आणि रुपे कार्ड लॉंच करण्यात आले होते. आता आम्ही स्थानिक चलनात व्यापार सक्षम करण्यासाठी काम करू.' भारत आणि मॉरिशस हे केवळ भागीदार नाहीत तर कुटुंब आहेत. मॉरिशस हा भारताच्या 'नेबरहूड फर्स्ट' धोरणाचा आणि 'व्हिजन ओशन'चा एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे; असेही पंतप्रधान मोदी म्हणाले.

भारताने देशाबाहेरील पहिले जनऔषधी केंद्र मॉरिशसमध्ये स्थापन केले. लवकरच मॉरिशसमध्ये भारत आयुष सेंटर ऑफ एक्सलन्स हे ५०० खाटांचे सर सीवूसागुर रामगुलाम राष्ट्रीय रुग्णालय (एसएसआरएन) आणि पशुवैद्यकीय शाळा आणि प्राणी रुग्णालय या प्रकल्पात सहभागी होणार आहे. मॉरिशसच्या पायाभूत आणि आरोग्य सुविधा मजबूत करण्यासाठी भारत महत्त्वाचे योगदान देत आहे.

# ऑगस्ट महिन्याचा हफ्ता १५०० लाडक्या बहिणींच्या बँक खात्यात

मुंबई : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या ऑगस्ट महिन्याच्या हप्त्याची प्रतीक्षा अखेर संपली आहे. आतापर्यंत लाडक्या बहिणींना एकूण १३ हप्त्यांचे पैसे मिळाले असून ऑगस्ट महिन्याच्या हप्त्याच्या वितरणासंदर्भात नवी अपडेट समोर आली आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील सर्व पात्र महिलांना आजपासून ऑगस्ट महिन्याचा सन्मान निधी वितरित करण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे. या योजनेअंतर्गत प्रत्येक पात्र लाभार्थ्याच्या बँक खात्यात थेट निधी जमा केला जातो, ज्यामुळे महिला सक्षमीकरणाच्या दिशेने एक मोठा टप्पा गाठला जात असल्याचं महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांनी माध्यमावर पोस्ट टाकत सांगितले.



महायुती सरकारसाठी गेमचेंजर ठरलेली माझी लाडकी बहीण योजना सुरू राहणार की बंद करणार अशी चर्चा गेल्या काही महिन्यांपासून सुरू आहे . दरम्यान, आतापर्यंत १३ हफ्त्यांची रक्कम पात्र महिलांच्या खात्यात वर्ग करण्यात आली आहे . १४ वा हफ्ता मिळण्यास आजपासून सुरुवात झाली आहे .

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या सर्व पात्र लाभार्थ्यांना ऑगस्ट महिन्याचा सन्मान निधी वितरित करण्याच्या प्रक्रियेस आज पासून सुरुवात होत आहे. महाराष्ट्रातील माता-भगिनींच्या अखंड विश्वासाने सुरू असलेली सक्षमीकरणाची ही क्रांती यशस्वीरित्या मार्गक्रमण करत आहे. लवकरच या योजनेतील सर्व पात्र लाभार्थ्यांच्या आधार संलग्रित बँक खात्यात सन्मान निधी वितरित होणार आहे. असेही महिला व बालकल्याणमंत्री अदिती तटकरे यांनी माध्यमावर सांगितलं.

# नेपाळमधून १५,००० कैदी फरार! भारत-नेपाळ सीमेवर तणावाचं वातावरण

नेपाळ : नेपाळमध्ये गेल्या चार दिवसांपासून भीषण अशांतता आणि हिंसाचार सुरू आहे. सरकारने अचानक काही लोकप्रिय सोशल मीडिया साइट्सवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला आणि त्यानंतर देशभरात तीव्र आंदोलन पेटलं. या निर्णयाचा निषेध करत असंख्य नागरिक रस्त्यावर उतरले. सुरुवातीला शांततेत सुरू झालेलं आंदोलन लवकरच हिंसक बनलं. आंदोलकांनी संतापाच्या भरात नेपाळचं संसद भवन पेटवून दिलं. एवढ्यावरच न थांबता, अनेक मंत्र्यांच्या घरांवरही हल्ले करण्यात आले. या हिंसक घटनांमध्ये मोठ्या प्रमाणावर जीवितहानी आणि आर्थिक तोटा झाल्याचं वृत्त आहे. राजधानीसह इतर अनेक भागात कडक सुरक्षा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. दरम्यान, आंदोलन उग्र होत असतानाच नेपाळमधून आणखी एक मोठी आणि धक्कादायक बातमी समोर आली असून त्यामुळे तणावाचं वातावरण अधिकच गंभीर झालं आहे.

१५ हजार कैदी जेलमधून फरार

नेपाळमध्ये उफाळलेल्या हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर आता एक धक्कादायक घटना समोर आली आहे. सुरू असलेल्या गोंधळाचा फायदा घेत विविध जेलमधून तब्बल १५ हजार कैदी फरार झाल्याची माहिती समोर आली आहे. या कैद्यांच्या शोधमोहीमेसाठी भारत-नेपाळ सीमेवर कडक सुरक्षा तैनात करण्यात आली आहे. आतापर्यंत सशस्त्र सीमा दलाने (डड्ड) सीमेवरून ६० कैद्यांना पुन्हा पकडलं असून त्यांना सीमेवरील चौक्यांवर ठेवण्यात आलं आहे. फरार झालेल्या कैद्यांपैकी काही जण भारतातही शिरले असल्याचं वृत्त आहे. त्यापैकी २२ कैदी उत्तर प्रदेशात, १० कैदी बिहारमध्ये आणि ३ कैदी पश्चिम बंगालमध्ये अटककरण्यात आले आहेत. मोठ्या प्रमाणावर सुरू असलेली ही कारवाई सीमेवरील तणाव आणि भीती वाढवणारी ठरत आहे. नेपाळमधील अस्थिरतेचा फायदा घेऊन हे कैदी सुटले असून त्यांना नियंत्रणात आणणं हे दोन्ही देशांसमोर मोठं आव्हान बनलं आहे.

SSB ची मोठी कारवाई!

अधिकाऱ्यांकडून मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या दोन दिवसांत सशस्त्र सीमा दलाच्या (डड्ड) जवानांनी उत्तर प्रदेश, बिहार आणि पश्चिम बंगालच्या सीमावर्ती भागात मोठी कारवाई केली आहे. या कारवाईदरम्यान तब्बल ६० फरार कैद्यांना पकडण्यात यश आलं आहे. पकडण्यात आलेले सर्व कैदी संबंधित राज्यांच्या पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असून, त्यांची चौकशी सुरू आहे. प्राथमिक चौकशीत काही धक्कादायक माहितीही समोर आली आहे. अटक केलेल्या कैद्यांपैकी २ ते ३ जणांनी स्वतः ला भारतीय नागरिक असल्याचा दावा केला आहे. या दाव्याची सत्यता पडताळून पाहण्यासाठी स्वतंत्र चौकशी सुरू असल्याचं अधिकाऱ्यांनी स्पष्ट केलं आहे. सीमेवर सुरू असलेली ही मोहीम नेपाळमधून फरार झालेल्या कैद्यांचा माग काढण्यासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

भारतात हाय अलर्ट

नेपाळमध्ये सोशल मीडिया साइट्सवर बंदी आणण्याच्या

# नांदेड जिल्हा परिषद सीईओंना अश्लील अन् धमकीचा मेसेज; प्रशासन अधिकाऱ्याचे तात्काळ निलंबन

नांदेड : नोकरी हे काचेचं भांड असतं, त्यामुळे नोकरीत जपून वागावं असं म्हणतात, त्यात सरकारी नोकरी असल्यावर जास्त काळजी घ्यावी लागते. मात्र, नांदेड जिल्हा परिषदेतील एका प्रशासन अधिकाऱ्यास आपले वर्तन भोवले असून मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी त्यांचे निलंबन केले आहे. परिषदेतील दुसऱ्या विभागात आपली बदली केल्याच्या रागातून जिल्हा परिषदेच्या कनिष्ठ प्रशासन अधिकाऱ्याने रात्री २ वाजता महिला मुख्य कार्यकारी




अधिकाऱ्याच्या मोबाईलवर आणि विभाग प्रमुखांच्या व्हाट्सअप ग्रुपवर अश्लील आणि धमकी देणारा मेसेज पाठवला. रात्री २ वाजता हा प्रताप करणाऱ्या अधिकाऱ्याला निलंबित करण्यात आले आहे. आनंद सावंत असे या अधिकाऱ्याचे नाव असून या घटनेनं नांदेड जिल्हा प्रशासनात एकच खळबळ उडाली आहे.

आनंद सावंत हा नांदेड जिल्हा परिषदेत कनिष्ठ प्रशासन अधिकारी म्हणून कार्यरत होता. त्याची बदली दुसऱ्या विभागात करण्यात आली होती. दुसऱ्या विभागात बदली केल्याच्या रागातून रात्री २ वाजता सावंत याने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या मोबाईलवर व्हाट्सअप मेसेज पाठवला. राजकीय भाष्य करून असभ्य आणि अश्लील भाषेत धमकीचा मेसेज केला. विभाग प्रमुखांच्या ग्रुपवरही सावंत याने हा मेसेज केला होता. त्यामुळे, या कृत्याची गंभीर दखल घेत मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी आनंद सावंत याचे निलंबन केले आहे.

## बीडमध्ये २३ दिवसांत तीन सरकारी अधिकाऱ्यांचा मृत्यू; आता विस्तार अधिकाऱ्याने संपवले जीवन

परळी: शहरातील शिवाजीनगर परिसरात बीड पंचायत समितीत कार्यरत असलेल्या एका विस्तार अधिकाऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना गुरुवार, दि. ११ सप्टेंबर रोजी सकाळच्या सुमारास उघडकीस आली. दरम्यान, मागील २३ दिवसांत बीड जिल्ह्यात वकील, डॉक्टरनंतर आता विस्तार अधिकारी अशा तीन सरकारी अधिकाऱ्यांनी जीवन संपवल्याच्या घटना घडल्याने खळबळ उडाली आहे.

मृत विस्तार अधिकाऱ्याचे नाव विलास डोंगरे असे असून ते परळी वैजनाथ येथील शिवाजीनगर भागात वास्तव्यास होते. आत्महत्येचे कारण मात्र अद्याप समजू शकलेले नाही.



डोंगरे यांच्या पश्चात आई, पत्नी, भाऊ व तीन मुली असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांनी परळी पंचायत समितीच्या कार्यक्षेत्रातील धर्मापुरी, सिरसाळा, कन्हेवाडी यांसह अनेक गावांमध्ये ग्रामविकास अधिकारी म्हणून उल्लेखनीय कार्य केले होते. घटनास्थळी संभाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे यांनी भेट दिली आहे.

सरकारी वकील विनायक लिंबाजी चंदेल (वय ४७, रा. इंदेवाडी, जि. परभणी) यांनी २० ऑगस्ट रोजी वडवणी न्यायालयातच गळफास घेऊन आत्महत्या केली होती. याप्रकरणात दोन दिवसानंतर एका न्यायाधीशावर आणि लिपीकावर गुन्हा दाखल आहे.

# रशियन सरकार १० लाख भारतीयांना देणार नोकऱ्या; 'हिंदी'ची वाढतेय लोकप्रियता!

मुंबई : रशियातील विद्यापीठांमध्ये हिंदी भाषेची लोकप्रियता झपाट्याने वाढत असल्याने, विज्ञान व उच्च शिक्षण विभागाचे उपमंत्री कॉन्स्टंटिन मोगिलेवस्की यांनी यावर भर दिला. भारत जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश झाल्याने हिंदीचा वापर वाढला आहे. रशियन बातम्या एजन्सी तासला दिलेल्या मुलाखतीत मोगिलेवस्की म्हणाले, आम्हाला जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी हिंदी शिकावी अशी अपेक्षा आहे. भारतीय दैनंदिन जीवनात इंग्रजीऐवजी हिंदीचा प्राधान्याने वापर होत असल्याने याचा फायदा घेणे आवश्यक आहे. हिंदी शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत असून, हिंदी बोलणारे गट दोन ते तीन पट वाढले असल्याचेही ते म्हणाले.

कोणत्या विद्यापीठांमध्ये हिंदी शिकवली जाते?

मॉस्कोतील संस्थांपुरती मर्यादित नसून, सेंट पीटर्सबर्ग व कझान येथील विद्यापीठांमध्येही हिंदीचा अभ्यासक्रम आहे. मॉस्को स्टेट इंटरनॅशनल रिलेशन्स इन्स्टिट्यूट (एमजीआयएमओ), मॉस्को स्टेट युनिव्हर्सिटी व मॉस्को स्टेट लिंग्विस्टिक युनिव्हर्सिटी यांसारख्या ठिकाणी हिंदी शिकवली जाते. येथे प्रवेश अर्ज दोन ते तीन पट वाढले आहेत. तसेच, रशियन स्टेट युनिव्हर्सिटी फॉर ह्युमॅनिटीज (आरएसयूएच) मध्येही हिंदीचा कोर्स उपलब्ध आहे. हे बदल भारत-रशिया संबंध मजबूत करत आहेत.

रूस भारतीयांसाठी लोकप्रिय

रूस भारतीयांसाठी लोकप्रिय ठिकाण ठरले असून, व्यापार व शिक्षणासाठी लाखो भारतीय येतात. भारतीय दूतावासानुसार, रशियात १४ हजारांहून अधिक भारतीय वास्तव्य करतात, ज्यात ५०० व्यावसायिक (२०० मॉस्कोत) व हजारो एमबीबीएस विद्यार्थी समाविष्ट आहेत. हे सर्व हिंदीचा दैनिक वापर करतात, ज्यामुळे स्थानिक रशियन हिंदी शिकण्यास उत्सुक झाले आहेत. भू-राजकीय आव्हानांमध्याही दोन्ही देश एकत्र आहेत. राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन डिसेंबरमध्ये भारत भेट देणार असून, चीनमधील एससीओ परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदींशी त्यांची चर्चा झाली.

रशियात १० लाख भारतीयांना रोजगार

रशियात कामगारांची तूट निर्माण झाल्याने सरकार १० लाख भारतीयांना रोजगार देणार आहे. कंस्ट्रक्शन, उत्पादन व इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात भारतीयांना प्राधान्य मिळेल. रशियन कंपन्या भारतीय कामगारांना आकर्षित करत आहेत. भारतीय राजदूत विनय कुमार यांनी नमूद केले की, भारतीयांच्या वाढत्या येण्याने दूतावासातील कामकाज वाढले आहे. हे नवीन रोजगार केंद्र म्हणून रूस उदयास आले आहे.

भारत-रशिया संबंधांचे भविष्य काय?

हिंदी शिकण्याची ही लहर भारत-रशिया मैत्रीचे प्रतीक आहे. दोन्ही देशांना जागतिक आव्हानांना सामोरे जावे लागत असले तरी सहकार्य वाढत आहे. रशियन विद्यापीठे हिंदीवर भर देऊन सांस्कृतिक देवाणघेवाण वाढवत आहेत. पुतिनांची भारत भेट व डउज चर्चा यावरून संबंध अधिक दृढ होत असल्याचे दिसते. भारतीय कामगार व विद्यार्थ्यांसाठी रूस आकर्षक ठरत असून, द्विपक्षीय व्यापार व शिक्षणात नवीन क्षितिज उघडतील.

रशियातील विद्यापीठांमध्ये हिंदी शिकवली जाणारी यादी कोणती आहे?

मॉस्को स्टेट इंटरनॅशनल रिलेशन्स इन्स्टिट्यूट (एमजीआयएमओ), मॉस्को स्टेट युनिव्हर्सिटी, मॉस्को स्टेट लिंग्विस्टिक युनिव्हर्सिटी, रशियन स्टेट युनिव्हर्सिटी फॉर ह्युमॅनिटीज (आरएसयूएच), सेंट पीटर्सबर्ग स्टेट युनिव्हर्सिटी आणि कझान फेडरल युनिव्हर्सिटी यांसारख्या संस्थांमध्ये हिंदीचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. येथे प्रवेश अर्ज दोन ते तीन पट वाढले आहेत.

रशियातील उपमंत्री कॉन्स्टंटिन मोगिलेवस्की यांनी हिंदी शिकण्याबाबत काय म्हटलं आहे?

विज्ञान व उच्च शिक्षण विभागाचे उपमंत्री कॉन्स्टंटिन मोगिलेवस्की यांनी रशियन बातम्या एजन्सी तासला दिलेल्या मुलाखतीत म्हटलं की, आम्हाला जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी हिंदी शिकावी अशी अपेक्षा आहे. भारत जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश असल्याने दैनंदिन जीवनात इंग्रजीऐवजी हिंदीचा वापर वाढत असल्याने याचा फायदा घेणे आवश्यक आहे. हिंदी शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या आणि बोलणारे गट दोन ते तीन पट वाढले आहेत.

रशियात भारतीयांना रोजगाराच्या संधी कशा आहेत?

रशियात कामगारांची तूट असल्याने सरकार १० लाख भारतीयांना कंस्ट्रक्शन, उत्पादन आणि इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात रोजगार देणार आहे. युराल चैंबर ऑफ कॉमर्सनुसार, २०२५ च्या अखेरीस हे उद्दिष्ट साध्य होईल, ज्यात स्वेर्दलोवस्क क्षेत्राचा समावेश आहे. भारतीय राजदूत विनय कुमार यांनी सांगितल्याप्रमाणे, यामुळे दूतावासातील काम वाढले आहे, परंतु रशियन श्रम मंत्रालयाने याला स्पष्टपणे खंडन केले आहे.

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# अल्पवयीन मुलीचे अपहरण करून अत्याचार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.११ ऑगस्ट -** गावाशेजारीलच एका अल्पवयीन मुलीचे अपहरण करून तिला मुंबईला भावाकडे नेऊन ठेवले. आरोपी गावाकडे आला. पोलिसांना संशय आल्याने त्याला ताब्यात घेतल्यानंतर मुलीला पळवून नेल्याचे समजले. मुलीच्या फिर्यादीवरून आरोपीविरोधात अपहरण, बलात्कार व पोक्सोचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपी ओंकार परमेश्वर समंदे (वय २१, रा. पाखरसांगवी, ता. जि. लातूर) याने त्याच्याच गावाशेजारील एका अल्पवयीन १६ वर्षीय मुलीला फूस लावून मुंबईला पळवून नेले होते. मुंबईत त्याच्या भावाकडे मुलीला ठेऊन तो पाखरसांगवी येथे आला होता. आरोपी ओंकार समंदे याने मुलीला पळवून नेले होते. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात पीडितेच्या वडिलांच्या फिर्यादीवरून अज्ञात आरोपीविरोधात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपी ओंकार याने त्या पीडितेला फूस लावून मुंबई येथे त्याच्या भावाकडे नेऊन सोडले होते. त्यानंतर तो पाखरसांगवीला आला होता. नातेवाईकांना संशय आल्याने पोलिसांना कल्पना दिली. त्यावरून पोलिसांनी आरोपी ओंकार याला ताब्यात घेतले. अधिक चौकशी केली असता पीडितेला त्यानेच फूस लावून पळवून नेल्याचे त्याने कबूल केले.

पीडितेला मुंबई येथे भावाकडे सोडल्याचेही त्याने सांगितले. पोलिसांनी ओंकार याच्या भावाला सांगून पीडित मुलीला आणून सोडण्यास सांगितले. त्यावरून पीडितेला आणण्यात आले. पीडितेच्या वडिलांनी तिला घेऊन एमआयडीसी पोलीस ठाणे गाठले. आरोपी ओंकार परमेश्वर समंदे याच्याविरोधात एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून अधिक तपास सुरू आहे.



## संक्षिप्त वृत्त...

### ईद मिलादुन्नबी निमित्त रक्तदान शिबीर संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.११ ऑगस्ट -**

ईद मिलादुन्नबी निमित्त इर्शाद सय्यद यांच्या मित्र मंडळाच्या वतीने जूना गाव भागात मदीना मोहल्ला, काळे गल्ली लातूर. येथे शासकिय रक्तपेढीत भव्य रक्तदान शिबिर घेण्यात आले.

या रक्तदान शिबिरात १५० पुरुष ३१ महिला असे १८१ रक्तदात्यांनी रक्तदान केले, ईद ए मिलादुन्नबी निमित्त हा कार्यक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजक इर्शाद भैय्या सय्यद व त्यांचे युवा कार्यकर्ते आणि शेख याकूब गुत्तेदार यानी सहकार्य केले. शेख इस्माईल,असद खोरीवाले,शेख जाकीर सर, सय्यद आसिफ,शेख इब्राहिम शेख,अस्लम शेख, अजहर सय्यद,वसीम सय्यद, मोहसीन मेहबूब सय्यद,पठाण शबाझ, शेख शाहरुख, हमीद शेख,इम्रान शेख,मोहसीन शेख, अकबर शेख, सय्यद सिराज, शेख सैफुलला,खिजर शेख, हुसेन शेख,वसीम तांबोळी, शेख उमर, शेख सोहेल, शेख सोनू, पठान सोनू, व मोहल्ला कमिटीच्या सर्व पदाधिकाच्यांचे योगदान महत्वाचे ठरले,

### महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची दोन दिवसीय बैठक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.११ ऑगस्ट -**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची राज्य कार्यकारिणीची बैठक १३ व १४ सप्टेंबर रोजी येथील ओम लॉन्स मंगल कार्यालय, दिवाणजी व शाम मंगल कार्यालयात पार पडणार आहे.

बैठकीचे उद्घाटन माजी खासदार डॉ. गोपाळराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व ॲड. अण्णाराव पाटील यांच्या उपस्थितीमध्ये होणार आहे. दोन दिवसीय बैठकीत विविध विषयांवर चर्चा होणार आहे. दुसऱ्या दिवशी समारोप व समितीतर्फे राज्यस्तरीय पुरस्काराचे वितरण होणार आहे. ज्येष्ठ समाजवादी कार्यकर्ते पन्नालाल खुराणा व गणेश चिंचोले या दोघांच्या हस्ते वितरण होणार आहे. कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा लातूरच्यावतीने करण्यात आले आहे.

### उच्च क्षमतेचे सक्षन वाहन महापालिकेत दाखल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.११ ऑगस्ट -**

मलवाहिनी, भूमिगत गटार व मल संकलन केंद्राची स्वच्छता करणाऱ्या मनुष्यबळाची आरोग्य सुरक्षितता व पाण्याचा पुनर्वापर करण्याची क्षमता



असणारे उच्च क्षमतेचे सक्षन व जेटिंग मशीन महानगरपालिकेच्या ताफ्यात दाखल झाले आहे.

यंत्र संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबईमार्फत अशी २ वाहने महापालिकेला मिळाली आहेत. महापालिका आयुक्त मानसी यांच्या हस्ते या वाहनाचे बुधवारी लोकार्पण करण्यात आले. अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे, मुख्य स्वच्छता अधिकारी कलीम शेख, स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

या नव्या मशीनच्या माध्यमातून मलवाहिनी, भूमिगत गटार व मल संकलन केंद्रांची स्वच्छता करणे सोयीचे होणार आहे. भूमिगत नाल्यांची ब्लॉक क्रॉसिंग पाईपची स्वच्छता देखील करता येणार आहे. आपत्कालीन काळात अत्यावश्यक ठिकाणी मशीनचा वापर करून नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करता येणे शक्य होणार आहे. आपत्कालीन स्थितीत नागरिकांनी मुख्य स्वच्छता अधिकारी कलीम शेख (९०११०३२४०४) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे.

### अवैध वाळू उपशावर कारवाई; दोन बोटी नष्ट

**तभा वृत्तसेवा**

**लातूर , दि.११ ऑगस्ट -**

निलंगा तालुक्यातील औराद शहाजानी भागातील मांजरा व तेरणा नदी पात्रातील पाण्यातून अवैध कढईच्या सहाय्याने बेसुमार अवैद्य वाळू उपसा केला जात आहे. मंगळवारी महसूल पथकाने बोटी ताब्यात घेऊन रात्री उशिरापर्यंत नष्ट करून औराद पोलीस ठाण्यात अज्ञात पाच ते सहा जणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

औराद, तगरखेडा, सावरी, मानेजवळगा, हालसी, नदीवाडी, शिऊर आदी भागांतील मांजरा व तेरणा नदी पात्रात पाणी थांबते. या पाण्यातून लोखंडी कढई बोटीच्या सहाय्याने मोठ्या प्रमाणात वाळू उपसा केला जात होता. मंगळवारी तहसीलदार प्रसाद कुलकर्णी, सपोनि विठ्ठल दुरपडे, मंडळ अधिकारी आर. व्ही देशमुख, राजकुमार सोमवंशी, भरत मुंडे, तलाठी शुभम वाघमारे, तगरखेडा तलाठी परमेश्वर माने, बोरसुरी तलाठी ज्ञानोबा लहाने, शिउर तलाठी विजय रुपनर, अंबुलगा तलाठी बाबुराव माने आदी महसूल प्रशासन कर्मचारी यांनी तेरणा नदीपात्रात उतरुन सदर कारवाई केली आहे. सलग दुसऱ्या दिवशी बुधवारी कारवाईत सातत्य होते. मंडळ अधिकारी भरत मुंडे यांच्या फिर्यादीवरुन रब्बानी नाईकवाडे यांच्या शेतातील ६ वाळू उपशाच्या कडई नष्ट करण्यात आल्या, तर एक ट्रॅक्टर, ६ कडई असा ४ लाख २ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या विषयी मंडळ अधिकारी भरत मुंडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून औराद पोलीस ठाण्यात अज्ञात पाच ते सहा व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# अतिक्रमणांवर बुलडोझर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.११ ऑगस्ट -** महापालिकेच्या अतिक्रमण हटाव विभागाच्यावतीने बुधवारी सकाळपासून शहरात अतिक्रमण हटविण्याची मोहीम सुरू करण्यात आली आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौक, गंजगोलाई, कापड लाईन, मारवाडी स्मशानभूमीसमोर फूटपाथवर असलेले अतिक्रमण पोलीस बंदोबस्तात हटविण्यात आले.



फूटपाथवरील अतिक्रमणे संबंधितांनी तत्काळ काढून घ्यावेत, अन्यथा ती अतिक्रमणे हटवून तेथील साहित्य जप्त करण्यात येईल, असा इशारा दोन दिवसांपूर्वी महापालिका प्रशासनाच्यावतीने देण्यात आला होता. तरीही अनेक ठिकाणीची अतिक्रमणे काढून घेण्यात आली नाहीत. बुधवारी सकाळी सहा वाजल्यापासून सायंकाळी पाच वाजेपर्यंत महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या पथकाकडून पोलीस बंदोबस्तात ही कारवाई करण्यात आली. शहरातील सर्वच प्रमुख रस्त्यांच्या फूटपाथवर अतिक्रमणे थाटण्यात आली आहेत. यामुळे रहदारीला अडथळा होत असल्याने महापालिका आयुक्त मानसी मीना यांच्या सूचनेनुसार उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे यांच्या नेतृत्वात अतिक्रमण हटविण्याची धडक कारवाई करण्यात येत आहे. बुधवारी शहरातील अनेक फूटपाथवरील अतिक्रमणांवर बुलडोझर फिरविण्यात आले. अतिक्रमण विभागाचे पथक दिवसभर कार्यरत होते. तरीही अनेक रस्त्यांवरील पूर्ण अतिक्रमण हटले नाही. ही कारवाई यापुढेही सुरूच राहणार आहे. संबंधितांनी अतिक्रमणे काढून घ्यावीत, अन्यथा ती हटवून साहित्य जप्त करण्यात येईल, असा इशारा महापालिका प्रशासनाच्यावतीने देण्यात आला आहे. अतिक्रमण हटाव विभागाचे प्रमुख रवी कांबळे यांच्यासह सर्व क्षेत्रीय अधिकारी यांच्यासह पोलीस कर्मचारी या मोहिमेत सहभागी झाले होते.

# महाविकास आघाडीतर्फे जनसुरक्षा कायद्याची होळी



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.११ ऑगस्ट -** महाविकास आघाडीच्यावतीने बुधवारी शहरातील महात्मा गांधी चौकात महाराष्ट्र जनसुरक्षा कायद्याच्या विरोधात निदर्शने करीत या जुलमी कायद्याला तीव्र विरोध करण्यात आला. यावेळी जनसुरक्षा कायद्याच्या प्रतींची होळी करून हा कायदा रद्द करण्याची मागणी करण्यात आली. या आंदोलनात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि ठाकरे सेना या पक्षांचे नेते, सामाजिक कार्यकर्ते आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी होते.

जनसुरक्षा कायदा म्हणजे काळा कायदा असून, तो लोकशाहीच्या विरोधात असल्याचे यावेळी महाविकास आघाडीच्या नेत्यांनी म्हटले. या कायद्यामुळे पोलिसांना अमर्याद अधिकार मिळतील आणि त्याचा गैरवापर राजकीय विरोधकांना दडपण्यासाठी केला जाईल, अशी भीती यावेळी व्यक्त करण्यात आली. यावर गंभीर आक्षेप घेत आंदोलकांनी हे सरकार निर्लज्ज आणि मस्तवाल असल्याचा आरोप करत जोरदार घोषणाबाजी केली.

यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके म्हणाले, या कायद्याची तुलना इंग्रजांच्या पब्लिक सिक्युरिटी ॲक्टशी करावी लागेल. इंग्रजांनी याच कायद्याविरोधात आवाज उठवणाऱ्यांना तुरुंगात टाकले होते. तेव्हा भगतसिंग यांनी संसदेत बॉम्ब टाकून त्याचा निषेध केला होता. आज पुन्हा स्वतंत्र भारतात भगतसिंग होण्याची वेळ आली आहे, असे ते म्हणत या कायद्याला प्रत्येक देशभक्त नागरिकाने विरोध करणे आवश्यक आहे, असे आवाहन त्यांनी केले.

या आंदोलनात सहभागी झालेले ज्येष्ठ विचारवंत डॉ. सोमनाथ रोडे म्हणाले, हा कायदा म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानातील मूळ सिध्दांतावर घाला घालणारा प्रकार असून, हा कायदा लोकशाहीचा गळा दाबणारा कायदा आहे. ज्याप्रमाणे जनतेने शेतकरी विरोधी काळे कायदे रद्द करायला सरकारला भाग पाडले तसाच जनरेटा या कायद्याच्या विरोधात तयार झाला पाहिजे आणि हे कायदे रद्द झाले पाहिजेत, असेही ते म्हणाले.

यावेळी महाराष्ट्र जनसुरक्षा कायद्याच्या प्रतींची महाविकास आघाडीच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांकडून होळी करण्यात आली. या आंदोलनात शेकापचे नेते ॲड. उदय गवारे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष राजा मणियार, ठाकरे सेनेचे जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी व बालाजी रेड्डी, महानगर प्रमुख सुनील बसपुरे, काँग्रेसचे शहराध्यक्ष ॲड. किरण जाधव, प्रदेश सचिव ॲड. समद पटेल, अशोक गोविंदपूरकर, सुनीता चाळक, मनीषा कोकणे, कल्पना फरकांडे, सुलेखा कारेपूरकर, करुणा शिंदे, कल्पना मोरे, शीतल मोरे यांच्यासह महाविकास आघाडीतील घटक पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# महाबोधी बुध्द विहार मुक्तीसाठी लातुरात ५०० फुट धम्मध्वज पदयात्रा



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.११ ऑगस्ट -** बुध्दगया येथील महाबोधी बुध्द महाविहार बौध्दांच्या ताब्यात द्यावे, या मागणीसाठी लातुरात बुधवारी ५०० फुट धम्मध्वज पदयात्रा काढण्यात आली. या पदयात्रेस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

बुध्दगया येथील महाबोधी बुध्द विहार आंदोलनाचे प्रणेते पू. भंते विनाचार्य यांचा महाराष्ट्रभर संवाद दौरा सुरू असून, बुधवारी त्यांचे लातूर शहरात आगमन झाले होते. यानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकापासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कपर्यंत ५०० फुट धम्मध्वज पदयात्रा काढण्यात आली. या पदयात्रेस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. बुध्दगया येथील महाबोधी बुध्द विहार बौध्दांच्या ताब्यात द्यावे, या मागणीसाठी ठिकठिकाणी आंदोलने सुरू आहेत. दरम्यान, पू. भंते विनाचार्य हे बुधवारी लातूर दौऱ्यावर आले होते. पू. भंते विनाचार्य आणि 'वंचित'चे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत तर्फे रात्री दयानंद सभागृहात संवाद मेळावा पार पडला. यावेळी पू. भंते विनाचार्य व ॲड. आंबेडकर यांनी समाजबांधवांशी संवाद साधत महाबोधी बुध्द विहारमुक्तीबाबत भूमिका स्पष्ट केली.

# डॉ. कराड यांनी केला रविशंकरजी यांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.११ ऑगस्ट -** विश्वविख्यात अध्यात्मिक गुरू श्री श्री रविशंकर यांचा लातूर येथे माईर्स एमआयटी शिक्षण संस्था समूह, पुणेचे व्यवस्थापकीय विश्वस्त व कार्यकारी अध्यक्ष डॉ. राहुल विश्वनाथ कराड यांनी वारकरी संप्रदायात महत्व असलेल्या विणा आणि पगडी घालून त्यांचा सन्मान केला.

यावेळी श्री श्री रविशंकर म्हणाले, अध्यात्म आणि विज्ञानाच्या समन्वयातून या संस्थेतर्फे विद्यार्थ्यांना दिले जाणारे शिक्षण हे उच्च कोटीचे आहे. यामुळे भविष्यात हे विद्यार्थी विश्वशांती व दिशा दर्शक असतील. तसेच लोकशाही सक्षमकरण्यासाठी डॉ. राहुल कराड हे युवकांमध्ये बिजे रुजविण्याचे महान कार्य करीत आहेत. राष्ट्रीय



विधायक संमेलन, भारतीय छात्र संसद, सरपंच संसद, महिला संसद आणि नुकतेच महाराष्ट्र वारकरी किर्तनकार परिषदेचे आयोजन करून देश घडविण्याचे कार्य करीत आहेत. त्यांचे कार्य अभिनंदनीय आहे. त्यांच्या या कार्यातून देशाला उत्कृष्ट व चांगले नेतृत्व करणारी युवा पिढी मिळत आहे.

डॉ. राहुल कराड म्हणाले, भक्ती, संगीत आणि ज्ञान या त्रिवेणीच्या माध्यमातून समाजाला योग्य दिशा दाखविण्याचे कार्य आर्ट ऑफ लिव्हिंगच्या माध्यमातून गुरूजी करीत आहेत. त्यांनी लातूर जिल्ह्यातील काही खेडे दत्तक घेऊन पाण्यासारखे ज्वलंत प्रश्न सोडविण्याचा बिडा उचलला आहे. त्यांनी अध्यात्माबरोबर सामाजिक कार्य करुन मनुष्याचे जीवन उंचविण्याचे बहुमूल्य कार्य करीत आहेत.

# स्वामी दयानंद विद्यालयाच्या खेळाडूंची जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.११ ऑगस्ट -** दयानंद विद्यालय, कव्हा येथील खेळाडूंनी तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत भाग घेऊन घवघवीत यश संपादन केलेले आहे. या खेळाडूंची लातूर येथे होणाऱ्या जिल्हास्तरीय उंच उडी व धावण्याच्या क्रीडा स्पर्धे साठी निवड झालेली आहे.

शासनाच्या आदेशानुसार लातूर तालुक्यातील कव्हा येथील स्वामी दयानंद विद्यालयात तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा संपन्न झाल्या या स्पर्धेमध्ये धावणे, उंच उडी अशा विविध स्पर्धेमध्ये स्वामी दयानंद विद्यालयातील खेळाडूंनी उल्लेखनीय यश संपादन केलेले आहे. यामध्ये १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत साक्षी लक्ष्मण घार या खेळाडू विद्यार्थीनीने द्वितीय क्रमांक मिळविला तर उंच उडीमध्ये प्रगती पंडगे, सोहम कांबळे, या खेळाडूने द्वितीय क्रमांक पटकाविला आहे तर स्नेहा घार, अक्षता नलमले, राजन सोदले या खेळाडूंनी तृतीय क्रमांक पटकाविला आहे. या खेळाडूंची जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धे साठी निवड झालेली आहे.

त्यांच्या निवडीबद्दल जेएसपीएम संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव पाटील कव्हेकर, प्रतिभाताई पाटील कव्हेकर, संस्थेचे उपाध्यक्ष अजितसिंह पाटील कव्हेकर आदिंनी अभिनंदन केले.

# शासकीय वसतिगृहाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सुख- सुविधा उपलब्ध होणार

**तभा प्रतिनिधी**

**लातूर, दि.११ ऑगस्ट -** चाकूर तालुक्यातील हणमंतवाडी येथे उभारण्यात येणाऱ्या शासकीय वसतीगृहाच्या माध्यमातून सर्वसामान्य विद्यार्थ्यांना सुख सुविधा उपलब्ध होणार असल्याचे प्रतीपादन राज्याचे सहकार मंत्री तथा गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री बाबासाहेब पाटील यांनी चाकूर येथे केले.

ते चाकूर तालुक्यातील हनमंतवाडी येथे मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या निवासासाठी उभारण्यात येणाऱ्या मुलामुलींसाठीच्या दोन शासकीय वसतीगृहाच्या ३० कोटी रुपयांच्या भूमिपूजनाप्रसंगी सहकार मंत्री नामदार पाटील बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष शिवाजीराव काळे होते.

व्यासपीठावर जिल्हा नियोजन समितीचे सदस्य पद्माकरराव पाटील, चाकूरचे नगराध्यक्ष करीम गुळवे, शिवसेना जिल्हाप्रमुख गोपाळ माने, कार्यकारी अभियंता श्रीमती अलका डाके , शिवानंद हेंगणे, किशन रेड्डी, उपनगराध्यक्ष साईप्रसाद हिप्पाळे, नगरसेवक मिलिंद महालिंगे, नगरसेवक विलासराव पाटील, भाजप तालुकाध्यक्ष सिद्धेश्वर पवार, माजी जिल्हा परिषद सदस्य सुदर्शन मुंडे, जिल्हा उपाध्यक्ष बालाजी सूर्यवंशी,बाजार समितीचे संचालक यशवंत जाधव,राहुल सुरवसे, गोविंदराव भोरे, तालुका कार्याध्यक्ष भानुदासराव पोटे, तालुका कार्याध्यक्ष निसार देशमुख, बांधकाम सभापती मुजम्मिल सय्यद, नगरसेवक भागवत फुले, माजी नगरसेवक इलियास सय्यद, शिवदर्शन स्वामी, नगरसेवक नितीन रेड्डी, महंमद सय्यद, राम कसबे, संजय पाटील, पपन कांबळे, नरसिंग गोलावार, माजी उपसरपंच मुर्तुजा सय्यद, जिल्हा सरचिटणीस अर्जुन मद्रेवार, युवक राष्ट्रवादी काँग्रेस तालुका अध्यक्ष संदीप शेटे, तालुका उपाध्यक्ष गणपतराव कवठे, तालुका उपाध्यक्ष गणपतराव नितळे, तालुका उपाध्यक्ष सिद्धेश्वर आप्पा लोहारे, तालुका उपाध्यक्ष सिद्धेश्वर आप्पा अंकलकोटे,सामाजिक न्याय विभागाचे जिल्हा कार्याध्यक्ष विष्णू तिकटे, तालुकाध्यक्ष विश्वनाथ



एडके, शिवशंकर हाळे, तालुका कार्याध्यक्ष विवेक शिंदे, तालुका उपाध्यक्ष परमेश्वर नवगण, ज्येष्ठ नेते अशोकराव पाटील, मच्छिंद्र नागरगोजे, निलेश भंडे, अंतेश्वर पाटील, भागवत कुसंगे, महेश व्हते, बाबूभाई दापकेवाले, समाधान डोंगरे, मन्मथ पालापुरे, बिलाल पठाण, प्रदीप पाटील गोळेगावकर, मनोज पाटील, युवराज हाके,आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना नामदार पाटील म्हणाले की, चाकूर येथे मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतीगृह व्हावे ही जन माणसांची भावना होती. कार्यक्रमास चाकूर तालुक्यातील विविध नागरिकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

# अजिंठा, पिंपळदरी परिसरात रानडुकरांच्या उपद्रवामुळे तीन एकर मका पिकांचे नुकसान

## रात्रीच्या वेळी शेतात घुसुन पिकांचे नुकसान; हाता तोंडाशी आलेला घास हिरवला

तभा वृत्तसेवा

अजिंठा दि, ११ सप्टेंबर - सिल्लोड तालुक्यातील अजिंठा ,अनाड, मुकपाट, बाळापूर, पिंपळदरी, आदी परिसरात जेमतेम पावसाच्या परिस्थितीमुळे पीक जगवताना शेतकरी मेटाकुटीला येत आहेत . त्याचवेळी आतोना खर्च करून कष्टाने जगविलेली उभे पिके रात्रीच्या वेळी शेतात घुसुन वन्यप्राण्यांकडून फस्त केली जात आहे .

सध्या निसर्गाने शेतकर्यांना साथ दिली असली तरी सध्यास्थितीत वन्य प्राण्यांच्या त्रासामुळे शेतकऱ्याची चिंता वाढली आहे . शेतात रात्रीला पहेरा देऊन ही पिंपळदरी शिवारातील गोपाल भारत दौड यांच्या गट न . ९८ आणि द्वाकाबाई रमेश दौंड गट.न.१२८ यांच्या शेतात रात्रीच्या वेळी घुसून रानडुक्करांनी उभ्या पिकात मोठ्या प्रमाणात धुमाकूळ घातल्याने मका, कापूस , पिकासह तिन एकर पिकांचे नुकसान करून जमीनदोस्त करून कंस खाऊन मोठ्या प्रमाणात नुकसान करत असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले आहे .

**हातातोंडाशी आलेल्या घासाची रानडुक्कराकडून मोठी नासाडी झाली आहे. शेतात पीक राखणीस जाण्याचीही भीती वाटत आहे. नुकसानीत मोठा आर्थिक फटका बसला आहे. वनविभागाने पंचनामा करून भरपाई देऊन दिलासा द्यावा. अशी आमची विनंती आहे.**

**द्वाकाबाई रमेश दौंड, पिंपळदरी**

तसेच अजिंठा , मुकपाट, बाळापूर, पिपळदरी, सराटी, बोदवड, खडाळा, पानस, डिग्रस आदी शिवारात रात्री, अपरात्री रान डुक्कर हरीण रुई हैदोस घातला असून डोंगरमाथ्याच्या शेजारी व परिसरात रानडुक्कर हरीण रुई वानर इत्यादी वन्यप्राणा धुमाकूळ सुरूच आहे बरेच शेतकरी रात्र जागून पिकाची राखण करत आहे मात्र रात्रीच्या वेळेस शेतकऱ्यांच्या उभ्या असलेल्या मका पिकात रानडुकर हैदोस घालत मका पिक पाडून मकाच्या कंस खाऊन टाकतात. व पिकाची नासाडी करतात .त्यामुळे हातातोंडाशी आलेला घास हिरावला जात आहे .वन्य प्राण्याकडून पिकाची नासडी होत असल्याने शेतकरी संकटात सापडला आहे .

रानडुकरांच्या या त्रासाला शेतकरी वर्ग वैतागले आहेत. रानडुकरांच्या भितीने शेतकरी रात्री मकाच्या शेतात जात नाहीत.

मका पिकाच्या पेरणी वेळेस व नंतर कंस आल्यानंतर रानडुकरांचा त्रास जास्त होतो.मका सोंगणीसाठी एक ते दीड मिहना बाकी असून तो पर्यंत शेतकऱ्यांच्या हातात काही पिक येते की नाही, अशी भीती शेतकरी वर्गात व्यक्त केली जात आहे.

याकडे वनविभागाने गंभीर्याने लक्ष देऊन रानडुकरांचा तात्काळ बंदोबस्त करावा, झालेल्या नुकसानीची तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकर्यांस नुकसान भरपाई मिळवून द्यावी, अशी मागणी नुकसानग्रस्त शेतकरी करत आहेत.



# सोयगाव येथील दोघांना समाजभूषण व तिघांना गुणवंत विद्यार्थी पुरस्काराने सन्मानित; खा.भुमरे यांच्या हस्ते सत्कार



तभा.वृत्तसेवा

सोयगाव दि.११ सप्टेंबर : छत्रपती संभाजीनगर येथील तेली सेनेच्या वतीने सोयगाव येथील दोघांना समाजभूषण तर तीन विदयार्थ्यांना गुणवंत पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले.

सोयगाव येथील ह.भ.प.जान्हवीताई सोनवणे व कृषी भूषण शेतकरी अरुण सोहनी यांना समाजभूषण हा पुरस्कार तेली सेनेच्या वतीने छत्रपती संभाजीनगर येथील कार्यक्रमात देण्यात आला.तसेच सोयगाव येथील शौर्यल सोहनी,भावना माळोदे,तनिष्क सोनवणे यांना गुणवंत विद्यार्थी म्हणून गौरविण्यात आले.खासदार संदीपान भुमरे यांच्या हस्ते हे पुरस्कार देण्यात आले.यावेळी तेली सेनेचे अध्यक्ष गणेश पवार,योगेश मिसाळ,ह.भ.प.प्रभाकर बोरसे, राज रायते,संतोष सोनवणे,जगदीश नादरकर,दत्त भोलाने, गणेश वाडेकर,भागवत राऊत,अशोक लोखंडे,प्राची पवार, रंजना वाघमारे,रंजना वाघमारे आदीं उपस्थित होते.अरुण सोहनी,ह.भ.प.जान्हवी सोनवणे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन सचिन अंभोरे यांनी केले आभार गणेश पवार यांनी मानले.

# राष्ट्रीय आरोग्यसेवा अहवाल प्रसिद्ध

मुंबई, १० सप्टेंबर २०२५ – भारतीय उद्योग महासंघ (सीआयआय-ईवाय हेल्थटेक सर्वेक्षण २०२५ मध्ये असे दिसून आले आहे की पुढील २-३ वर्षांत भारतीय रुग्णालयांमध्ये आयटी इनोव्हेशन बजेट २०-२५% ने वाढणार आहे आणि जवळजवळ निम्मे आरोग्य सेवा प्रदाते आधीच त्यांच्या खर्चाच्या २०-५०% डिजिटल इनोव्हेशनसाठी वाटप करत आहेत. उखख हॉस्पिटल टेक २०२५ समिटमध्ये प्रसिद्ध झालेल्या या अहवालात रुग्णांचा अनुभव, क्लिनिकल निकाल आणि डेटा-चालित निर्णय घेण्यामध्ये ऑटोमेशन कसे केंद्रस्थानी आहे यावर प्रकाश टाकण्यात आला आहे. आरोग्यसेवेच्या भविष्याला आकार देण्यासाठी डिजिटल गती वाढवून परिवर्तन सक्षम करून चालवले जाणारे या अहवालात रुग्णालयांना भविष्यासाठी तयार राहण्यासाठी ज्या अडथळ्यांवर मात करावी लागते त्यावरही प्रकाश टाकण्यात आला आहे. डिजिटल गुंतवणुकीला चालना देणारे उदयोन्मुख ट्रेंड डिजिटल गुंतवणुकीला प्राधान्य देण्याच्या बाबतीत, आरोग्य सेवा प्रदाते अशा क्षेत्रांकडे बजेट निर्देशित करत आहेत जिथे त्यांना दीर्घकालीन क्षमता वाढ दिसते. दहापैकी सहा रुग्णालये आयटी क्षमता बांधणीत गुंतवणूक करण्याची योजना आखत आहेत, त्यानंतर बीआय टूल्स आणि डेटा लेक (५०%) आहेत. हार्डवेअर अपग्रेड आणि गंभीर अनुप्रयोग सुधारणा प्राधान्य यादीत (१०%) येतात, तर मध्यम-प्राधान्य क्षेत्रांमध्ये डेटा व्यवस्थापन आणि सायबरसुरक्षा समाविष्ट आहे.

# आपली स्वप्ने पूर्ण करा आयआयएफएल फायनान्स गोल्ड लोनसोबत

छत्रपती संभाजीनगर, ११ सप्टेंबर : स्वप्न आपले, गोल्ड लोन आमचे - या मूलभूत विश्वासासह आयआयएफएल फायनान्स लाखो भारतीयांसाठी विश्वासार्ह आर्थिक प्रगतीचा भागीदार म्हणून आपले स्थान अधिक मजबूत करत आहे. व्यक्तींच्या आकांक्षा आणि न्यू इंडियाच्या वाढीस चालना देणाऱ्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या (एमएसएमई) महत्त्वाकांक्षा ओळखून, आयआयएफएल फायनान्स सुलभ आर्थिक उपाय उपलब्ध करून देत ही गती अधिक वेगवान करण्यासाठी वचनबद्ध आहे. आयआयएफएल फायनान्स गोल्ड लोन साध्या आणि पारदर्शक प्रक्रियेद्वारे जलद आर्थिक मदत उपलब्ध करून देते. ग्राहकांना अत्यल्प कागदपत्रांसह त्याच दिवशी रक्कम मिळू शकते. या कर्जामध्ये आकर्षक आणि स्पर्धात्मक व्याजदर तसेच वैयक्तिक आर्थिक गरजांनुसार तयार केलेले लवचिक परतफेडीचे पर्याय उपलब्ध आहेत.

# एमजीएममध्ये 'प्रोजेक्टिव्ह टेस्टिंग टेक्निक्स' या विषयावर राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर, दि. ११ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठातील मानसशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक १२ व १३ सप्टेंबर २०२५ रोजी 'प्रोजेक्टिव्ह टेस्टिंग टेक्निक्स' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या महत्त्वपूर्ण कार्यशाळेचा उद्देश मानसशास्त्रीय निदान आणि उपचारांमध्ये वापरल्या जाणाऱ्या प्रोजेक्टिव्ह टेस्टिंगच्या तंत्रांवर सखोल ज्ञान प्रदान करणे हा आहे. या राष्ट्रीय कार्यशाळेसाठी टाटा सामाजिक विज्ञान संस्थेचे संचालक, प्रा.बाळ रक्षासे हे प्रमुख पाहुणे आणि मुख्य मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच, पुणे येथील प्रसिद्ध क्लिनिकल सायकोलॉजिस्ट सौ. मधुरा दलाल या कार्यशाळेत मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेचे उद्घाटन एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा.डॉ.विलास सापकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर व सर्व संबंधितांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. कार्यशाळेचे संयोजक म्हणून सामाजिक शास्त्राच्या अधिष्ठता डॉ.रेखा शेळके आणि संचालक डॉ. के. पी. सिंग हे उपस्थित राहणार आहेत. ही कार्यशाळा विद्यापीठाच्या विनोबा भावे सभागृहामध्ये सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत आयोजित करण्यात आली आहे. मानसशास्त्र क्षेत्रातील विद्यार्थी, प्राध्यापक आणि व्यावसायिक यांनी या कार्यशाळेत सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# आतली बातमी फुटली १९ सप्टेंबरपासून मनोरंजनाची सफर घडवायला सज्ज

छत्रपती संभाजीनगर – आतली बातमी फुटली' हा सिनेमा येत्या १९ सप्टेंबरपासून मनोरंजनाची सफर घडवायला सज्ज झाला आहे. या सिनेमाचा धमाकेदार ट्रेलर सोहळा नुकताच संपन्न झाला. नामवंतांची उपस्थिती, सिनेमाच्या म्युझिक टीमने संगीत निर्मितीचे उलगडलेले सुखद अनुभव आणि वेगवेगळ्या धमाकेदार परफॉर्मन्सच्या सादरीकरणाने या सोहळ्याची रंगत चांगलीच वाढवली. वीजी फिल्म्स या बॅनरअंतर्गत दिग्दर्शक विशाल पी. गांधी आणि जैनेश इजरदार 'आतली बातमी फुटली' हा नवाकोरा मराठी चित्रपट प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी घेऊन आले आहेत.

अभिनेते मोहन आगाशे, अभिनेत्री रोहिणी हट्टगंडी, पॉवरपॅक्ड अभिनेता सिद्धार्थ जाधव असे मराठीतले नामवंत चेहरे या चित्रपटाच्या निमित्ताने पहिल्यांदाच एकत्र आले आहेत. या तिघांसोबत विजय निकम, भारत गणेशपुरे, आनंदा कारेकर, प्रीतम कागणे, त्रिशा ठोसर आदि कलाकारांची जमून आलेली भट्टी आणि खिळवून ठेवणारी कथा असलेला 'आतली बातमी फुटली' चित्रपट धमाल आणणार आहे.

या चित्रपटाची निर्मिती विशाल पी. गांधी आणि ग्रीष्मा अडवाणी यांची आहे. सहनिर्माता अम्मन अडवाणी तर सहयोगी दिग्दर्शक जीवक मुनतोडे आहेत. 'आतली बातमी फुटली' चित्रपटाचे छायांकन अमित सुरेश कोडोथ तर संकलन रवी चौहान यांचे आहे. कथा जैनेश इजरदार यांनी तर पटकथा जीवक मुनतोडे, अम्मन अडवाणी,जैनेश इजरदार, विशाल पी. गांधी यांची आहे. संवाद लेखन जीवक मुनतोडे, व अद्वैत करंबेळकर यांनी केले आहेत. वेशभूषा ग्रीष्मा अडवाणी यांची, नृत्यदिग्दर्शन राहुल ठोंबरे, तिजो जॉर्ज यांचे आहे. प्रॉडक्शन डिझायनर रवी नाईक आहेत. कास्टिंग दिग्दर्शन जोकीम थोरास यांनी केले आहे, तर कार्यकारी निर्माते अब्दुल खान आहेत. चित्रपटाच्या वितरणाची जबाबदारी फिल्मास्त्र स्टुडिओजने सांभाळली आहे.

# 'आई'वरील कवितांनी विद्यार्थ्यांवर आणि रसिकांवर छाप

## स्व. सुरेश केवट यांच्या स्मृतिदिनानिमित्त कवी दीपक रंगारी यांचे मार्गदर्शन संपन्न

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.११ सप्टेंबर – माय म्हणजे आयुष्याची पहिली शाळा आणि पहिला गुरु थकलेल्या पायांना दिलासा, रडणाऱ्या मनाला आधार' अशा आईवरील मनस्पर्शी कविता आणि जात्यावरच्या ओव्या सादर करत प्रसिद्ध कवी, गीतकार आणि शुद्धलेखन अभ्यासक दीपक रंगारी यांनी कन्नड शहरातील विद्यार्थ्यांना आईच्या महतीची जाण करून दिली.

कन्नड तालुका पत्रकार संघांचे संस्थापक अध्यक्ष स्व. सुरेश केवट (बापू) यांच्या सातव्या स्मृतिदिनानिमित्त शहरातील बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालयात आयोजित विशेष कार्यक्रमात त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला आणि आपल्या काव्यप्रवासाची कहाणी उलगडून सांगितली.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्ष संतोष कोल्हे होते तर प्रमुख पाहुण्यांमध्ये कालिदास उपासनी, प्रा. रंगनाथ लहाने, जे.बी. धनवई, प्रकाश जिरेमाळी, डॉ. संजय गायकवाड, प्राचार्य संतोष मतसागर, नगरसेवक संतोष निकम, अरविंद कांबळे, बी.एल. कुंभकर्ण यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त सलीम आतार, कृषिभूषण अजय जाधव, आणि राज्य शासन पुरस्कार प्राप्त लेखक लक्ष्मण वाल्डे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. गणेश विसपुते यांनी केले.

कार्यक्रमात कवी रंगारी यांनी गोड गोजिरी हसते आई, फुलासारखी दिसते आई ही कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकली. तसेच त्यांनी आईने गायलेल्या जात्यावरील ओव्या सादर करत ग्रामीण जीवनाचे रंग शब्दातून उभे केले. शेवटी व्याकरणावरही सखोल मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांना भाषेचे महत्त्व पटवून दिले.

कार्यक्रमास समाजसेवक योगेश कोल्हे, नगरसेवक संतोष निकम, असलम पटेल, रवींद्र राठोड, प्रेमसिंग बैनाडे, अक्कू पवार, आर. एस. पवार, संजय जाधव, विठ्ठल शिरसे, प्रवीण जंजाळ, सहयोग जावळे, अभिषेक देशमुख, किशोर क्षिरसागर, प्रकाश पाडसवान, आबा चौधरी, नरेश सोनवणे, आर.के. पवार, नजहर शेख यांसह संत ज्ञानेश्वर विद्यालय, साने गुरुजी विद्यालय आणि सावित्रीबाई फुले विद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले. आईच्या वात्सल्यावर आधारित कवितांनी उपस्थित विद्यार्थ्यांच्या मनात घर करून कार्यक्रम संस्मरणीय ठरला.

# कै.बाबुरावजी काळे स्कूलचे यश;१४ वर्ष वयोगट मुलांचा संघ तालुका स्तरीय कबड्डी स्पर्धेत विजयी



सोयगाव,दि.११ सप्टेंबर – जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने आयोजित तालुका स्तरीय कबड्डी स्पर्धा दि.९ मंगळवार रोजी सकाळी ११ वाजता संत ज्ञानेश्वर महाविद्यालय प्रांगणात पार पडल्या.यात शिवज्योती शिक्षण प्रसारक मंडळ संचालित कै.बाबुरावजी काळे स्कूलचा १४ वर्षांखालील मुलांचा संघ विजयी झाला.विजयी सर्व विद्यार्थ्यांचे आणि त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या क्रीडा शिक्षक प्रा.संदीप निकम सरांचे,वर्गशिक्षकांचे शिवज्योती शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा ज्योतीताई काळे,सचिव देवीना काळे-भटकर, संचालक शिवदीप काळे,ज्ञानज्योती शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजेश यादव, मुख्याध्यापक निलेश पाटील,उपमुख्याध्यापक ज्ञानेश्वर एलिस,पर्यवेक्षक सागर घाटे,प्रा.कमलेश काळे,प्रा.डॉ. दादासाहेब पवार, प्रा.डॉ.निलेश गाडेकर,महेश मानकर यांनी अभिनंदन केले.

# जागतिक कौशल्य स्पर्धेत सहभागी होण्यासाठी नोंदणी करण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि.११ : जागतिक कौशल्य विकास स्पर्धा दर दोन वर्षानी होते. ही जगातील सर्वांत मोठी व्यावसायिक शिक्षण आणि कौशल्य उत्कृष्ठता स्पर्धा असून जगभरातील २३ वर्षाखालील तरुणांकरिता त्यांच्यातील कौशल्य सादर करण्याची ही स्पर्धा ऑलिम्पिक खेळासारखीच आहे. २ वर्षानी आयोजित केली जाणारी सदर जागतिक कौशल्य स्पर्धा सन २०२६ मध्ये शांघाई येथे आयोजित होणार आहे. याकरीता जिल्हा, विभाग, राज्य आणि देशस्तरावर स्पर्धा घेतली जाणार असून याद्वारे गुणवान कौशल्याधारक पात्र स्पर्धक निवडले जाणार आहेत. त्यानुसार सदर जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६ मधील जिल्हास्तरीय कौशल्य स्पर्धेकरीता पात्रता निकष खालीलप्रमाणे आहे. **पात्रता निकष –** १. जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६ करीता वयोमर्यादा हा एकमेव निकष ठरविण्यात आलेला आहे. २. यासाठी वयोमर्यादा : कमीत कमी १६ वर्षे जास्तीत जास्त दि. १ जानेवारी, २००४ किंवा तद्नंतरचा जन्म दिनांक असणे अनिवार्य आहे. ३. सदर स्पर्धा ६३ विविध कौशल्य क्षेत्रांसाठी आयोजित करण्यात आली आहे. ४.स्पर्धतील सहभागासाठी उमेदवारांनी https://www.skilindiadigital.gov.in या लिंकवर भेट देवुन दि. ३०.०९.२०२५ पर्यंत नोंदणी करून आपला सहभाग निक्षित कराया. जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६ साठी जिल्हा, विभाग, राज्य आणि देश पातळीवरून प्रतिभासंपन, कुशल उमेदवारांचे नामांकन करण्याच्या दृष्टीने आयोजित स्पर्धेकरीता सर्व शासकिय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, तंत्रनिकेतन महाविद्यालये, एमएसएमई टूल रूम्स, अभियांत्रिकी महाविद्यालये, विद्यापीठे, हॉस्पिटेलिटी इंस्टिट्यूट, स्किल ट्रेनिंग इंस्टीट्यूट, कला, वाणिज्य व विज्ञान शाखेची कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालये, इतर सर्व प्रशिक्षण संस्था यांनी विहीत वयोमर्यादेतील इच्छूक प्रतिभासंपत्र व कुशल उमेदवारांचे नामांकन या स्पर्धे साठी करावे असे आवाहन उप आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, विभागीय आयुक्तालय छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

# चेन स्नॅचिंग प्रकरणातील आरोपींना २४ तासांत अटक

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.११ सप्टेंबर – कन्नड शहर पोलीसांनी चेन स्नॅचिंग प्रकरणातील दोन आरोपींना अवघ्या २४ तासांत अटक करत झटपट आणि प्रभावी तपासाची दखल घेतली आहे.

फिर्यादी धनंजय रमेशराव भोसले (वय ३०, व्यवसाय - शेती, रा. सरस्वती कॉलनी, हुकुमचंद नगर, कन्नड) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दि.८ सप्टेंबर रोजी सायंकाळी सुमारे ६:२० वाजता खांडसरी परिसरातील राधा-कृष्ण कपड्याच्या दुकानाजवळून घरी निघाल्यानंतर नदीलगत रोडवर त्यांनी लघवीसाठी मोटारसायकल उभी केली होती. त्यावेळी अचानक मागून



आलेल्या एका अनोळखी व्यक्तीने त्यांच्या गळ्यातील सुमारे २.५ तोळ्यांची, अंदाजे २,७०,१७४ रुपये किंमतीची सोन्याची चैन हिसकावून नेली. त्यासोबत असलेल्या इतर दोन साथीदारांच्या मदतीने आरोपी मोटारसायकलवर पळून गेले.

या फिर्यादीनुसार पोलीस ठाणे कन्नड शहर येथे गु.र.नं. २५२/२०२५, कलम ३०४(२), ३(५) भा.न्या.सं. २०२३ नुसार तीन अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. तपासाची सूत्रे पोलीस निरीक्षक आर.बी. सानप यांच्या मार्गदर्शनाखाली, सहाय्यक पोलीस निरीक्षक कुणाल सूर्यवंशी आणि पोलीस अंमलदार विजय चौधरी यांनी हाती घेतली.

तपास दरम्यान घटनास्थळाच्या आसपास असलेल्या ७ ते ८ सीसीटीव्ही फुटेज आणि इतर तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपी निष्पन्न करण्यात आले. त्यानुसार १० सप्टेंबर २०२५ रोजी दोन आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून चोरीची सोन्याची चैन जप्त करण्यात आली आहे. पुढील तपास करून आरोपींना न्यायालयात हजर करण्याची तयारी सुरू आहे.

ही यशस्वी कारवाई पोलीस अधिक्षक डॉ. विनयकुमार राठोड, अप्पर पोलीस अधिक्षक अन्नपूर्णा सिंह, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिनेशकुमार कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पोलीस निरीक्षक आर.बी. सानप यांच्या आदेशाने पार पडली. कन्नड शहर पोलीसांच्या या तत्पर आणि काटेकोर कारवाईमुळे नागरिकांमध्ये पोलिसांबद्दल विश्वास वाढला आहे.

# आदर्श बहिरगाव ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी रत्नाबाई पवार बिनविरोध

तभा वृत्तसेवा

कन्नड – दि.११ सप्टेंबर –

आदर्श परंपरेला साजेसं ठरत बहिरगाव येथील ग्रामपंचायतीच्या विशेष सभेत उपसरपंचपदाची निवड बिनविरोध पार पडली. उपसरपंच म्हणून रत्नाबाई भाऊसाहेब पवार यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

यापूर्वी अडीच वर्षे उपसरपंच पदाचा यशस्वी कारभार सांभाळणारे रवींद्र बनकर यांनी स्वेच्छेने दिलेल्या राजीनामामुळे रिक्त झालेले पद भरण्यासाठी ही निवड प्रक्रिया राबविण्यात आली. निवडणूक निरीक्षक म्हणून मंडळ



अधिकारी पी. एस. सुरवसे, सहायक म्हणून ग्रामपंचायत अधिकारी योगेश घाटबळे आणि ग्राम महसूल अधिकारी किशोर निकम यांनी काम पाहिले.

निवडीदरम्यान सरपंच डॉ. केशव शिरसे, ग्रामपंचायत सदस्य योगेश जाधव, मिलिंद मोरे, रवींद्र बनकर, रोहिणी पवार, कोमल दापके, रोहिणी साळुंखे, सीमा जाधव, कौतिकराव पवार, शिरसे नाना, कुशिनाथ दापके, अशोक पवार, विश्वनाथ राऊत, किशोर सोनवणे, ज्ञानेश्वर पवार, चंद्रकांत (पिनू) पवार, संजय सोनवणे, बबन पवार, राजू जाधव, शंकर दापके, कैलास दापके यांसह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

ग्रामपंचायतीच्या कार्यपद्धतीत पारदर्शकता व सलोखा राखत झालेली ही निवड गावाच्या आदर्श परंपरेला पूरक ठरली. ग्रामविकासाच्या पुढील कामांसाठी नागरिकांमध्ये उत्साह व समाधानाचे वातावरण निर्माण झाले.

# जय भवानी रास दांडिया तर्फे जागर आई दुर्गेचा

तभा वृत्तसेवा

पैठण दि ११:- पैठण शहरातील भवानी नगर भागातील जय भवानी रास दांडिया उत्सव २०२५ च्या मावळत्या अध्यक्ष रोहिणी गणपत मिटकर यांच्या अध्यक्षतेखाली व माजी नगराध्यक्ष सोमनाथदादा परदेशी यांच्या प्रमुख उपस्थितीत सर्वानुमते वनिता प्रकाश सोनवणे यांची २०२५ नवरात्र उत्सव च्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली यंदा नवरात्र उत्सव २२ सप्टेंबर २०२५ सोमवार ला सुरुवात होत असल्याने भवानीनगर भागातील छत्रपती संभाजीराजे अभ्यासिका मैदान येथे फक्त महिलांसाठी



दिनांक २३ सप्टेंबर २०२५ ते १ ऑक्टोबर २०२५ पर्यंत रास दांडिया उत्सव साजरा होणार आहे नवनिर्वाचित अध्यक्ष चे स्वागत संयोजक वैशाली परदेशी व सर्व पदाधिकारी यांनी केले यावेळी संस्थापक अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष सोमनाथदादा परदेशी यांनी या रास दांडिया फक्त महिलांसाठी व या कार्यक्रमास मोठ्या सुरक्षा पुरवली जाईल रास दांडिया दरम्यान दररोज भरमसाठ बक्षसांची लाय लूट करण्याची सुवर्णसंधी महिलांसाठी असल्याने महिलांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले. व विशेष ज्या महिलांना व मुलींना दांडिया व गरबा खेळता येत नाही अशा महिलांसाठी व मुलींसाठी जय भवानी रास दांडिया तर्फे दांडिया पूर्व सराव १३ सप्टेंबर पासून अनुभवी प्रशिक्षकांच्या उपस्थितीत ठेवण्यात आला असल्यामुळे ज्या मुलींना व महिलांना दांडिया खेळता येत नाही अशांना त्याचा निश्चित फायदा होईल अशी माहिती संयोजक वैशाली परदेशी यांनी दिली यावेळी जय भवानी रास दांडिया च्या सर्व पदाधिकारी व महिला उपस्थित होत्या.

# जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश, (क. स्तर) न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. औरंगाबाद.**

सिव्हील एम ए.क. ६०२/२०२५ प्रकरणात पु. ता. दि २८/१०/२०२५

अर्जदार : १) हीराबाई थ. रंगनाथ प्रेमभरे, वय ६२ वर्ष, चंदा घरकाम, रा. विठ्ठल मंदिर जवळ, ब्राम्हण गल्ली, गंगापुर ता. गंगापुर जि. औरंगाबाद २) उज्वला भ. किशोर शिंदे, वय ३९ वर्ष, धंदा घरकाम, रा. घर क बी ५७, गजानन कॉलनी, सद्गुरू तेल भांडार मागे, गारखेडा, ता. जि. औरंगाबाद ३) उर्मिला भ्र. स्वरूप नागले, वय ३७ वर्ष, धंदा घरकाम, रा. घर क १०४७, एम जी ोड, राम मंदिर जवळ तेलीखुतनगर अहमदनगर ता. जि. अहमदनगर ४) ऋषिकेश पि. रंगनाथराव प्रेमभरे, वय २६ वर्ष, धंदा शिक्षण, रा. जुनी महाराष्ट्र बँके जवळ, ब्राम्हण गल्ली, गंगापुर ता. गंगापुर जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे बाबत

सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी या न्यायालयात ॲड. एस. आर. जोशी गंगापुर यांच्यामार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे कामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क १ ते ४ हे वरील नमुद ठिकाणचे कायमस्वरूपी राहणारे असुन अर्जदार क १ हि अर्जदार क २ ते ४ यांची आई आहे. तसेच अर्जदार क २ ते ४ हे आपसात नात्याने सख्खे बहिनी व भाउ आहेत. अर्जदार क १ चे पति व अर्जदार क २ ते ४ यांचे वडील नामे रंगनाथ बंडुजी प्रेमभरे हे दि. ०६/०८/२०२५ रोजी मौजे गंगापुर ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मयत झालेले आहे. मयतास अर्जदार क १ हि पत्नी व अर्जदार क २ व ३ हया विवाहीत मुली व अर्जदार क ४ हा मुलगा कायदेशीर वारसदार असुन त्याच्या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयत रंगनाथ बंडुजी प्रेमभरे यांना अर्जदार क १ ते ४ हेच कायदेशीर वारसदार आहे. अर्जदारांच्या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही वारसदार नाही. मयत रंगनाथ बंडुजी प्रेमभरे यांच्या मृत्यु मुळे अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे करीता सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर

आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही. करीता जाहीर प्रगटन. शिक्कया मिशी दिले. ११/९/२०२५ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या

आदेशावरून

लिपीक | सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापुर

## अग्रलेख...

# नेपाळी उद्रेकाचा अन्वयार्थ

**'प्रजा सुखे सुखं राज्ञः प्रजानांच हिते हितम् ।**
**नात्मप्रियं प्रियं राज्ञः प्रजानां तु प्रियं प्रियम् ॥'**

अर्थात, प्रजेच्या सुखात राजाचे सुख आहे आणि प्रजेच्या हितातच राजाचे हित आहे. राजाला त्याचे स्वतःचे असे काहीच प्रिय नाही, प्रजेला जे प्रिय तेच त्यालाही प्रिय आहे. नेपाळचे पंतप्रधान के. पी. ओली यांना कदाचित या तत्त्वाचे विस्मरण झाले असावे. आता नेपाळात राजेशाही नाही; पण तेथील राजसत्तेची मुळं अद्याप सैल झालेली नाहीत. अगदीच अलिकडच्या काळापर्यंत तिकडे राजेशाही होती. ती कोणत्या ना कोणत्या स्वरूपात परत यावी असे सर्व नेपाळी नागरिकांना वाटत असेल, असे ठामपणे म्हणता येत नाही. मात्र, तसे असेल आणि नसेल तरी सध्या जे काही नेपाळात सुरू आहे, ते तेथील लोकशाही यंत्रणेचे मोठे अपयशच म्हटले पाहिजे. 'राजा आऊ, देश बचाऊ' या तेथील जनतेच्या आक्रमक भूमिकेने नव्याने स्थापित लोकतंत्राचे अक्षरशः वाभाडे काढले. कारण लोकनेते सम्राटांसारखे वागू लागले आणि त्यातून प्रचंड भ्रष्टाचाराचे दर्शन जनतेला होऊ लागले. हळूहळू जनक्षोभ वाढत होताच. समाजमाध्यमांवर बंदी हे केवळ तेथील जनआंदोलन पेटण्याचे तात्कालिक कारण होते. खरा क्रोधाग्नी नेपाळात फार आधीपासून धगधगत होता. आताचा उद्रेक इतका भीषण होता की, थेट संसदेला आग लावली गेली. राष्ट्रपती, गृहमंत्री आणि परराष्ट्रमंत्र्यांची घरे जाळली गेली. मंत्र्यांना सामान्य लोकांनी धावून-धावून मारले. एका माजी पंतप्रधानांच्या घराला लावलेल्या आगीत त्यांच्या पत्नीचा होरपळून मृत्यू झाला.

नेपाळचा इतिहास जेवढा समृद्ध तितकाच तो गुंतागुंतीचाही. त्यात विविध राजवंश, साम्राज्यशाही आणि लोकशाही चळवळींचा प्रभाव दिसून येतो. आधुनिक नेपाळचा उदय हा शाह राजवंशाच्या माध्यमातून होत गेला. पृथ्वी नारायण शाह या काळातील सर्वांत महत्त्वाची व्यक्ती. त्यांनी १७६८ मध्ये काठमांडू खोऱ्यातील मल्ल राजांना पराभूत करून नेपाळचे एकीकरण केले आणि शाह राजवंशाची स्थापना केली. त्यांनीच नेपाळला मजबूत आणि एकात्म राष्ट्र म्हणून स्थापित केले. पुढे जंग बहादूर राणांनी बंड करून सत्ता हस्तगत केली आणि वंशपरंपरागत पंतप्रधान व्यवस्थेची रुजुवात केली. या काळात राजा नाममात्र शासक बनला आणि खरी सत्ता राणा पंतप्रधानांच्या हाती आली. खरे तर ही हुकूमशाहीच होती. ती १९५१ पर्यंत चालली. भारताच्या स्वातंत्र्यामुळे आणि जगभरातील लोकशाहीच्या उदयाने प्रभावित होऊन, नेपाळच्या जनतेनेही राणा राजवटीविरुद्ध बंड पुकारले. राजा त्रिभुवन यांनी त्या राजवटीचा अंत केला आणि संसदीय लोकशाही आणि संवैधानिक राजेशाही असा प्रवास सुरू झाला. मात्र, १९६० मध्ये राजा महेंद्र यांनी लोकशाही सरकार बरखास्त केले आणि पंचायती शासन व्यवस्था सुरू केली. त्याच्या निषेधार्थ १९९० मध्ये मोठे जनआंदोलन झाले. बहुपक्षीय लोकशाही आली. तरीही राजेशाही काही संपली नव्हती. २००५ मध्ये राजा ज्ञानेंद्र यांनी सर्व सत्ता आपल्या हाती घेतली. त्यामुळे जनतेचा रोष वाढला. राजकीय पक्ष आणि माओवाद्यांच्या सहकार्याने मोठे जनआंदोलन पुन्हा उभे झाले आणि राजा ज्ञानेंद्र यांना संसद बहाल करावी लागली. अखेर २००८ मध्ये नेपाळच्या संविधान सभेने सुमारे अडीचशे वर्षे जुनी राजेशाही संपवण्याचा निर्धार केला आणि नेपाळला संघीय लोकशाही प्रजासत्ताक घोषित केले. राजा ज्ञानेंद्र राजवाडा सोडून गेले.

ही पृष्ठभूमी लक्षात घेऊन वर्तमान समजून घ्यावे लागते आणि या घटिताचे अन्वयार्थ काढावे लागतात. इतक्या लहान देशात कळीचा मुद्दा असतो विकासाचा. तो होत नसेल, राज्यकर्ते भ्रष्ट असतील, नागरिकांचे शोषण करून आपले घर भरत असतील तर जनतेच्या मनात रोष उफाळतो. तो आजकाल प्रामुख्याने समाजमाध्यमांतून बाहेर पडतो आणि तोही मार्ग बंद झाला की, मग आक्रोशाचा बांध जोरात फुटतो आणि नेपाळात जे झाले ते घडते. आंदोलन रोखण्यासाठी सरकारी यंत्रणेने गोळीबार केला. त्यात २२ तरुणांचा बळी गेला आणि जनतेच्या रागाने परमोच्च बिंदू गाठला. गेल्या पाच-सात वर्षांत भारताच्या शेजारी असलेल्या अनेक राष्ट्रांमध्ये विविध प्रकारच्या आंदोलनांनी तिथल्या सत्तेचे अगदी तीन तेरा वाजवले. पाकिस्तान-अफगाणिस्तानपासून ही मालिका सुरू होते. मग म्यानमार, श्रीलंका, बांगलादेश आणि आता नेपाळ. बांगलादेशप्रमाणे नेपाळात निर्माण झालेल्या अराजकासाठीही बाहेरील महाशक्ती कारणीभूत आहे, असा युक्तिवाद होत आहे. तो खरा असो-नसो, पण या उद्रेकाची पृष्ठभूमी व निमित्त दृष्टिआड करता येत नाही. तिथल्या राज्यकर्त्यांबद्दल पराकोटीची घृणा लोकांमध्ये, विशेषतः तरुणाईच्या मनात आहे. त्याचेच दृश्य रूप या उद्रेकात दिसले. कोणतेच राज्यकर्ते १०० टक्के जनतेला समाधानी करू शकत नाहीत. त्यामुळे सरकारवर टीका-टिप्पणी होणे स्वाभाविकच. अशाही स्थितीत शांतपणे मार्ग काढायचा असतो. लोकांच्या मनातील असमाधानाची-रागाची वाफ कोणत्या तरी माध्यमातून निघू द्यायची असते. नेपाळी सरकारने सोशल मीडियावर निर्बंध लादल्यामुळे त्या रागाचा थेट अराजकाच्या स्वरूपात विस्फोट झाला. नेपाळात जे काही घडले, त्यात प्रामुख्याने दोष आहे तो तिथल्या सत्ताधाऱ्यांचा. परकीय शक्ती तेव्हाच हस्तक्षेप करू शकतात, जेव्हा त्यांना कुठे तरी फट सापडते. ती त्यांना नेपाळात सापडली असावी. भारताच्या शेजारील राष्ट्रांमध्ये असे सगळे घडत असताना आपल्या देशाचे वेगळेपण ठळकपणे नजरेत भरते. राष्ट्र म्हणून आपण सारे एक असल्याचा भाव आणि संवैधानिक माध्यमातूनच आपले म्हणणे मांडले पाहिजे, ही समज हे भारतीय समाजाचे व्यवच्छेदक लक्षण. भारत नेहमी एक राष्ट्र म्हणूनच जगला आहे. कोणत्याही देशात अराजकता निर्माण होण्याचे मुख्य कारण त्या देशातील विकासाची कुंठितावस्था हे असते. दीडशे कोटींचा भारत हा वैविध्यात एकता शोधणाऱ्यांचा देश. तो अंतर्गत मतभेदांसह जागतिक स्तरावरील दादा लोकांना पुरून उरलेला आहे. विकासाच्या मार्गावर भारताची घोडदौड अवघ्या जगाला आश्चर्यचकित करणारी आहे. तिसरी आर्थिक महासत्ता होण्याच्या दिशेने सुरू असलेली वाटचाल या देशाच्या समृद्धीची साक्ष देत आहे. भारतातील जनतेला, गरजूंना त्या समृद्धीचा वाटा मिळत आहे. परंतु, लोकक्षोभ कसा निर्माण होतो आणि त्याचा स्फोट झाला की काय घडते, हे सर्व पक्षांतील पुढाऱ्यांनी-मंत्र्यांनी-लोकप्रतिनिधींनी व बड्या अधिकाऱ्यांनी नेपाळच्या निमित्ताने अभ्यासलेच पाहिजे. नेपाळी लोकांचा राग सत्ताधाऱ्यांच्या भ्रष्टाचारावर, बव्हंशी लोक गरिबीत जीवन कंठत असताना चाललेल्या सत्ताधीशांच्या व त्यांच्या कुटुंबीयांच्या छानछोकीवर, रोजगाराबद्दलच्या उदासीनतेवर आहे. त्या रागाचा उद्रेक झाला. आपल्या बाबतीत लोकांची अशी काही नाराजी आहे काय, याचा अंदाज सर्व पक्षांतील पुढारी-मंत्री-लोकप्रतिनिधी, सरकारचे बडे अधिकारी अशा सर्वांनी घेतला पाहिजे आणि तसे काही असेल तर सुधारले पाहिजे.

सामाजिक असमाधानाची नोंद घेणाऱ्या व्यवस्थेबद्दल फारसा आक्रोश नसतो. सुदैवाने भारतात जनभावनांचा आदर करणारे, जनकल्याणाचे ब्रीद घेतलेले सरकार सत्तेत आहे. गेल्या दशकभरात भारताने विविध क्षेत्रांत जी काही मजल मारली, त्यामुळे देशाची मोठी प्रगती झाली. अर्थकारण मजबूत झाले. महिला, युवक, बालके, गरीब, मजूर, उद्यमशील युवा अशा विविध वर्गांना दिलासा देणाऱ्या योजना सुरू आहेत. दिव्यांगांचा विशेष विचार होतोय. त्यांना मदत केली जाते आहे. देशाच्या विकासात लक्ष घालतानाच जागतिक दादांना आव्हान देण्याची ताकद भारताने कमावली आणि तरीही अंतर्गत व आंतरराष्ट्रीय शांततेलाच प्राधान्य दिले. भारतातील शांतता व स्थैर्य हेच त्याच्या प्रगतीचे खरे रहस्य होय. भारताच्या या घोडदौडीला नख लावण्यासाठी काही प्रवृत्ती टपलेल्या आहेतच, हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. आपल्या देशातील शांतता व स्थैर्य हेच आपल्या प्रगतीचे खरे भांडवल आहे, याची खूणगाठ बांधून ठेवली पाहिजे. शांततेच्या विरोधात वागणाऱ्याला शत्रू मानले पाहिजे. सारांश, साऱ्या भारतीयांनी काळाच्या पुढल्या हाका ऐकत सदैव सावध राहिले पाहिजे!

---

## प्रासंगिक



**नरेंद्र मोदी**
**पंतप्रधान**

# डॉ. मोहनजी भागवत 'वसुधैव कुटुंबकम्'चे साधक, राष्ट्रनिर्माणाचे मार्गदर्शक

आज ११ सप्टेंबर. खरे तर हा दोन परस्परविरोधी घटनांचे स्मरण करून देणारा दिवस. यापैकी पहिली घटना म्हणजे १८९३ सालची. त्यावेळी स्वामी विवेकानंदांनी शिकागोमध्ये आपले ऐतिहासिक भाषण केले होते. 'अमेरिकेतील माझ्या बंधू आणि भगिनींनो', आपल्या भाषणातील या अवघ्या काही शब्दांनी त्यांनी सभागृहात उपस्थित हजारो लोकांची मने जिंकली होती. त्यांनी भारताच्या शाश्वत आध्यात्मिक परंपरेची आणि विश्वबंधुत्वाच्या तत्त्वाची जगाला ओळख करून दिली. आता दुसरी घटना म्हणजे ९/११ च्या क्रूर दहशतवादी हल्ल्यांची. खरे तर, दहशतवाद आणि कट्टरतेच्या धोक्यामुळे याच विश्वबंधुत्वाच्या तत्त्वावर हल्ला झाला होता.

या दिवसाची दखल घ्यायला लावणारी आणखी एक बाब म्हणजे, आज एका अशा व्यक्तिमत्त्वाचा वाढदिवस आहे, ज्यांनी 'वसुधैव कुटुंबकम्' या तत्त्वाने प्रेरित होऊन आपले संपूर्ण जीवन सामाजिक परिवर्तन तसेच सलोखा आणि बंधुभाव वृद्धिंगत करण्यासाठी समर्पित केले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी जोडलेले लाखो लोक, त्यांचा परमपूज्य सरसंघचालक असाच आदरभावपूर्ण उल्लेख करतात. होय, मी डॉ. मोहनजी भागवत यांच्याबद्दलच बोलतोय. महत्त्वाचा योगायोग असा की राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आपली शताब्दी साजरी करत असलेले वर्ष त्यांच्याही ७५ व्या वाढदिवसाचे वर्ष आहे. मी त्यांना खूप खूप शुभेच्छा देतो आणि त्यांच्या दीर्घायुष्यासाठी तसेच उत्तम आरोग्यासाठी प्रार्थना करतो.

माझे मोहनजींच्या कुटुंबाशी अगदी जवळचे संबंध आहेत. मोहनजींचे वडील कैलासवासी मधुकरराव भागवत यांच्यासोबत मला जवळून काम करण्याचे अहोभाग्य लाभले. माझ्या 'ज्योतीपुंज' या पुस्तकात मी त्यांच्याबद्दल अगदी सविस्तर लिहिले आहे. कायद्याच्या क्षेत्राशी संबंधित असूनही, त्यांनी राष्ट्रनिर्माणासाठी स्वतःला वाहून घेतले होते. गुजरातमध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला बळकटी देण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. मधुकरराव यांची राष्ट्रनिर्माणासाठीची तळमळ इतकी होती की, त्यांनी आपला मुलगा असलेल्या मोहनजी यांची जडणघडणच भारताच्या पुनरुत्थानासाठी केली होती. जणू काही स्वतः पारसमणी असलेल्या मधुकररावांनी मोहनजींच्या रूपात दुसरा पारसमणीच घडवला होता. मोहनजी हे १९७० च्या दशकाच्या मध्यात संघाचे प्रचारक बनले. प्रचारक हा शब्द ऐकल्यावर एखाद्याला, कदाचित प्रचारक म्हणजे केवळ प्रचार करणारा किंवा मोहीम चालवणारा किंवा विचारांचा प्रचार, प्रसार करणारी व्यक्ती असे वाटू शकते. परंतु जे कोणी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यपद्धतीशी परिचित आहेत, त्यांना याची जाणीव आहे की, प्रचारकांची ही परंपरा संघटनेच्या कार्याचा गाभा आहे. गेल्या शंभर वर्षांमध्ये, देशभक्तीच्या भावनेने प्रेरित होऊन हजारो तरुणांनी भारत प्रथम हे ध्येय साध्य करण्यासाठी आपले घरदार आणि कुटुंबाचा त्याग करत, आपले आयुष्य समर्पित केले आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघातील त्यांची सुरुवातीची वर्षे भारतीय इतिहासातील एका अतिशय काळ्या कालखंडात गेली. याच काळात तत्कालीन काँग्रेस सरकारने देशावर कठोर आणिबाणी लादली होती. लोकशाही तत्त्वांना महत्त्व देणाऱ्या आणि भारत समृद्ध व्हावा अशी इच्छा असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीसाठी आणिबाणीविरोधी चळवळ बळकट करणे स्वाभाविक होते. मोहनजी आणि असंख्य स्वयंसेवकांनी नेमके हेच केले. त्यांनी महाराष्ट्राच्या ग्रामीण आणि मागास भागात, विशेषतः विदर्भात व्यापक प्रमाणात काम केले. यामुळे गरीब आणि दलितांना भेडसावणाऱ्या आव्हानांची त्यांना जाणीव झाली. गेल्या काही वर्षांमध्ये भागवतजींनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघात विविध पदे भूषवली. यातील प्रत्येक कर्तव्य त्यांनी अत्यंत कौशल्याने पार पाडले. १९९० च्या दशकात अखिल भारतीय शारीरिक प्रमुख म्हणून



मोहनजी यांच्या कार्याचे आजही अनेक स्वयंसेवक स्नेहपूर्वक स्मरण करतात. या काळात त्यांनी बिहारच्या गावांमध्ये काम करताना अमूल्य वेळ व्यतीत केला. या अनुभवांमुळे तळागाळातील समस्यांशी ते अधिक खोलवर जोडले गेले. २००० मध्ये ते सरकार्यवाह झाले आणि येथेही त्यांनी आपल्या कामाच्या अनोख्या शैलीने कठीण परिस्थिती सहजतेने आणि अचूकतेने हाताळली. २००९ मध्ये ते सरसंघचालक बनले आणि आजही ते अतिशय उत्साहाने काम करत आहेत.

सरसंघचालक असणे ही केवळ संघटनात्मक जबाबदारी नाही. असाधारण व्यक्तींनी वैयक्तिक त्याग, उद्देशाची स्पष्टता आणि भारतमातेप्रति अतूट समर्पणासह ही भूमिका पार पाडली आहे. मोहनजी यांनी जबाबदारीच्या विशालतेला पूर्ण न्याय देण्याबरोबरच, स्वतःची ताकद, बौद्धिक खोली आणि सहृदय नेतृत्व याचीही जोड दिली आहे, जे सर्व राष्ट्र प्रथम या तत्त्वाने प्रेरित आहे. जर मोहनजींनी त्यांच्या हृदयात जपलेल्या आणि त्यांच्या कार्यशैलीत आत्मसात केलेले दोन गुण मी आठवायचे म्हटले तर ते आहेत, सातत्य आणि जुळवून घेणे. त्यांनी नेहमीच अतिशय कठीण प्रसंगांमध्ये संघटनेचे नेतृत्व केले आहे, आपल्या सर्वांना अभिमान असलेल्या मुख्य विचारसरणीशी कधीही तडजोड केली नाही आणि त्याच वेळी समाजाच्या उदयोन्मुख गरजा पूर्ण केल्या आहेत. त्यांचे तरुणाईशी अगदी सहज नाते आहे. आणि म्हणूनच, त्यांनी नेहमीच अधिकाधिक तरुणांना संघ परिवारात सामील करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. ते अनेकदा सार्वजनिक भाषणात आणि लोकांशी संवाद साधताना दिसतात, जे आजच्या गतिमान आणि डिजिटल जगात खूप लाभदायक ठरले आहे.

व्यापकपणे सांगायचे तर, संघाच्या १०० वर्षांच्या प्रवासातील भागवतजींचा कार्यकाळ हा सर्वांत परिवर्तनकारी कालखंड मानला जाईल. गणवेशातील बदलापासून ते शिक्षा वर्गांमध्ये (प्रशिक्षण शिबिरांमध्ये) सुधारणा करण्यापर्यंत, त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक महत्त्वपूर्ण बदल झाले. खास करून कोविड काळात मोहनजींनी केलेले प्रयत्न मला आठवतात, जेव्हा मानवजातीने आयुष्यात पहिल्यांदाच अशा महामारीचा सामना केला होता. त्या काळात, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पारंपरिक उपक्रम सुरू ठेवणे आव्हानात्मक बनले होते. मोहनजींनी तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्याचा सल्ला दिला. जागतिक आव्हानांच्या संदर्भात, संस्थात्मक चौकटी विकसित करताना ते जागतिक दृष्टिकोनांशी निगडित होते. त्या वेळी, सर्व स्वयंसेवकांनी स्वतःच्या आणि इतरांच्या सुरक्षिततेची सुनिश्चिती करताना गरजू लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी शक्य तितके प्रयत्न केले. अनेक ठिकाणी वैद्यकीय शिबिरे भरवण्यात आली. आम्ही आमचे अनेक कष्टकरी स्वयंसेवक देखील गमावले, परंतु मोहनजी यांची प्रेरणा अशी होती की त्यांचा दृढनिश्चय कधीही डगमगला नाही.

या वर्षारंभी, नागपुरातील माधव नेत्र चिकित्सालयाच्या उद्घाटनादरम्यान, मी असे म्हटले होते की, संघ हा अक्षयवटासारखा आहे, एक शाश्वत वटवृक्ष जो आपल्या देशाच्या राष्ट्रीय संस्कृती आणि सामूहिक चेतनेला ऊर्जा देतो. मूल्यांमध्ये रुजवण झाल्याने या अक्षयवटाची मुळे खोलवर आणि मजबूत आहेत. डॉ. मोहनजी भागवत यांनी या मूल्यांचे संवर्धन आणि प्रसारासाठी ज्या आत्मीयतेने स्वतःला समर्पित केले आहे ते खरोखरच प्रेरणादायी आहे.

मोहनजींच्या व्यक्तिमत्त्वाचा आणखी एक प्रशंसनीय गुण म्हणजे त्यांचा मृदुभाषी स्वभाव. श्रवणाची अपवादात्मक क्षमता त्यांना लाभली आहे. हा पैलू सखोल दृष्टिकोन सुनिश्चित करण्याबरोबरच त्यांच्या व्यक्तिमत्त्वात आणि नेतृत्वात संवेदनशीलता आणि प्रतिष्ठेची भावना देखील आणतो.

विविध जनआंदोलनांमध्ये त्यांनी नेहमीच दाखवलेल्या औत्सुक्याविषयी देखील मला इथे व्यक्त व्हायचे आहे. स्वच्छ भारत मिशनपासून ते बेटी बचाओ बेटी पढाओपर्यंत सर्वच चळवळींद्वारे जोम वाढवण्याचे आवाहन ते नेहमीच संपूर्ण राष्ट्रीय स्वयंसेवक परिवाराला करतात. सामाजिक कल्याणाला वाव देण्यासाठी, सामाजिक सुसंवाद, कौटुंबिक मूल्ये, पर्यावरण जागरूकता, राष्ट्रीय हित आणि नागरी कर्तव्ये यांचा समावेश असलेले 'पंच परिवर्तन' मोहनजींनी मांडले. हे सर्व क्षेत्रांतील भारतीयांना प्रेरणा देऊ शकतात. प्रत्येक स्वयंसेवक एक मजबूत आणि समृद्ध राष्ट्र घडण्याचे स्वप्न पाहतो. हे स्वप्न साकार करण्यासाठी, स्पष्ट दृष्टिकोन आणि निर्णायक कृती दोन्ही आवश्यक आहेत. मोहनजी या दोन्ही गुणांनी परिपूर्ण आहेत.

भागवतजी हे नेहमीच 'एक भारत श्रेष्ठ भारत' या तत्त्वाचे खंदे पुरस्कर्ते राहिले आहेत, भारताच्या विविधतेत आणि आपल्या भूमीचा एक अविभाज्य भाग असलेल्या अनेकविध संस्कृती आणि परंपरांवर त्यांना गाढ विश्वास आहे. त्यांच्या अत्यंत व्यस्त अशा वेळापत्रकात देखील मोहनजी संगीत आणि गायन हे आपले छंद जोपासण्यासाठी खास वेळ काढतात. कित्येक भारतीय संगीत वाद्ये वाजवण्यात ते पारंगत असल्याचे फार थोड्या लोकांना माहीत असावे. त्यांची वाचनाची आवड त्यांच्या अनेक भाषणांमधून आणि संवादातून दिसून येते. यावर्षी, अगदी थोड्याच दिवसात राष्ट्रीय स्वयंसेवक संघ शताब्दी पूर्ण करणार आहे. यावर्षी विजयादशमी, गांधी जयंती, लाल बहादूर शास्त्री जयंती आणि रा. स्व. संघाचा शताब्दी सोहळा एकाच दिवशी येत असून हा उत्तम योगायोग आहे. संघाशी निगडित असलेल्या भारतातातील आणि परदेशातील लाखो लोकांसाठी हा एक ऐतिहासिक क्षण असेल आणि आम्हाला या काळात संघटनेला मार्गदर्शन करणारे अतिशय सुज्ञ आणि कठोर परिश्रम करणारे सरसंघचालक म्हणून मोहनजी लाभले आहेत. मोहनजी वसुधैव कुटुंबकम् या विचारधारेचे मूर्तिमंत उदाहरण असून जेव्हा जेव्हा आपण या सीमारेषा ओलांडतो आणि सर्वांना आपले मानतो तेव्हा समाजात विश्वास, बंधुभाव आणि समता वाढीस लागते, हे सांगून मी समारोप करतो. मी पुन्हा एकदा मोहनजींना मातृभूमीची सेवा करण्यासाठी दीर्घ आणि आरोग्यमय आयुष्य लाभो अशा शुभेच्छा देतो.

---

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# फसवणुकीचे जाळे आणि आपली असहायता

मंत्रालयासारख्या सुरक्षेच्या भक्कम किल्ल्यात, जिथे प्रत्येक पावलावर ओळखपत्र, परवानगी आणि तपासणी लागते, तिथेच काही गुन्हेगारांनी बनावट मुलाखती घेऊन शेकडो तरुणांची फसवणूक केली, हे ऐकून माणूस सुन्न होतो. मंत्रालयातल्या कक्षांमध्ये बाके लावून, पाट्या ठोकून, अगदी वैद्यकीय तपासणीसाठी रुग्णालयात पाठवून हजारो-लाखो रुपये उकळले गेले. उमेदवारांना नेमणूक पत्रे दिली गेली, राज्यपालांच्या आणि प्रधान सचिवांच्या बनावट स्वाक्षऱ्या दाखवून विश्वास बसवला गेला. एवढे सर्व काही घडले आणि तरुणांच्या स्वप्नांचा चुराडा झाला. ही कहाणी केवळ काही जणांच्या फसवणुकीपुरती मर्यादित नाही. ही आपल्या समाजातील खोलवर रुतलेल्या लालसेची, असहायतेची आणि भीतिविरहित गुन्हेगारीची कहाणी आहे.

आजच्या तरुणाच्या डोळ्यांत एकच स्वप्न असते, ते म्हणजे सरकारी नोकरी. कारण ती नोकरी म्हणजे स्थैर्य, समाजात मान, घरच्यांचा अभिमान. पण या स्वप्नांचा गैरफायदा घेऊन गुन्हेगारांनी अशी जाळी विणली की त्यातून सुटणे कठीण झाले. कित्येकांनी स्वतःची शेती विकली, कित्येकांनी घर गहाण टाकलं, कुणी कर्ज काढले, कुणी दागिने विकले आणि एवढे करून शेवटी मिळाले काहीच नाही. मुळात अशा घटना का घडतात? याचे उत्तर सोप आहे. कारण आपल्या समाजात गुन्हेगाराला भीतीच उरलेली नाही. त्याला ठावूक असते की थोडी फार जेलची हवा खाल्ली तरी राजकीय पाठबळ मिळेल, चौकशी लांबेल, न्यायालयीन प्रक्रिया वर्षानुवर्षे चालेल आणि त्यात तो परत बाहेर येईल. म्हणूनच तो बिनधास्त मंत्रालयातच मुलाखती आयोजित करतो, नियुक्तिपत्रे तयार करतो, पोलिसांवर दबाव आणतो. या निर्भयतेचे मूळ म्हणजेच रक्षणकर्त्यांचा धाक संपलेला आहे. कायद्याची भीती उरली नाही, त्यामुळेच गुन्हेगारांचा माज वाढत आहे. तरुणांच्या बाबतीतसुद्धा एक कटू सत्य आहे. नोकरीची धडपड इतकी वाढली आहे की कुठल्याही शॉर्टकटवर त्यांचा विश्वास बसतो. फलाण्याचा मंत्रालयात हात आहे, अमुक नेत्याने शब्द दिला आहे, इतके पैसे द्या, लगेच नेमणूक मिळेल, अशा वाक्यांना ते सहज बळी पडतात. ही लालसाच गुन्हेगारांसाठी मोठे शस्त्र ठरते. मेहनतीने परीक्षा पास करणे अवघड वाटते, वर्षानुवर्षे प्रतीक्षा करावी लागते, त्यामुळे शॉर्टकट आकर्षक वाटतो. पण हा शॉर्टकट शेवटी कायमस्वरूपी अंधारातच नेतो. राजकारणी आणि दलाल यांचे गाठोडे या खेळात कायम असते. काही वेळा नेत्याचे नाव फक्त वापरले जाते, तर काही वेळा थेट राजकीय आश्रय मिळतो. पैसा द्या आणि काम करून घेऊ ही संस्कृती इतकी पसरली आहे की लोक नोकरीचेही तसेच समजायला लागले आहेत.

या सगळ्या गोंधळात सर्वांत जास्त बळी ठरतो तो साधा तरुण. त्याच्या कष्टाचे, त्याच्या आशेचे, त्याच्या भविष्याचे मोल कुणालाही उरत नाही. त्याने जर फसवणूक झाल्याची तक्रार केली, तर पोलिसांकडे, समाजाकडे त्याला पुन्हा अपमान सहन करावा लागतो. अनेक वेळा तरुण तक्रारच करायला धजावत नाहीत. कारण गावात, समाजात हसू होईल, पैसे परत मिळणार नाहीत, उलट तूच मूर्ख आहेस अशी वागणूक मिळेल. अशा वातावरणामुळे गुन्हेगार आणखी धिटाईने वागतात. ही प्रवृत्ती थांबवायची असेल, तर रक्षणकर्त्यांचा धाक परत आणावा लागेल. गुन्हा केला की तुरुंगात डांबला जाईल, मालमत्ता जप्त होईल, आयुष्य उद्ध्वस्त होईल ही भीती समाजाच्या मनात परत निर्माण झाली पाहिजे. अभ्यास, मेहनत, पात्रता याशिवाय दुसरा कोणताही मार्ग नाही. पैशांनी मिळणारी नोकरी हा केवळ मृगजळ आहे आणि त्याचा शेवट आयुष्यभराच्या निराशेतच होतो. आज राज्यभर शेकडो तरुण फसवले गेले आहेत. उद्या हे प्रमाण वाढले, तर समाजातील असंतोष, निराशा, अन्यायाची भावना अधिक तीव्र होईल. बेरोजगारीच्या आगीवर या फसवणुकीचे तेल ओतले गेले, तर तरुण चुकीच्या मार्गावर वळतील. या परिस्थितीला थोपवण्यासाठी सरकारने, पोलिसांनी आणि समाजाने मिळून पावले उचलली पाहिजेत. राजकीय आश्रयाला पूर्णविराम दिला पाहिजे, पारदर्शक भरती प्रक्रिया काटेकोरपणे राबवली पाहिजे आणि दोषींना तत्काळ कठोर शिक्षा झाली पाहिजे. पण हे सर्व घडण्याआधी, प्रत्येक तरुणाने स्वतःच्या मनाशी एक करार केला पाहिजे. मी पैशाने नोकरी विकत घेणार नाही. मी मेहनतीने ती मिळवेन आणि कुणी मला फसवण्याचा प्रयत्न केला, तर मी त्याची तक्रार करेन. अशा स्वाभिमानी भूमिकेतूनच ही फसवणुकीची साखळी तुटेल. अन्यथा, लालचेच्या जाळ्यात अडकलेले आपले तरुण आयुष्यभर फसवणूक करणाऱ्यांच्या फासामध्ये अडकतील आणि आपण हातावर हात ठेवून पाहत राहू.

९९२२९९९५८८

---

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# उपराष्ट्रपती निवडणुकीतील क्रॉस व्होटिंग

देशाचे नवे उपराष्ट्रपती म्हणून अपेक्षेप्रमाणे रालोआचे चंद्रपूरम् पोन्नुसामी (सी. पी.) राधाकृष्णन् यांची निवड झाली. या निवडणुकीत संख्याबळाच्या आधारावर राधाकृष्णन् यांचा विजय निश्चित होता. ते किती मतांनी विजयी होतील, एवढाच काय तो मुद्दा होता. काँग्रेसच्या नेतृत्वातील इंडिया आघाडीलाही याची कल्पना होती. आपण जिंकणार नाही, याची पूर्ण खात्री असतानाही काँग्रेसने सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती बी. सुदर्शन रेड्डी यांची उमेदवारी जाहीर केली. सुदर्शन रेड्डी यांची उमेदवारी जिंकण्यासाठी नाही तर इंडिया आघाडी एकसंध आहे, हे दाखवण्यासाठी जाहीर करण्यात आली होती. मात्र इंडिया आघाडीचा दोन्ही आघाड्यांवर पराभव झाला. बी. सुदर्शन रेड्डी यांचा पराभव तर अपेक्षित होता, पण इंडिया आघाडीत मोठ्या प्रमाणात क्रॉस व्होटिंगही झाले. आघाडीतील काही जणांनी रालोआचे उमेदवार राधाकृष्णन् यांना मतदान केले.

उपराष्ट्रपतींची निवडणूक यावेळी अनेक अर्थाने लक्षणीय ठरली. रालोआचे राधाकृष्णन् यांनी बी. सुदर्शन रेड्डी यांचा १५२ मतांनी पराभव केला. राधाकृष्णन् यांना ४५२ तर रेड्डी यांना ३०० मते मिळाली. लोकसभा तसेच राज्यसभेच्या ७८१ खासदारांना या निवडणुकीत मताधिकार होता. त्यामुळे विजयासाठी ३९१ मते आवश्यक होती. भारत राष्ट्र समितीच्या ४, बिजू जनता दलाच्या ७ तर पंजाबमधील शिरोमणी अकाली दलाच्या एक आणि दोन अपक्ष अशा १४ सदस्यांनी मतदानात सहभागी न होण्याची घोषणा आधीच केली होती. त्यामुळे प्रत्यक्षात ७८१ पैकी ७६७ सदस्यांनी मतदान केले. या निवडणुकीत १५ मते अवैध ठरली. त्यामुळे प्रत्यक्ष मतमोजणी ७५२ सदस्यांची झाली, विजयासाठी ३७७ मते आवश्यक होती.

लोकसभा तसेच राज्यसभेच्या १५ सदस्यांची मते अवैध ठरली, ही या निवडणुकीतील धक्कादायक बाब म्हटली पाहिजे. संसदेच्या १५ खासदारांना उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत मतदान कसे करायचे हे समजत नाही, यावर विश्वास ठेवता येत नाही. तरी या निवडणुकीत मतदान कसे करायचे, आपले मत अवैध ठरू नये म्हणून कोणती काळजी घ्यायची, यासाठी रालोआ तसेच इंडिया आघाडीने आपल्या खासदारांसाठी कार्यशाळा घेतल्या होत्या. तरी १५



सदस्यांची मते अवैध ठरली. हे खासदारांचे अज्ञान म्हणावे की जाणते अजाणतेपणी झालेली चूक हे सांगता येणार नाही. मतदानाला सुरुवात व्हायच्या आधी आमच्याकडे ३१५ खासदार असल्याचे काँग्रेसचे जयराम रमेश यांनी जाहीर केले होते. म्हणजे आम्हाला किमान ३१५ मते मिळतील, असे जाहीर करताना त्यांनी एकप्रकारे आपल्या पराभवाची कबुलीही दिली होती. पण प्रत्यक्षात त्यांच्या उमेदवारला ३०० मते मिळाली, त्यामुळे विरोधी पक्षांची १५ मते फुटली, अशी चर्चा सुरू झाली. दुसरीकडे रालोआजवळ ४२५ मते होती. वायएसआर काँग्रेसच्या ११ सदस्यांनी राधाकृष्णन् यांच्या उमेदवारीला पाठिंबा दिला. त्यामुळे रालोआचे संख्याबळ ४३६ झाले, आपच्या स्वाती मालिवाल आपल्या पक्षावर नाराज आहे, त्यामुळे त्या राधाकृष्णन् यांच्या उमेदवारीला पाठिंबा देतील, असे मानले जात होते. त्यामुळे रालोआजवळ किमान ४३७ मते होती. पण रालोआच्या उमेदवाराला ४५२ मते मिळाली, म्हणजे इंडिया आघाडीच्या उमेदवाराला अपेक्षेप्रमाणे १५ मते कमी पडली, तर रालोआच्या उमेदवाराला १५ मते जास्त पडली. त्यामुळेच मते फुटल्याची चर्चा सुरू झाली.

उपराष्ट्रपतींची निवडणूक गुप्त मतदान पद्धतीने होत असल्यामुळे या निवडणुकीत कोणत्याच राजकीय पक्षाला व्हीप जारी करता येत नाही. सर्व खासदारांना पक्षाच्या धोरणानुसार आणि सदसद्विवेकबुद्धीने मतदान करावे लागते. त्यामुळे नेमकी मते कोणाची फुटली, हे समजणार नसले तरी नेमक्या कोणत्या खासदारांनी क्रॉस व्होटिंग केले, याची चर्चा काही दिवस सुरू राहणार आहे. क्रॉस व्होटिंग केलेल्या खासदारांमध्ये महाराष्ट्रातील काही खासदारांचा समावेश राहण्याची शक्यता नाकारता येणार नाही. शिवसेना उबाठा आणि शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसच्या काही खासदारांनी राधाकृष्णन् यांच्यासाठी मतदान केले असण्याची चर्चा सुरू झाली. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मतदानाच्या आधी राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार आणि उबाठाचे उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा करत राधाकृष्णन् यांना मतदान करण्याचे आवाहन केले होते. राधाकृष्णन् महाराष्ट्राचे राज्यपाल असल्यामुळे या दोन पक्षांनी महाराष्ट्राची अस्मिता या मुद्यावर त्यांना मतदान करण्याचे आवाहन फडणवीस यांनी केले होते. त्याला आलेले हे यश म्हणायला हरकत नाही. राधाकृष्णन् यांचा विजय निश्चित असतानाही भाजपाने या निवडणुकीची जी तयारी केली, त्याला तोड नाही. रालोआतील खासदारांचे मतदान शंभर टक्के होईल, यासाठी खासदारांचे राज्यनिहाय गट तयार करून त्यांची जबाबदारी एकेका केंद्रीय मंत्र्यावर सोपवण्यात आली होती. दुसरीकडे इंडिया आघाडीत निवडणुकीच्या नावावर सगळाच आनंदीआनंद होता.

देशाचे उपराष्ट्रपती म्हणून निवडून आलेले राधाकृष्णन् महाराष्ट्राचे दुसरे राज्यपाल आहेत. याआधी डॉ. शंकरदयाल शर्मा महाराष्ट्राचे राज्यपाल असताना देशाच्या उपराष्ट्रपतिपदी निवडून आले होते. त्यामुळे राधाकृष्णन् यांच्या रूपात महाराष्ट्राला हा बहुमान दुसऱ्यांदा मिळाला आहे. राधाकृष्णन् यांच्या विजयामुळे दक्षिण भारतातील राजकीय समीकरणांना काही प्रमाणात कलाटणी मिळण्याची शक्यता आहे. राधाकृष्णन् तामिळनाडूचे असल्यामुळे त्या राज्यात भाजपाला याचा फायदा मिळू शकतो. तामिळनाडूत २०२७ मध्ये विधानसभा निवडणूक होत आहे. आंध्रप्रदेशमध्येही याचा काही प्रमाणात परिणाम होऊ शकतो.

राधाकृष्णन् देशाचे नेमके कितवे उपराष्ट्रपती याबाबत चर्चा सुरू आहे. काही माध्यमांनी ते देशाचे १५ वे उपराष्ट्रपती असल्याचे वृत्त दिले, तर काहींनी ते १७ वे उपराष्ट्रपती असल्याचे म्हटले. व्यक्ती म्हणून राधाकृष्णन् हे पंधरावे उपराष्ट्रपती असले तरी या पदावर विराजमान होणारे ते १७ वे उपराष्ट्रपती आहेत. कारण देशाचे पहिले उपराष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांची दोनदा उपराष्ट्रपती म्हणून निवड झाली होती. हमीद अन्सारीही सलग दहा वर्षे उपराष्ट्रपती होते. त्यामुळे व्यक्ती म्हणून राधाकृष्णन् १५ वे, तर पदानुसार निवडून आलेले म्हणून १७ वे उपराष्ट्रपती ठरतात. राधाकृष्णन् उपराष्ट्रपतिपदावर निवडून आल्यामुळे राज्यसभेला अध्यक्षही मिळाले आहे. जगदीप धनकड यांनी राजीनामा दिल्यामुळे राज्यसभेचे कामकाज पावसाळी अधिवेशनात उपाध्यक्ष हरिवंशनारायणसिंह यांनी सांभाळले होते. त्यामुळे आता राधाकृष्णन् यांच्या रूपात राज्यसभेला नवे दमदार आणि व्यासंगी अध्यक्ष मिळाले आहेत.

९८८१७१७८१७

---

## वाचक पत्र

### यांना सद्बुद्धी दे गणनायका

गेल्या काही दिवसांत श्रीगणेशाच्या स्थापनेच्या व विसर्जनाच्या निमित्ताने शहरात जागोजागी अनेक मिरवणुका पाहण्यात आल्या. दहा दिवसांचा सोहळा! दररोज सकाळ, संध्याकाळ आरती, महाप्रसाद, मनोरंजनात्मक कार्यक्रम, कधी कीर्तन, तर कधी प्रवचन. अगदी उत्साही व धार्मिक वातावरणात उत्सव साजरा होत होता. रोषणाई, सजावट, लाऊड स्पीकरवर भक्तिसंगीताने उत्सवास रंगत येते. सर्वधर्म सहिष्णुतेचेही उत्तम दर्शन होत असते. गणेशाच्या दर्शनास विविध जातिधर्माचे लोकच नाही तर विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी व विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनीही हजेरी लावून राजकीय एकीचे प्रदर्शन करतात. मात्र विसर्जनाच्या मिरवणुकांनी आजूबाजूच्या परिसरास ढोलताशांनी हादरवून टाकतात. गल्लीबोळातून गणेशाची भव्य मूर्ती सहज निघावी म्हणून अनेक झाडे बोडकी करण्यात येतात. रहदारीचे रस्ते दोन दोन तासांसाठी अडवून डीजेच्या तालावर तरुणाई बेभान होऊन थिरकते. इथपर्यंत ठीक आहे पण, बलम पिचकारी व तत्सम वाह्यात गाणी जेव्हा डीजेवर कर्कश पद्धतीने दोन तीन तास शहरभर मिरवणुका फिरवून वाजविली जातात व गाण्यातील शृंगार रसास अनुसरून मुलं-मुली झिंगाट नाच करतात तेव्हा बुद्धिदेवता श्री गणेशास नेमके काय वाटत असेल याची कल्पनाही करवत नाही. दहा दिवस प्रत्यक्ष स्थापना करुनही बुद्धीची कीव येणारे हे भक्तीचे प्रदर्शन म्हणावे, थोतांड म्हणावे की थैमान!

**दीपा काकडे-गायकवाड**/नागपूर

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# बीड पोलीस दलाकडून गणेश विसर्जन मिरवणुकीत कारवाई

## डीजेवर केला लाखोंचा दंड वसूल

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ सप्टेंबर**

गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान ध्वनीप्रदूषण टाळण्यासाठी तसेच सर्वोच्च न्यायालय, राष्ट्रीय हरित लवाद व राज्य शासनाचे आदेशानुसार निर्बंधांचे काटेकोर पालन व्हावे यासाठी बीड पोलीस दलाकडून विशेष मोहिम हाती घेण्यात आली होती. या मोहिमेदरम्यान शहरातील विविध ठिकाणी डीजे वाद्यांच्या माध्यमातून प्रचंड आवाजात ध्वनीप्रदूषण करून नियमांचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आले.

त्याअनुषंगाने बीड शहरातील पोलीस ठाणे पेठबीड, शिवाजीनगर, बीड शहर या पोलीस ठाण्यांच्या हद्दीत गणेश विसर्जनावेळी एकूण १५ ऑ वाहने जप्त करण्यात आली आहेत. त्यांच्यावर कारवाई करण्या संबंधी अहवाल उपप्रादेशिक परिवहन विभागाकडे पाठविण्यात आला होता. त्यावरून उपप्रादेशिक परिवहन विभागाकडून नमुद वाहनांवर दंडात्मक कारवाई केली असून त्यावरील एकूण दंडाची रक्कम ५,०४,०००/- इतकी आहे.

जप्त करण्यात आलेली वाहने व दंडाची रक्कम खालीलप्रमाणे आहे :

१. MH16Q1021 - ३२,०००/-
२. MH04BU4593 - ३०,०००/-
३. MH12D8424 - ३०,०००/-
४. MH10Z437 - ३२,०००/-
५. MH20-T2394 - ३०,०००/-
६. MH33-3076 - ४८,०००/-
७. MH04DK1805 - ३५,०००/-
८. MH50-2678 - ३९,०००/-
९. MH23-5209 - ५२,०००/-
१०. MH23-S1650 - ४४,०००/-
११. MH23-S1605 - ३६,०००/-
१२. MH38B3496 - २५,०००/-
१३. MH25-D2183 - १०,५००/-
१४. MH16CD8383 - १८,०००/-
१५. MH23-U6359 - १०,०००/-

एकूण दंडाची रक्कम : ५,०४,०००/-

ही कारवाई उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, बीड तसेच पोलीस विभाग यांच्या संयुक्त प्रयत्नातून करण्यात आली असून पुढील काळातही अशाप्रकारे ध्वनीप्रदूषणाविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल. नागरिकांनी कायद्याचे पालन करून उत्सव आनंदात व शांततेत साजरे करावेत, असे आवाहन करण्यात येत आहे.

# ग्रामीण रस्त्यांचे सीमांकन,सेवा पंधरवडा व कुणबी जात प्रमाणपत्र वितरणासाठी प्रशासन सज्ज

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ सप्टेंबर**

महाराष्ट्र शासनाने ग्रामीण भागातील पायवाट , पाणंद व शिवार रस्त्यांचे संरक्षण , सीमांकन व अतिक्रमण हटवण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे . महसूल व वन विभागाच्या दि. २९ ऑगस्ट २०२५ च्या शासन निर्णयानुसार गाव नकाशावर असलेले व नसलेले सर्व रस्ते क्रमांकित करून कायमस्वरूपी नोंदवले जाणार आहेत . यासाठी ग्राम , तालुका व जिल्हास्तरीय समित्या स्थापन करण्यात आल्या असून ग्रामस्तरीय समितीत ग्राममहसूल अधिकारी , ग्रामपंचायत अधिकारी व सहाय्यक कृषी अधिकारी असतील.

दरम्यान, छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत दि. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ दरम्यान सेवा पंधरवडा साजरा करण्यात येणार आहे . यात तीन टप्प्यांत विशेष उपक्रम राबवले जाणार असून पाणंद रस्ते विषयक मोहीम , सर्वांसाठी घरे आणि नावीन्यपूर्ण उपक्रम यांचा समावेश असेल .

छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी हैदराबाद गॅझेटनुसार कुणबी समाजाच्या नागरिकांना जात प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज करण्याचे आवाहन केले आहे . प्राथमिक चौकशी ग्रामस्तरीय समितीकडून करून घेतली जाईल व उपविभागीय अधिकारी नियमानुसार जात प्रमाणपत्र वितरित करतील .

बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी १० सप्टेंबर रोजी जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांची बैठक घेऊन सेवा पंधरवड्याचे सूक्ष्म नियोजन करण्याचे निर्देश दिले . लोकप्रतिनिधींना याबाबत अवगत करावे असेही त्यांनी सांगितले . त्यानंतर ११ सप्टेंबर रोजी अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक व उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी तालुक्यातील ग्रामपंचायत अधिकारी , ग्राममहसूल अधिकारी व सहाय्यक कृषी अधिकारी यांचे प्रशिक्षण घेतले.

या बैठकीत धार्मिक यांनी सेवा पंधरवडा दरम्यान रस्त्यांचे सर्वेक्षण करून ते खुले करण्याचे , तसेच १७ सप्टेंबर रोजी ग्रामसभांमध्ये शासन निर्णयाचे वाचन करून लोकांच्या समस्या सोडवण्याचे निर्देश दिले . उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी कुणबी जात प्रमाणपत्र वितरणाची कार्यपद्धती स्पष्ट केली . बैठकीचे नियोजन तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी केले होते . यावेळी गटविकास अधिकारी अशोक राठोड व तालुका कृषी अधिकारी अशोक साळी उपस्थित होते .

ग्रामीण रस्त्यांचे संरक्षण , सेवा पंधरवड्याची अंमलबजावणी आणि कुणबी समाजाला जात प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी प्रशासन सज्ज झाले असून ग्रामस्तरापासून जिल्हास्तरापर्यंत यंत्रणा कार्यरत आहे .

## १७ सप्टेंबरला बीड-नगर रेल्वेचे स्वप्न प्रत्यक्षात साकारणार
## जिल्हा प्रशासन व रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून पाहणी



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ सप्टेंबर**

बीड जिल्ह्यात बहुचर्चित असलेली रेल्वे प्रत्यक्षात १७ सप्टेंबर २०२५ मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी रोजी सुरू होणार आहे. त्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाची जय्यत तयारी सुरू आहे. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी ब्रिजेशकुमार सिंग, जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत व इतर अधिकारी यांनी बीड येथील रेल्वे स्टेशन परिसराची पाहणी केली. बीड-नगर रेल्वेला १७ सप्टेंबरला हिरवी झेंडी दाखविण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार हे येणार आहेत.

जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, जनता या कार्यक्रमास मोठ्या प्रमाणात उपस्थित राहणार आहेत. प्रत्यक्ष कार्यक्रमाच्या ठिकाणी बैठक व्यवस्था कशी असायला पाहिजे, पार्किंग व्यवस्था कशी असावी, व्हीआयपी आणि इतर रस्ते याबाबत यावेळी चर्चा करण्यात आली. कार्यक्रमाचे नियोजन आणि कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन आणि पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत हे स्वत: प्रत्येक बाबींचा आढावा घेवून नियोजन करत आहेत.

यावेळी रेल्वे प्रशासनातर्फे उपमुख्य अभियंता डी.डी. लोळगे, उपमुख्य अभियंता (इलेक्ट्रीक) ज्ञानेंद्रसिंग, रेल्वे विभागाचे विभागीय अधिकारी जितेंद्र सिंग व वरिष्ठ समन्वयक विजयकुमार रॉय तसेच अधिकारी उपस्थित होते . ही प्राथमिक पाहणी असून बैठक व्यवस्था व इतर मार्ग याबाबत सविस्तर माहिती पुरविण्यात येईल, असे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यावेळी सांगितले.

## मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या पार्श्वभूमीवर पूर्वतयारी आढावा बैठक

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ सप्टेंबर**

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त १७ सप्टेंबर रोजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा जिल्ह्यात दौरा होणार असून या दौऱ्यात अनेक महत्त्वाचे उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यामध्ये मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा शुभारंभ, जिल्हा क्रीडा संकुल उभारणी कामाचे भूमिपूजन, तसेच जिल्हास्तरीय गुरु गौरव पुरस्कार वितरण समारंभ पार पडणार आहे.

या सर्व कार्यक्रमांच्या नियोजनासाठी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक घेतली. या बैठकीला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत, उपविभागीय अधिकारी, संबंधित विभागांचे प्रमुख अधिकारी आदी मान्यवर उपस्थित होते.

बैठकी दरम्यान जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी सर्व विभागांनी योग्य नियोजन करुन आपापली जबाबदारी वेळेत व काटेकोरपणे पार पाडावी असे निर्देश दिले. यावेळी कार्यक्रमांचे वेळापत्रक, स्वागत समारंभाची आखणी, सुरक्षा व्यवस्था, निमंत्रितांचे नियोजन, अभ्यागंतासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत त्यांनी विशेष सूचना केल्या.

## दीनदयाल शोध संस्थान मधील गणपती बाप्पाला जड अंतकरणाने निरोप

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ सप्टेंबर**

दहा दिवस सर्वांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या गणपती बाप्पांना मन घट्ट करून निरोप द्यावाच लागतो. तसेच दीनदयाल शोध संस्थान मधील गणपती विसर्जनाच्या कार्यक्रमासाठी इयत्ता पहिली ते आठवी पर्यंतचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते. गणपती बाप्पाची मिरवणूक काढून आरती करण्यात आली त्यानंतर विसर्जित करण्यात आला . त्यावेळी उपस्थित श्री.गंगाधर जी देशमुख सर, श्रीमती सुनंदाताई कुलकर्णी, शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. मोराळे ताई, बालवाडी प्रमुख सौ.आरती ताई जोशी , जन शिक्षण संस्थांनचे सर्व कार्यकर्ते, शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षिका, विद्यार्थी इतर कर्मचारी उपस्थित होते.

## नानाजी देशमुख विद्या मंदिरमध्ये शिक्षक दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ सप्टेंबर**

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा ५ सप्टेंबर रोजी जन्मदिवस आपण सर्वजण शिक्षक दिन म्हणून साजरा करतो. तर आज दीनदयाल शोध संस्थान, संचलित नानाजी देशमुख विद्या मंदिर ,गोकुळ शिशु वाटिका बीड येथे इयत्ता पाचवी, सहावी, सातवी विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या भूमिकेत येऊन पूर्ण वेळ शाळा घेतली. तसेच काही विद्यार्थ्यांनी सुंदर अनुभवांच्या प्रतिक्रिया सुद्धा दिल्या. मा.ड. अर्चना ताई तुंगार, मा .गंगाधर जी .देशमुख सर, मा.श्रीमती सुनंदाताई कुलकर्णी मा. पालकर सर आदी मान्यवरांनी तास पाहिले व विद्यार्थ्यांनी सुंदर तास घेतले त्यामुळे सर्व मान्यवरांनी कौतुक केले व शाब्बासकी देऊन प्रोत्साहन दिले.

## महसूल कर्मचाऱ्यांनी गतीने कामे करावीत:अनिल बोर्डे

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.११ सप्टेंबर**

बीड जिल्ह्यातील महसूल कर्मचाऱ्याकडून शेतकरी ग्राहकाची व सर्वसामान्य व्यक्तीची कामे वेळेवर होणे अपेक्षित असते परंतु सद्यस्थितीत संबंधित आलेल्या ग्राहकाची कामे वेळेवर होत नाहीत त्याबद्दल माननीय जिल्हाधिकारी यांच्या लोकप्रियतेवर होतो त्यामुळे त्यांना कायदेशीर कारवाई केल्याशिवाय पर्याय निदर्शनास येत नसल्यामुळे कारवाई झाली असेल त्यासाठी सर्वसामान्य व्यक्तीस संपाचे हत्यार घेऊन सर्वसामान्य ग्राहकास वेठीस धरू नये. माननीय लोकप्रिय विवेक जॉन्सन जिल्हाधिकारी साहेब आल्यापासून सर्वसामान्याला सर्वसामान्य सर्वसामान्य ग्राहकाला न्याय देण्याचे काम करतात. जिल्ह्यातील विविध खात्याकडून व महसूल कर्मचाऱ्याकडून शेतकरी ग्राहक व इतर सर्वसामान्यांची कामे शासकीय कामे वेळेवर होणे अपेक्षित असते परंतु सद्यस्थितीत त्यांची कामे महसूल कर्मचाऱ्याकडून वेळेवर होत नसल्या बद्दल बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र यांच्यावतीने मुख्यमंत्री यांच्याकडे याबाबत निवेदन देण्यात आले होते. तरी देखील कर्मचाऱ्याच्या कामांमध्ये कसल्याही प्रकारची गती निदर्शनास आली नाही. शासकीय कर्मचाऱ्याकडून सर्वसामान्य व शेतकरी ग्राहकाचे कामे वेळेवर होत नाही त्यामुळे शासकीय कर्मचाऱ्यांनी संप करून शासनास व ग्राहकास वेठीस धरू नये.

# योगेश्वरी देवल कमिटी ‘प्रायव्हेट प्रॉपर्टी’ आहे का ? माजी सचिव प्रा. अशोक लोमटे यांनी केले गंभीर आरोप

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.११ सप्टेंबर**

योगेश्वरी देवल कमिटीच्या माजी विश्वस्त मंडळाने अल्पावधीतच पारदर्शक कारभारातून भाविक - भक्तांचा विश्वास संपादन केला होता. विविध उपक्रम राबवून भाविक - भक्तांची मने जिंकली होती. भाविक - भक्तांना सुविधा, मंदिर परिसर विकास आणि जिर्णोद्धारासाठी प्रयत्न ही सुरू केले होते. पण, ज्या विश्वस्तांवर लेखापरीक्षक, तहसीलदार व आयकर विभाग यांनी गंभीर आक्षेप घेतले होते. त्यांनाच पुन्हा एकदा विश्वस्त म्हणून नेमण्यात आले आहे. हे चुकीचे आहे व ज्यांनी चांगले काम केले त्यांना मात्र वगळण्यात आले, हे धक्कादायक आहे. या आश्चर्यकारक बदलांमागे सर्वोच्च राजकीय दबाव व प्रचंड आर्थिक व्यवहार करून नविन विश्वस्त मंडळ नेमले आहे, अशी योगेश्वरी देवीच्या भाविक - भक्तांमध्ये चर्चा होत असल्याची माहिती माजी विश्वस्तांनी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेतून दिली आहे.

योगेश्वरी देवल कमिटीच्या माजी विश्वस्तांनी आज पत्रकार भवनात पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. या पत्रकार परिषदेत माजी सचिव अशोक लोमटे यांनी गंभीर आरोप केले आहेत. योगेश्वरी देवी मंदिराच्या विकासासाठी तीर्थक्षेत्र विकास योजनेंतर्गत दीड कोटी रुपायांचा निधी आला होता. परंतू, तो निधी आमदार समर्थकांनी मंदिराच्या कामासाठी न वापरता खाजगी कामासाठी वापरला असल्याचे त्यांनी नमूद केले. योगेश्वरी देवीच्या मंदिरासाठी भक्तांनी दिलेली दान स्वरुपातील रक्कम तत्कालीन कार्यालय प्रमुखांनी बँकेत भरलीच नाही, ती रक्कम लाखांच्या घरात आहे. त्याच्या सर्व नोंदी कार्यालयात उपलब्ध असल्याचेही प्रा. अशोक लोमटे यांनी सांगितले. ज्यांना मंदिराच्या पायऱ्या चढता येत नाहीत, अशा लोकांना देवल कमिटीत स्थान दिले असून एकाच घरातील दोन व्यक्तिंना कमिटीत घेऊन नवा पायंडा पाडला आहे. योगेश्वरी देवल कमिटी ‘प्रायव्हेट प्रॉपर्टी’ आहे का ? असा सवालही लोमटे यांनी उपस्थित केला.

पत्रकार परिषदेत प्रा. अशोक लोमटे यांनी त्यांनी केलेल्या कार्याचा लेखाजोखा मांडत आम्ही यापुढे नवीन विश्वस्त मंडळाच्या निवडीला कायदेशीर आव्हान देणार असल्याचे जाहीर केले आहे. त्यामुळे आता परत योगेश्वरी देवल कमिटीच्या निवडीचा वाद कोर्टात जाणार आहे. या पत्रकार परिषदेला माजी सचिव प्रा. अशोक लोमटे, राजपाल भोसले, सतीश लोमटे, अमोल लोमटे, अजित चव्हाण, राजेभाऊ लोमटे, रवी कदम आणि श्रीमती संध्या मोहिते उपस्थित होत्या.

## महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलच्या तज्ज्ञ अभ्यास समिती मंडळावर सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.११ सप्टेंबर**

महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलच्या तज्ज्ञ अभ्यास समिती मंडळावर अंबाजोगाईचे सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांची निवड झाली आहे. डॉ.इंगोले यांच्या निवडीचे सर्वस्तरांतून स्वागत होत आहे.

महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल अर्थात महाराष्ट्र वैद्यकीय परिषद ही नोंदणीकृत डॉक्टरांसाठीची सरकार नियुक्त समिती आहे. या समितीद्वारे वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या डॉक्टर्सला अधिकृत मान्यता देणे तसेच दवाखाने व वैद्यकीय आस्थापना यांना मान्यता देणे किंवा नाही देणे याविषयी ही समिती कार्य करते. महाराष्ट्रातील सर्व डॉक्टर्स व वैद्यकीय आस्थापनांवर महाराष्ट्र शासन या समितीद्वारे नियंत्रण ठेवते. वैद्यकीय उपचार करताना डॉक्टर व रूग्णालयाद्वारे योग्य प्रकारचा उपचार झाला आहे किंवा नाही, यामध्ये कुठे निष्काळजीपणा झाला आहे का..? याच्या पडताळणी करिता महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलची राज्य सरकार द्वारा नियुक्त ही समिती असते. संपूर्ण महाराष्ट्रातून विविध डॉक्टर्स व रूग्णालयांद्वारे झालेल्या मेडिकल निगलिजन्स केसेस या समितीद्वारे योग्य आहेत किंवा नाहीत याविषयी निर्णय घेतला जातो. त्यानुसार शासन गुन्ह्याचे स्वरूप ठरवून त्यावर डॉक्टर्स किंवा रुग्णालय प्रशासनावर कार्यवाही करते. घटनात्मकरित्या ही समिती अत्यंत जबाबदारीची व महत्त्वाची आहे. अशा महत्त्वाच्या समितीवर अंबाजोगाईचे अष्टपैलू व्यक्तिमत्व तथा महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांची निवड झाली आहे ही तमाम अंबाजोगाईकरांच्या दृष्टीने अत्यंत गौरवाची गोष्ट आहे असे मत अनेक तज्ज्ञांनी व्यक्त केले. डॉ.इंगोले यांचे मनोविकृतीशास्त्रातील आतापर्यंतचे योगदान, सामाजिक कार्यातील सहभाग व विविध शासकीय समित्यांवर विविध पदावर कार्य केल्याची नोंद महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने घेत त्यांची नियुक्ती महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलच्या मेडिकल निगलिजन्स केसेसच्या स्क्रुटिनायझिंग कमिटीवर केली आहे. डॉ.इंगोले हे एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व आहे. विविध क्षेत्रात ते उल्लेखनीय कार्य करीत आहेत. त्यांच्या या नियुक्तीबद्दल अंबाजोगाईतील वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळी तसेच सामाजिक क्षेत्रातील, राजकीय क्षेत्रातील, शैक्षणिक क्षेत्रातील, साहित्य क्षेत्रातील, सहकार क्षेत्रातील विविध मित्र मंडळींनी आनंद व्यक्त करीत त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## मुस्लिम समाजाने प्राधान्यपूर्वक शिक्षणाकडे लक्ष देणे गरजेचे-राजकिशोर मोदी

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.११ सप्टेंबर**

अंबाजोगाई शहरात बुधवार दि १० सप्टेंबर रोजी ईद मिल्लादुनबी साजरी करण्यात आली. त्या निमित्तने दरवर्षी प्रमाणे याही वर्षी अखंडीत अठराव्या वर्षी गवळीपुरा मित्रमंडळाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरात ८५ रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करत आपले सामाजिक उत्तरदायित्व सिद्ध केले. या कार्यक्रमाचे उदघाटक म्हणून राजकिशोर मोदी तर कार्यक्रमाच्या अध्यस्थानी परळी येथील मुफ्ती अशफाक साहब हे होते. विशेष अतिथी म्हणून शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शरद जोगदंड, हाजी इस्माईल सेठ गवळी, डॉ राजेश इंगोले, पत्रकार दत्तात्रय आंबेकर मुजीब काजी सर हे होते.त्याचबरोबर प्रमुख पाहुणे म्हणून सुनील सेठ वाघळकर, ॲड इस्माईल गवळी, मदार गवळी, महादेव आदमाने, धमपाल सरवदे, अंकुश हेडे, आकाश कराड उपस्थित होते.

या प्रसंगी बोलताना अंबाजोगाई चे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी म्हणाले की मोहंमद पैगम्बर यांनी दिलेल्या शिकवणी वर आमचे सहकारी जावेद भाई, मुक्तार भाई, खलील भाई, अमजत भाई हे चालत आहेत. रक्तदान सारखे सामाजिक काम ते सतत अठरा वर्षा पासून करत असल्या बद्दल त्यांनी यावेळी आनंद व्यक्त केला. पुढे बोलताना त्यांनी मुस्लिम समाजात शिक्षणाकडे दुर्लक्ष केले जाते मात्र तसे न होता समाजाने प्राधान्य क्रमाणे शिक्षणाला महत्त्व देण्याचे आवाहन याप्रसंगी सर्व सहकार्यांना केले. तर मुफ्ती अशफाक साहब यांनी मोहंमद पैगम्बर यांच्या बद्दल माहिती देऊन परळी अंबाजोगाईची ओळख सांगून जिल्ह्यात सामाजिक सलोखा सर्वांनी टिकवणे गरजेचे असल्याचे यावेळी नमूद केले.

## कै.दत्ताजी भाले प्राथमिक विद्यालयामध्ये शिक्षक दिनानिमित्त बाल सभेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ सप्टेंबर**

बाल सभा म्हणजे विद्यार्थ्यांचे व्यासपीठ विद्यार्थ्यांच्या बालमनावर सुसंस्कार व्हावे यासाठी दत्ताजी भाले प्राथमिक विद्यालयांमध्ये आज शिक्षक दिनाच्या निमित्ताने इयत्ता चौथी अ व ब विद्यार्थ्यांनी बाल सभेचे आयोजन केले होते.या बाल सभेच्या कार्यक्रमाच्या व्यासपीठावर अध्यक्ष म्हणून चि. अन्वय शिवशंकर शेरकर व कु. वैष्णवी संतोष चोथे प्रमुख उपस्थिती विद्यालयाचे मुख्याध्यापक माननीय श्री प्रदीप जोशी सर उपस्थित होते पद्य गायन कु. आरोही वायखिंडे कु.शिवकन्या भोसले कु.भूमी वाघ कु.श्रद्धा पिंगळे कु.आरोही सोनवणे यांनी केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी ब्राहमी सचिन जानवे , हिने केले तर प्रास्ताविक स्वरूप समाधान मुळे यांनी केले.

मान्यवरांच्या शुभहस्ते प्रतिमापूजनाणे कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. तसेच शाळेतील प्रत्येक शिक्षकांचे पुष्प व पेन देऊन स्वागत करण्यात आले.यावेळी पहिली ते चौथीच्या वर्गातील विद्यार्थ्यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवन चरित्रावर भाषणे सादर केली . इयत्ता चौथीचे विद्यार्थी उत्तर भारतीयांच्या वेशभूषेत आले होते.या बाल सभेच्या यशस्वीतेसाठी वर्गशिक्षिका श्रीमती मेघा वायकोस व श्री सुनील कुंभार यांनी विशेष प्रयत्न केले .यावेळी मुख्याध्यापक मा. प्रदीप जोशी सर यांनी भाषण सादर करून विद्यार्थ्यांचे गोड कौतुक केले व बालसभेचे उत्कृष्ट नियोजन केले याबद्दल मत व्यक्त केले . तसेच परिपाठ प्रमुख श्रीमती खानापूरकर मॅडम बालसभेविषयी मत व्यक्त करताना ही बालसभा म्हणजे आपल्या विद्यार्थ्यांसाठी आदर्श बालसभा झाली असे मत व्यक्त करून इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांचे खूप खूप कौतुक केले. विद्यार्थ्यांना भरभरून कौतुक केले . या कार्यक्रमासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार कु.अर्पिता तांबे हिने केले बाल सभेचे सांगता शांती मंत्राने करण्यात आली.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# बंजारा समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण दिल्यास राज्यभर आंदोलन

## सकल आदिवासी समाजाचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ सप्टेंबर**

बंजारा समाजासह इतर कोणत्याही समाजाला अनुसुचीत जमाती म्हणजे एसटी प्रवर्गातून आरक्षण देऊ नये अशी मागणी सकल आदिवासी समाजाच्यावतीने जिल्हाधिकारी यांचेमार्फत मुख्यमंत्री देंवेद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, बंजारा समाजाच्यावतीने अनुसूचीत जमाती प्रवर्गातून आरक्षण देण्यात यावे अशी मागणी करण्यात येत आहे परंतु आदिवासी समाजाची मागील ७५ वर्षापासून मागास असून आता कुठेतरी मुख्य प्रवाहात येत आहे. डोंगरदऱ्यात, पाल टाकून राहणारा, पोटासाठी गावोगावी भटकंती करणारा समाज असून अजूनही मुख्य प्रवाहापासून कोसोदूर आहे. तर दुसरीकडे बंजारा समाज हा ऐतिहासिक दृष्ट्या व सांस्कृतिक दृष्टया आदिवासी नसून व्यापारी व फिरस्ता समाज म्हणून ओळखला जातो. बंजारा समाजाला अनुसुचीत जमाती प्रवर्गात समाविष्ट केले तर मुळ आदिवासी समाजाचा हक्क व विकास धोक्यात येईल, बंजारा समाज हा आधीपासूनच इतर मागा वर्गीय ओबीसी प्रवर्गामध्ये आरक्षणाचा लाभ घेत आहे. सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमुर्ती बी एन लोकूर यांनी १९६५ मध्ये काही निकष ठरवून दिले आहेत. महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचीत जमाती प्रवर्गाच्या यादीत कुठेही बंजारा समाजाचा उल्लेख नाही. त्यामुळे बंजारा समाजाला अनुसूचीत जमातीमधून आरक्षण देऊ नये अन्यथा सकल आदिवासी समाजाच्यावतीने राज्यभर अन्नत्याग उपोषण तसेच रास्तारोको आंदोलन करण्याचा इशारा निवेदनात देण्यात आला आहे.

निवेदनावर मुंजाजी खोकले, दिपक सोनुळे, राजकुमार चिभडे, गोपाल गायकवाड, हनुमान नाईक, संजय घाटे, प्रल्हाद दलशिंगारे, गोरखनाथ टारफे, विजय कुरूडे, कृष्णा कऱ्हाळे, सुधाकर पाटणकर, दशरथ काळे, अजय फुपाटे, प्रकाश कोकाटे, बालाजी कोकाटे, आंबादास फोले, पवनकुमार गारूळे, तेजस खुडे, दत्ता पोटे, गणेश बेले, ज्ञानेश्वर रिठे, मारोती ठाकरे, गजानन नाईक, गणेश सोनुळे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.



**हिंगोली– महसूल विभागासह जिल्ह्यातील इतर कार्यालयात मागील पंधरा वर्षापासून काहीही संबंध नसतांना हदगाव तालुक्यातील उचांडा येथील विठ्ठलराव चव्हाण त्रास देत आहेत. त्यांना शासकीय कार्यालयात येण्यापासून पायबंद करावे अशी मागणी राज्य सरकारी मध्यवर्ती कर्मचारी संघटनेच्यावतीने जिल्हाधिकारी राहूल गुप्ता यांचेकडे करण्यात आली. छाया– सुनील पाठक**

# हिंगोलीत भाजपची सेवा पंधरवाडानिमित्त आज कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ सप्टेंबर**

भारतीय जनता पक्षाची सेवा पंधरवाडा निमित्त येथील रामाकृष्णा लॉजच्या सभागृहात दि १२ सप्टेबर, शुक्रवारी दुपारी ३.३० वाजता कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाच्या दिवशीपासून दि १७ सप्टेंबर ते महात्मा गांधी जयंतीपर्यंत दि २ आक्टोबरपर्यंत भारतीय जनता पक्षाच्यावतीने सेवा पंधरवाडा आयोजित करण्यात आला आहे. या पंधरवाड्यात सर्वसामान्य नागरिक, वंचीत घटक तसेच केंद्र व राज्य शासनाच्या महत्वाकांक्षी योजनांची माहीती तसेच या योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीकोनातून कार्यशाळेचे आयोजन दि १२ सप्टेंबर रोजी करण्यात आले आहे.

या कार्यशाळेला विभागीय संघटन मंत्री संजय कौडगे, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, आ. तान्हाजीराव मुटकुळे, माजी आ. रामराव वडकुते, माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. या कार्यशाळेला राष्ट्रीय व प्रदेश पदाधिकारी, सदस्य, आजी माजी खासदार, आमदार, जिल्हा पदाधिकारी, सर्व मोर्चा, आघाडी सेलचे जिल्हा संयोजक, मंडळ अध्यक्ष व सरचिटणीस तसेच जिल्हा व मंडळाचे सेवा पंधरवाडाचे संयोजक व सहसंयोजक यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, सरचिटणीस उमेश नागरे यांनी केले आहे.

# बाजार समितीच्या संचालकांविरूध्द मानव अधिकार आयोगाकडे तक्रार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ सप्टेंबर**

हिंगोली कृषी उत्पन्न बाजार समितीच्या बरखास्तीनंतर जिल्हा उपनिबंधकांना दमदाटी करणाऱ्या १० संचालकांविरूध्द गुन्हा दाखल झाल्यानंतर आता जिल्हा उपनिबंधकांनी राज्य मानवाधिकार आयोगाकडे धाव घेतली आहे. या प्रकरणात संचालकांवर योग्य ती प्रतिबधात्मक कारवाई करण्याबाबत संबंधित यंत्रणेला सूचना द्याव्यात अशी मागणी तक्रारीत करण्यात आली आहे.

हिंगोली कृषी उत्पन्न बाजार समितीच्या बरखास्तीनंतर संचालक व जिल्हा उपनिबंधक यांच्यात वादाला तोंड फुटले आहे. संचालक मंडळ बरखास्त केल्यानंतर १० संचालकांनी जिल्हा उपनिबंधक सुरेखा फुपाटे यांच्या कक्षात जाऊन न्यायालयीन प्रक्रियेसाठी कागदपत्रांची मागणी केली होती. मात्र वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बैठकीनंतर कागदपत्रे देऊन असे सांगितल्यानंतर काही संचालकांनी त्यांना दमदाटी करून त्यांच्या कक्षातून बाहेर जाणार नाही असे सांगत सरकारी कामात अडथळा आणला. या प्रकरणी फुपाटे यांच्या तक्रारीवरून हिंगोली शहर पोलिस ठाण्यात दहा संचालकांविरूध्द सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. तर दुसरीकडे संचालकांनी ही पोलिसांत तक्रार देऊन उपनिबंधक फुपाटे यांनीच दमदाटी केल्याची तक्रार दिली आहे.

दरम्यान, त्यानंतर उपनिबंधक फुपाटे यांनी आता थेट राज्य मानवाधिकार आयोगाकडे धाव घेतली आहे. आयोगाकडे पाठविलेल्या पत्रात त्यांनी हिंगोली कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये हिंगोली तालुक्यातील सिरसम कृषी उत्पन्न बाजार समितीमधील ५६ गावे समायोजित करण्याचा ठराव हिंगोली बाजार समितीच्या संचालकांनी दिला होता. त्यानंतर या ठरावावर आक्षेप मागवून त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात आली आहे. पणन संचालक कार्यालयाच्या आदेशानुसारच पुढील कार्यवाही करून बाजार समितीचे संचालक मंडळ बरखास्त करण्यात आले आहे. यासंदर्भात संचालकांनी न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार असतांनाही त्यांनी आपल्या कक्षात येऊन दमदाटी केली तसेच अपमानास्पद वागणूक दिली. तसेच माझ्यावर खोटे आरोप करून बदनामी केली जात असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. याप्रकरणी मानवाधिकार आयोगाने योग्य ती कार्यवाही करण्याबाबत संबंधित यंत्रणेला सूचना द्याव्यात तसेच न्याय द्यावा अशी मागणी करण्यात आली आहे.



**हिंगोली– बंजारा समाजाला हैदराबाद गॅझैटनुसार एस टी प्रवर्गातून तातडीने आरक्षण द्यावे या मागणीसाठी येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बंजारा समाजाचे सुरेश नाईक यांनी आमरण उपोषण सुरू केले आहे. या उपोषणाला बंजारा समाजातील बांधवांनी भेट देत पाठींबा दिला आहे. छाया– लखन यादव**

## संक्षिप्त वृत्त

### एकरकमी कर्जफेड करणारांना थकीत व्याजात ५० टक्के सवलत

हिंगोली– महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाच्या संपूर्ण थकीत कर्ज एकरकमी भरणा करणाऱ्या लाभार्थ्यांस थकीत व्याज रकमेत ५० टक्के सवलत देण्याबाबतची सुधारित एकरकमी योजना दि. ३१ मार्च, २०२६ पर्यंत लागू करण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, रिसाला बाजार, हिंगोली–४१३५१३ (दूरध्वनी क्र. ०२४५६–२२४४४२) येथे संपर्क साधावा. त्यानुसार थकबाकीदार लाभार्थ्यांनी या योजनेचा फायदा घेऊन कर्जमुक्त व्हावे, असे आवाहन महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक एस. एन. झुंजारे यांनी केले आहे.

### जलेश्वर तलावातील मत्स्य व्यवसायासाठी १८ सप्टेंबरला लिलाव

हिंगोली– हिंगोली तालुक्यातील सर्व्हे क्र. ३ मध्ये असलेल्या जलेश्वर तलावात मोठ्या प्रमाणात पाणीसाठा आवक झाला आहे. यापूर्वी महसूल उत्पन्न वाढ होण्याकामी जलेश्वर तलावात मत्स्य उत्पादनासाठी लिलावाद्वारे ठेक्याने देण्यात येत होता. यावर्षी देखील परंपरेनुसार पुढील ५ वर्षासाठी जलेश्वर तलाव जाहीर लिलावाद्वारे ठेक्याने देण्यात येणार आहे. या कामी ग्रामविकास विभागाच्या दि. ३० डिसेंबर, २०२० च्या परिपत्रकान्वये सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तां.) हिंगोली यांच्या दि. २० ऑगस्ट, २०२५ च्या पत्रानुसार तहसील कार्यालयास ठेक्याची वार्षिक सरासरी रक्कम कळविली आहे. त्यानुसार सर्व्हे क्र. ०३ जलक्षेत्र १३ हेक्टर जलेश्वर तलावाची मत्स्यव्यवसायासाठी माहे सप्टेंबर २०२५ ते सप्टेंबर २०३० पर्यंत या ५ वर्षे कालावधीसाठी हिंगोली तहसील कार्यालयात दि. १८ सप्टेंबर, २०२५ रोजी सकाळी ११ वाजता लिलाव घेण्यात येणार आहे. या तलावासाठी ज्याची उच्चतम बोली जास्त असेल त्यास लिलाव अंतिम करण्यात येईल. या लिलावात केवळ नोंदणीकृत संस्थांनाच भाग घेता येईल. यासाठी दि. १५ सप्टेंबर पर्यत हिंगोली तहसील कार्यालयात कार्यालयीन वेळेत अर्ज दाखल करता येईल. प्राप्त अर्जाची छाननी दि. १७ सप्टेंबर रोजी करण्यात येणार असून प्रत्यक्ष लिलाव दि. १८ सप्टेंबर , २०२५ रोजी हिंगोली तहसील कार्यालयात होणार आहे. या ठेक्याची आधारभूत किंमत २ लाख ४८ हजार ६२५ आहे. तर अनामत रक्कम २५ हजार रुपये असणार आहे.

### आयकर ऑडीट दाखल करण्यास मुदतवाढ द्यावी

हिंगोली– आयकर ऑडीट दाखल करण्याची अंतिम तारीख ३० सप्टेंबर २०२५ वरून ३० नोव्हेंबर पर्यंत वाढविण्यात यावी अशी मागणी व्यापारी महासंघाच्यावतीने करण्यात आली आहे. आयकर पोर्टलवरील वारंवार सर्व्हर डाऊनटाईम ज्यामुळे अहवाल व फॉर्म अपलोड करण्यास विलंब होतो. तसेच अलिकडे केलेले बदलामुळे गोंधळ निर्माण होत आहे. सध्या सणासुदीचा काळ असून व्यापारी व ऑडीटर्सना त्यांचे काम वेळेवर पूर्ण करणे आव्हानात्मक होत आहे. त्यामुळे मुदतवाढ द्यावी अशी मागणी अनिल नैनवाणी, नंदकिशोर तोष्णीवाल यांनी केली आहे.

# हिंगोलीत जश्ने–ईद–मिलादुन्नबीनिमित्त भव्य मिरवणुक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ सप्टेंबर**

हिंगोली शहरासह ठिकठिकाणी जश्ने–ईद–मिलादुन्नबी निमित्त मुस्लीम बांधवांच्यावतीने भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते.

मुस्लीम बांधवांच्यावतीने गुरूवार दि ११ सप्टेंबर रोजी शहरातील प्रमुख मार्गावरून जश्ने–ईद–मिलादुन्नबी निमित्त भव्य मिरवणुका काढण्यात आल्या होत्या. यावेळी शहरातील प्रमुख मार्गावरून ही मिरवणुक काढण्यात आली. मिरवणुकीत घोडे, डिजे तसेच ढोल ताशांचा तालावर तरूण मंडळी हिरवे झेंडे हातात घेऊन डोलतांना दिसत होते. शहरातील विविध ठिकाणी मिरवणुकीत सहभागी झालेल्या बांधवांना चहा, पाणी, नाश्ताची व्यवस्थाही करण्यात आली होती. यावेळी शहरातील प्रमुख रस्त्यावरील वाहतुकीच्या मार्गात काही काळासाठी बदल करण्यात आला होता. शहरातील बसस्थानक, पलटण, इंदिरा चौक ते जुनी नगर पालिका रस्त्यावर हिरवे झेंडे लावण्यात आले होते. मिरवणुक मार्गावर सर्वत्र चोख पोलिस बंदोबस्त लावण्यात आला होता. ही मिरवणुक शांततेत पार पडली.

# जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या शाखा अभियंत्याच्या चौकशीचे आदेश

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ सप्टेंबर**

हिंगोली जिल्हा परिषद बांधकाम विभागांतर्गत कार्यरत शाखा अभियंत्याच्या कामकाजाच्या चौकशीचे आदेश देण्यात आले असून पुढील चार दिवसात सविस्तर चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अंजली रमेश यांनी दिले आहेत.

हिंगोली जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागांतर्गत कार्यरत शाखा अभियंता एस बी गीते यांना बांधकाम विभागाकडून एकाच वेळी तीन तालुक्याचा पदभार दिला आहे. यामध्ये त्यांच्याकडे हिंगोली, कळमनुरी, सेनगाव उपविभागाचा पदभार दिला असून याशिवाय जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे उप अभियंता म्हणूनही ते काम पाहत आहेत. एकाच अभियंत्याकडे तीन तालुक्याचा दिलेला पदभार हा चर्चेचा विषय बनला होता. विशेष म्हणजे बांधकाम विभागाच्या या निर्णयामुळे जिल्ह्यातील बांधकाम उपविभागात एकही सक्षम अभियंता नाही का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

एकाच अभियंत्याकडे तीन तालुक्याचा पदभार दिल्यानंतर बांधकाम विभागांतर्गत कामांची तपासणी कशी होणार तसेच गुणवत्ता कशी राखली जाणार असा सवालही उपस्थित होऊ लागला होता. त्यामुळे बांधकाम विभागाच्या कार्यपध्दतीवर टिका होऊ लागली होती.

या प्रकरणात स्वत: मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांनी गांभीर्याने लक्ष घातले असून त्यांनी अभियंता गीते यांच्या कामाच्या चौकशीसाठी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ सुधीर ठोंबरे यांची नियुक्ती केली आहे. त्यांच्याबद्दल आलेल्या तक्रारींची चौकशी करून चार दिवसांत सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांनी दिले आहेत.

शहरानजीक असलेल्या कारवाडी ग्रामपंचायती अंतर्गत मागील तीन महिन्यांपूर्वी सिमेंटचे रस्ते बांधकाम करण्यात आले होते. या रस्त्याचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे झाल्यामुळे लाखो रूपये खर्च करूनही पंधरा दिवसातच या रस्त्यावरील सिमेंट निघून गेले असून रस्त्यावरील गिट्टी बाहेर आली आहे. या रस्त्याची पाहणी जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांनी करावी तसेच पुन्हा या रस्त्याची कामे होणे गरजेचे असल्याची मागणी गंगानगर येथील रहीवाशांमधून होत आहे.

# संस्थान समितीच्यावतीने श्री विघ्नहर्ता चिंतामणी सेवेकऱ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ सप्टेंबर**

शहरातील श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपती बाप्पाच्या दर्शनानिमित्त आलेल्या भाविकांसह इतर अनेक सामाजिक संघटनांनी जी सेवा केली. त्याबद्दल संस्थानच्या वतीने ९ सप्टेंबर रोजी सत्कार करण्यात आला.



श्री गणेश उत्सवात श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपती बाप्पाच्या दर्शनाकरीता दहा दिवसात लाखो भाविकांची गर्दी झाली होती. विशेष करून अनंत चतुथदर्शी निमित्ताने आलेल्या लाखो भाविकांच्या व्यवस्थे करीता अनेक सामाजिक संघटना व बाप्पांच्या भाविकांनी अंग झोकून घेतले होते. त्यामुळे या सर्वांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन ९ सप्टेंबर रोजी करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा पोलिस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्यासह उपविभागीय पोलिस अधिकारी अंबादास भुसारे, तहसीलदार श्रीकांत भुजबळ, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दिपक मोरे, हिंगोली शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संदिप मोदे यांची उपस्थिती होती. यावेळी संस्थानच्यावतीने या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यानंतर मान्यवरांनी अनेक सामाजिक संघटनासह गणेश भक्तांना स्मृतीचिन्ह, शाल व श्रीफळ देवून सत्कार केला. ज्यामध्ये ओम साई, गणेश मंडळ, मारवाडी गल्ली, चाय, कॉंफी, पाणी बॉंटल), चिंतामणी सेवेकरी मित्र मंडळ भोईपुरा,श्री एम्पोरियम, मेडिकल लाईन (अंकित अग्रवाल), विजय आप्पा सराफ मेडीकल लाईन, एकदंत बाल गणेश मंडळ, मेडीकल लाईन, गिरीष मेडिकल (गिरीष गुडेवार), प्रभुदास रायचंद, महावीर चौक (मिसळ), राम राज्य मित्र मंडक, गांधीचौक, चितामणी ग्रुप, गवळीपुरा नवयुवक संघ, विश्वकर्मा गणेश मंडळ, आरामशीन, विजय गव्हाणकर, कालभैरव गणेश मंडल, अनिल खांडल, सदाशिव आप्पा सराफ, श्रीमान श्रीमती जय श्रीराम मित्र मंडल, आदर्श मित्र बाल गणेश मंडल, अरुण चोंढेकर, विघ्नहर्ता ग्रुप, खटकाळी हनुमान मंदीर, ऑटो संघटना, त्रिशुल नवदुर्गा, हिंगोलीचा राजा गणेश मंडळ मुन्नासेठ बंगाडीया, बादल पेरिया, बलराम कुरील, आर्यवेश्य समाज, दिनेश बासटवार, विजय डहाळे, दिपक डहाळे, आशिष घन, पिंटू वर्मा, पंकज पुरी, शिवाजीराव तानाजीराव मुटकुळे, कैलास मेडिकल, राजस्थानी मारवाडी युवा संघटना जिल्हा हिंगोली, श्री विघ्नहर्ता चिंतामणी ग्रुप, आमदार संतोष बांगर मित्र मंडळ तर्फे निलेश बांगर, गणेश दराडे यांच्यासह अनेक भाविकांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन वैभव पांडे तर आभार प्रदर्शन दिलीप बांगर यांनी केले.

यावेळी पोलिस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे, तहसीलदार श्रीकांत भुजबळ व पोलिस निरीक्षक संदिप मोदे यांनी बोलताना श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपती बाप्पाचे आतापर्यंत केवळ नाव ऐकून होतो परंतु आता प्रत्यक्षात या गणपती बाप्पाची ख्याती किती सर्वदूर प्रसिध्द याची प्रचितीच गणेश उत्सवात दिसून आली. लाखोंच्या संख्येने भाविक आले असताना त्यांच्या सेवेसाठी संपुर्ण हिंगोलीकर कशापध्दतीने धावून आले याचे अनेक उदाहरण उपस्थित मान्यवरांनी देवून गणेश भक्तांचे कौतुक केले.

## संक्षिप्त वृत्त...

### परभणीच्या उड्डाणपुलाच्या देखभाल दुरुस्तीसाठी २ कोटी ५२- लाहोटी

**परभणी,/प्रतिनिधी :** मृत्यूचा सापळा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या परभणीच्या धोकादायक उड्डाणपुलाच्या देखभाल दुरुस्तीकरीता राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या नांदेडच्या कार्यकारी अभियंता कार्यालयाने २ कोटी ५२ लाख रुपयांच्या तरतूदीचा प्रस्ताव छत्रपती संभाजी नगर येथील राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या अधिक्षक अभियंत्यांच्या कार्यालयात सादर केला असून गेल्या अडीच महिन्यांपासून तो प्रस्ताव निर्णयाअभावी त्या कार्यालयात धूळखात आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते श्रीनिवास लाहोटी यांनी आज बुधवारी नांदेड येथील राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांची भेट घेतली. त्यातून परभणीच्या धोकादायक ठरलेल्या उड्डाणपुलाची स्थिती निदर्शनास आणून दिली. उड्डाणपुल अक्षरशः मृत्यूचा सापळा बनला आहे त्याचे कारण उड्डाणपुलावरील उखडलेल्या तारा, ठिकठिकाणी पडलेले खड्डे, उड्डाणपुलाची रचना तसेच अन्य गोष्टी अपघातास निमंत्रण देणाऱ्या ठरत आहेत, हेही नमूद केले. यावेळी कार्यकारी अभियंत्यांनी या उड्डाणपुलाच्या देखभाल दुरुस्ती संदर्भातील सर्व बाबींबाबतचा परिपूर्ण असा प्रस्ताव तयार करण्यात आला असून तो प्रस्ताव छत्रपती संभाजीनगर येथील अधिक्षक अभियंत्यांच्या कार्यालयास २५ जून रोजी सादर करण्यात आला आहे. तो प्रस्ताव मंजूर होईल, तरतूद उपलब्ध होईल व लगेचच त्या संबंधीच्या कामांना सुरुवात केली जाईल, अशी माहिती कार्यकारी अभियंत्यांनी दिली.

दरम्यान, या प्रकरणात आपण छत्रपती संभाजीनगरला जावून निधीच्या तरतुदीसाठीचा पाठपुरावा करणार आहोत, अशी माहिती लाहोटी यांनी दिली.

### उपोषणकर्ते विनोद आडे यांचे बेमुदत उपोषण सहाव्या दिवशी स्थगित :

**जिंतूर,/प्रतिनिधी :** बंजारा समाजाचा हैद्राबाद गॅझेटियर प्रमाणे एसटी प्रवर्गात समावेश करावा, या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते विनोद आडे यांनी जिंतूर येथील वसंतराव नाईक यांच्या पुतळ्याजवळ गेल्या सहा दिवसांपासून सुरु केलेले बेमुदत उपोषण प्रशासनाने केलेल्या मध्यस्तीनंतर आज बुधवारी मागे घेतले.

आडे यांच्या या उपोषणाच्या समर्थनार्थ बंजारा समाजाच्या नागरीकांनी आज जिंतूरात जोरदार रास्तारोको आंदोलन केले. या आंदोलनात मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते. आंदोलनकर्त्यांमुळे महामार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प होती. प्रशासनाने मध्यस्ती केल्यानंतर आडे यांनी उपोषण मागे घेतले. तेव्हा रास्तारोको आंदोलन थांबविण्यात आले. दरम्यान, खासदार संजय जाधव यांनी उपोषणकर्ते आडे यांची भेट घेऊन मागणीस समर्थन जाहीर केले व यासाठी आपण केंद्रस्तरावर पाठपुरावा करु, अशी ग्वाही दिली.

### नऱ्हापुर पाटीजवळ ऑटोने दिलेल्या धडकेत एकाचा मृत्यू

**पूर्णा,/प्रतिनिधी :** पूर्णा तालुक्यातील नऱ्हापुर पाटीजवळ भरधाव वेगाने जाणाऱ्या एका ऑटोने दिलेल्या धडकेत मुंजाजी कऱ्हाळे या मोटारसायकल स्वाराचा मृत्यू झाला. ९ सप्टेंबर रोजी सायंकाळी पावणे सात वाजेच्या सुमारास ही दुर्देवी घटना घडली.

चंद्रकांत कऱ्हाळे यांनी पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत त्यांचे चुलत बंधु मुंजाजी कऱ्हाळे हे एम.एच.२२ बी.डी. १९१५ या क्रमांकाच्या दुचाकीवरुन वसमत कारखाना येथून गावी परतत असतांना नऱ्हापुर पाटीजवळ एम.एच. २६ बी.ई. ५७५८ या क्रमांकाच्या मालवाहू ऑटोने जोरदार धडक दिली. त्यात मुंजाजी कऱ्हाळे हे गंभीर जखमी होऊन मृत्यू पावले. दरम्यान, चुडावा पोलिसांनी या नोंद घेतली असून पोलिस तपास करीत आहेत.

### गंगाखेड : वीजेचा धक्का बसल्याने तरुण कामगाराचा दुर्देवी मृत्यू :

#### न्यायालयीन इमारत बांधकामावरील घटना

**गंगाखेड,/प्रतिनिधी :** येथील न्यायालयीन इमारतीच्या बांधकामावर विद्युतीकरणाचे काम करणाऱ्या शेख बाशीद शेख बाबू (वय २५, रा. रहेमत नगर, परभणी) या तरुण कामगाराचा वीजेचा धक्का बसल्याने मृत्यू झाला. गेल्या काही दिवसांपासून शेख बाशीद हे येथील न्यायालयाच्या इमारतीवर विद्युतीकरणाचे काम करीत होते. त्यावर ते भिंतीवर झरी मारत असतांना त्यांच्या डाव्या हाताला वीजेचा मोठा धक्का बसला. त्यात ते मृत्यू पावले. दरम्यान, प्रत्यक्षदर्शनींनी त्यांना येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. परंतु, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी या कामगारास मृत घोषित केले. दरम्यान, गंगाखेड पोलिस ठाण्यात या प्रकरणी नोंद करण्यात आली आहे. मयत शेख बाशीद यांचे अडीच महिन्यापूर्वीच लग्न झाले.

### मनपाद्वारे हजारो अतिक्रमणांकडे साफ दुर्लक्ष

**परभणी,/प्रतिनिधी :** मध्यवस्तीसह चोहोबाजूंच्या प्रमुख चौक व प्रमुख रस्त्यांवर अगदी काना कोपऱ्यापर्यंत भ्रष्ट साखळीच्या खूलेआम आशिर्वादाने स्थिरावलेल्या हजारो अतिक्रमणांविरोधात आजपर्यंत काडीमात्र कारवाई न करणाऱ्या महानगरपालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने आज महानगरपालिकेच्या विद्युत कार्यालय परिसरातच तीन टीनशेड उभारुन अतिक्रमणकर्त्यांनी केलेले अतिक्रमण जेसीबी मशीन आणून हटवले.यावेळी अतिक्रमण विरोधी पथकाचे प्रमुख सहाय्यक आयुक्त जुबेर हाशमी, मुख्य स्वच्छता अधिकारी करण गायकवाड, मुख्य स्वच्छता निरीक्षक श्रीकांत कुरा, स्वच्छता निरीक्षक प्रल्हाद देशमाने, स्वरुप गायकवाड, अब्दुल शादाब, शशी लहाणे, मुकादम आदी कर्मचारी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.
१.**गंगाखेड**- तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, ०२. **पूर्णा**- तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०३. **मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,
०४. **पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०५. **सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# महामानव तथागत भगवान बुद्धांचे विचार जगामध्ये शांतता व सुव्यवस्था आणू शकतात

## अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुंजाळ यांचे प्रतिपादन

**संपत तेली**

**पूर्णा /प्रतिनिधी-** शहरातील बुद्ध विहार येथे अखिल भारतीय भिक्खू संघाचे कार्याध्यक्ष डॉ.उपगुप्त महाथेरो व भदंत पयावंश,भदंत पयासार यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली आणि रोहिणी धम्म सेवाभावी महिला मंडळ यांच्या विद्यमाने भाद्रपद पौर्णिमेनिमित्त जाहीर धम्मदेशना व सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून परभणी अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुंजाळ, सार्वजनिक बांधकाम विभाग सेवानिवृत्त सचिव सु.ल.जाधव पूर्णा नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष विशाल कदम,डॉ.बी एस.नरवाडे परभणी जिल्हा वकील संघाचे माजी अध्यक्ष ॲड. रवी गायकवाड, डॉ.संघमित्रा नरवाडे आदींची उपस्थिती होती. यावेळी उपस्थितांना संबोधित करताना जिल्हा अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुंजाळ यांनी महामानव तथागत भगवान बुद्ध यांच्या जीवन कार्यावर यथोचित प्रकाश टाकताना ते म्हणाले जगामध्ये शांतता सुव्यवस्था मंगल मैत्री समता भाव आणण्याचा सामर्थ्य बुद्ध विचारांमध्ये आहे. आपल्या संबोधनामध्ये त्यांनी अनेक ऐतिहासिक संदर्भ देऊन बुद्ध धम्माची महती विशद केली. सम्राट अशोक यांनी कलिंगच्या युद्धानंतर स्वतःमध्ये परिवर्तन करून घेतले. आज देशाचे मानमुद्रा असेल राष्ट्रीय प्रतीके असतील ती सर्व सम्राट अशोकांचीच देण आहे. आम्ही पोलीस अधिकारी म्हणून शांतता सुव्यवस्था प्रस्थापित करण्याचे काम करतो भगवान बुद्धांच्या शिकवणीच काम आम्ही कायद्याद्वारे करत असतो. सेवानिवृत्त मुख्य सचिव सु.ल. जाधव यांनी आपल्या मनोगतात सांगितले पूर्णा येथील बुद्ध विहार एक आदर्श संस्कार केंद्र आहे. येथील ग्रंथालय अभ्यासिका स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एक पर्वणी आहे. अनेक विद्यार्थी विद्यार्थिनी येथे अभ्यास करून स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून





शासकीय सेवेत अधिकारी कर्मचारी म्हणून कार्यरत आहे. यावेळी त्यांनी बुद्ध विहाराच्या विकास कामाला पन्नास हजार रुपयांची मदत जाहीर केली. माजी नगराध्यक्ष विशाल कदम यांनी बुद्ध धम्मा विषयी बोलताना सांगितले विज्ञानावर आधारित बुद्ध धम्म आहे. यामध्ये अंधश्रद्धा बुवाबाजी कर्मकांड नाही. भदंत डॉ उपगुप्त महाथेरो पूर्णा शहराला नेहमीच मार्गदर्शकाच्या भूमिकेत राहिले आहे. आपल्या प्रमुख धम्मदेशनेमध्ये डॉ. उपगुप्त महाथेरो यांनी चारित्र्य नीतिमत्ता सदाचाराची धडे बुद्ध विहारांमधून मिळत असतात यासाठी कुशल कर्माचा संचय केला पाहिजे. बुद्ध विहारातून हे काम सातत्याने होत असते. प्रमुख पाहुण्यांचा यथोचीत सत्कार शाल पुष्पहार बुद्ध विहार लूम्बुनी स्मरणिका स्मृतिचिन्ह देऊन बुद्ध विहार समितीच्या वतीने करण्यात आले. नगरसेवक ॲड.हर्षवर्धन गायकवाड यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने विहार समितीच्या वतीने प्रमुख पाहुने अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुंजाळ, माजी उपनगराध्यक्ष विशाल कदम,सार्वजनिक बांधकाम विभागाचे सेवानिवृत्त सचिव सु.ल. जाधव सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता बी.के. आदमाने,परभणी येथील डॉ. नरवाडे,पूर्णा नगरपालिकेचे माजी उपाध्यक्ष उत्तम भैया खंदारे, उद्योजक गौतम भोळे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी दिलीप गायकवाड, त्र्यंबक कांबळे, अमृत मोरे, शिवाजी थोरात,मुगाजी खंदारे, ज्ञानोबा जोंधळे, इंजिनीयर पी.जी. रणवीर,साहेबराव सोनवणे आदींची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी किशोर ढाकरगे, बौद्धाचार्य त्र्यंबक कांबळे, अतुल गवळी,राम भालेराव, बौद्धाचार्य अमृत कराळे, सुरज जोंधळे बाळू बरबडीकर, राजू जोंधळे आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीकांत हिवाळे यांनी केले.

## जोंगीतांडा येथील लाटे व भिसे शिक्षकांची बदली

**जिंतूर,/प्रतिनिधी-** जि. प. प्रा. शा. जोंगीतांडा येथे दि. ११ सप्टेबर २०२५ रोजी मागील सहा वर्षापासुन प्राथमिक शिक्षक म्हणून ज्ञानज्ञानाचे पवित्र कार्य करणारे शिवाजी लाटे व प्रविण भिसे यांची बदली झाल्यामुळे शाळा व्यवस्थापन समिती जोगीतांड्याच्या वतिने शिवाजी लाटे व प्रविण भिसे याचा शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुदाम राठोड याच्या अध्यक्षतेखाली व माजी अध्यक्ष बाळु भाऊ केराई



याच्या पुढाकारतून निरोप समारंभ कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

यावेळी समस्त गावकरी व केहाळ केंद्राचे उच्चश्रेणी मुख्याध्यापक के. के. साबळे, शिवसांभ मुक्कनवार, सारंगधार पजई सर,विशाल लोखंडे,भिवाजी गायकवाड सर,अंकुश केराई याची प्रमुख उपस्थिती होती.यासमयी राहुल गवळी सर यानी विद्यार्थांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सुत्रसचालन तुकाराम काळे तर आभार प्रदर्शन विष्णू जाधव यानी केले. यावेळी शिक्षकांनी आपल्या या शाळेतील आठवणीला जातांना मोठा उजाळा दिला होता. तसेच विद्यार्थ्यांचेही कोतुक केले होते.

## जिल्हयात पुन्हा एकदा पावसाची हजेरी

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी जिल्हयात पुन्हा एकदा पावसाने आपली हजेरी लावली होती.

गेल्या काही दिवसापुर्वी म्हणजेच गौरी-गणपती या सणाच्या दिवशी देखील पावसाने चांगलीच हजेरी लावली होती.त्यानंतर पुन्हा एकदा परभणी जिल्हयात दिनांक ११ सप्टेंबर रोजी पावसाने आपली हजेरी लावली आहे. त्यातच या पावसाचा परिणाम सध्या शेतातील सोयाबीन, कापूस, हळद, तुर या पिकांवर होत आहे. पिके जास्त पाऊस पडल्यामुळे पिवळी तसेच कीड धरु लागली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना यावर्षी सोयाबीन या पिकांत तर मोठया प्रमाणात घट होणार असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यातच कापसाचा उतारा देखील येणे मुश्कील होवून बसलेले दिसत आहे. सध्याच्या घडीला पावसामुळे पिकांनी माना टाकल्या आहेत. शिवाय पिकांवर मोठया प्रमाणात कीड पडलेली दिसून येत आहे. त्यामुळे बळीराजा पुन्हा एकदा चांगलेच परेशान झालेले दिसून येत आहे.

## सेलू येथील शासकीय विश्रामगृहाच्या विस्तारीकरणास प्रशासकीय मान्यता

**सेलू/प्रतिनिधी-** सेलू येथील शासकीय विश्रामगृहाच्या विस्तारीकरणास सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रशासकीय मान्यता दिली असून सुमारे रु.३२३ लक्ष इतक्या रकमेच्या



अंदाजपत्रकास ही मान्यता देण्यात आली आहे. यासाठी सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी पाठपुरावा केला होता. प्रशासकीय मान्यतेबद्दल श्रीमती बोर्डीकर यांनी समाधान व्यक्त केले आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाचा शासन निर्णय क्र.बीडीजी-२०२५/प्र.क्र. २९९/इमारती-३, दि. १० सप्टेंबर, २०२५ अन्वये शासकीय विश्रामगृहाचे विस्तारीकरणास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांनी सेलू येथील शासकीय विश्रामगृहाचे विस्तारीकरण करण्यासाठी कामाचे अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेस्तव शासनास सादर केले होते. प्रस्तावाच्या छाननीअंती अंदाजपत्रकातील कामाच्या समाविष्ट बाबी व त्याच्या किंमतीमध्ये सुधारणा केल्यानंतर प्रशासकीय मान्यता देण्यात आली. विश्रामगृहाच्या विस्तारीकरणाच्या कामामध्ये तळमजला बांधकाम, विद्युतीकरण, अग्निशमन यंत्रणा,वातानुकूलन, पंप आणि जनरेटर, परिसराची प्रकाशयोजना, सीसीटीव्ही, पाणीपुरवठा आणि स्वच्छता, पाण्याचा मुख्य साठा, फर्निचर,अंतर्गत / मार्ग रस्ते, जमीन विकास, पार्किंग, जमीन स्केपिंग आदी बाबींचा समावेश आहे.

## अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या लाभार्थ्यांना सीएससी केंद्रामधून मिळणार माफक दरात सेवा- देशपांडे

**मोहन धारासूरकर**

**परभणी,/प्रतिनिधी- :** अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या लाभार्थ्यांना आता आपले सरकार सेवा (सीएससी) केंद्रामधून महामंडळाच्या योजनांचा लाभ माफक दरात घेता येणार आहे. याबाबतचा सामंजस्य करार महामंडळाच्या मुख्य कार्यालयामध्ये महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजयसिंह देशमुख व आपले सरकार सेवा (सीएससी) केंद्राचे प्रमुख वैभव देशपांडे यांच्या उपस्थितीत नुकताच करण्यात आला आहे.

या करारानुसार, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे लाभार्थी आता त्यांच्या जवळच्या कोणत्याही सीएससी केंद्रावर जाऊन महामंडळाच्या योजनांचा लाभ कमी दरात घेऊ शकतील. यामध्ये महामंडळाच्या योजनांसाठी ऑनलाइन अर्ज भरणे, कागदपत्रे अपलोड करणे, योजनेची सद्यस्थिती तपासणे आणि आवश्यक मार्गदर्शन मिळवणे यांसारख्या सुविधांचा समावेश आहे. सीएससी केंद्र हे ग्रामीण भागातील नागरिकांसाठी विविध सरकारी आणि खासगी सेवा पुरवण्याचे महत्त्वाचे माध्यम आहे. महामंडळाने सीएससी केंद्रासमवेत केलेल्या करारामुळे महामंडळाच्या लाभार्थ्यांना योजनेचा लाभ घेण्यासाठी जिल्ह्याच्या ठिकाणी जाण्याची गरज भासणार नाही, त्यामुळे त्यांचा वेळ आणि पैसा वाचेल.




महामंडळाचे अध्यक्ष म्हणाले की, या करारामुळे आमची उदिष्ट्ये अधिक प्रभावीपणे पूर्ण होतील. राज्याच्या कानाकोपऱ्यात असलेल्या गरजू आणि पात्र तरुणांपर्यंत महामंडळाच्या योजना पोचणार आहेत.

कमी खर्चात आणि त्यांच्या घराजवळच त्यांना आवश्यक सेवा मिळाल्यामुळे त्यांना स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहित करुन मराठा समाजातील तरुणांना उद्योजक करण्याचे महामंडळाचा उद्देश पुर्णत्वास नेणे सोपे होईल. राज्यामध्ये सीएससीचे ७२ हजार पेक्षा जास्त केंद्र कार्यरत असल्याने त्यांच्या माध्यमातून अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या लाभार्थ्यांना त्यांच्या गावातूनच पात्रता प्रमाणपत्र कागदपत्र, बँकेचे कर्ज मजुरी, बँकेचा हप्ता अपलोड करण्यासाठी प्रत्येकी रु. ७०/- शुल्क आकारण्यात येणार असल्याची माहिती महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक विजयसिंह देशमुख यांनी दिली. भविष्यात लाभार्थ्यांसाठी महामंडळाचे मोबाईल ॲप व चॅट बॉट सारख्या सुविधा देखील उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या नवीन उपक्रमामुळे महामंडळाच्या योजनांचा लाभ घेण्याची प्रक्रिया अधिक सोपी, पारदर्शक आणि किफायतशीर होईल असे महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले. महामंडळाचे उपमहाव्यवस्थापक आकाश मोरे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती दिली आहे.

## सेलू शहरात पसरले घाणीचे साम्रज्य ; नागरिकांतून होतोय संताप

### सेलू पालिकेचे दुर्लक्ष कारणीभुत

**सेलू,/प्रतिनिधी-** सेलू शहराच्या अनेक भागात रसत्यावर, मूस्लीम समाजाच्या मज्जीत जवळ , अनेक ठिकाणी घाण पसरली असून स्वच्छता विभागा कडून या बाबत दिरंगाई होत असल्यामूळे शहरात घाणीचे साम्राज साजलेच असे बोलले जात आहे.

शहरातील राजीव गांधी नगर, छत्रपती शिवाजी नगर, विध्या नगर अशा अनेक ठिकाणी घान साचलेली असून मूस्लीम समाज शूक्रवारी नमाज करीता जाण्या करीता मज्जीत समोरच व मागील भागा कडून पाणी साचलेले असल्या मूळे अनेक अडचणींना समाज बांधवाना रामोरे जावे लागत आहे, पालिकेत तक्रार केल्यास हा विभाग माझ्या कडे नाही तो माझा कडे आहे असे टोलावा टोलवी उत्तर मिळतात , काम काही होत नसल्याची तक्रार नागरीकांत होत आहे, स्वच्छ व सूंदर शहराचा नांव कमी होत का? असे उघड उघड मतदारात बोलले जात असल्या मूळे राजकीय पक्षाचे नेते फक्त फोटो काढण्यातच दंग असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

मागील काही दिवसा पासून पालिकेने कहरच केला आत्यआवश्यक सेवा मनजे जन्म मूत्यू नोंद बंद असून ती




सूरू कधी होईल हे सांगता येत नसल्या मूळे अनेक गरजूंना पालिकेत खेटर घासावि लागत असल्या मूळे पालिका विरोधात जनतेचा रोष दिसून येत असल्याचे नागरीकात बोलले जात आहे.

दरम्यान सेलू पालिकेला यापुर्वी देखील नागरिकांच्यावतीने अनेक तक्रार अर्ज दाखल करण्यात आलेले होते परंतू तरी देखील त्यातक्रारीकडे मुख्याधिकारी सेलू यांनी लक्ष दिले नसून त्यामुळे याचा जास्तीत जास्त त्रास हा सर्वसामान्य नागरिकांना होत आहे. त्यामुळे सेलू शहरात अशा प्रकारे घाणीचे साम्राज्य वाढतांना दिसून येत आहे.

# हैद्राबाद मुक्तिसंग्राम दिन आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा वर्धापन दिन विविध उपक्रमांसह साजरा होणार

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ११ सप्टेबर-**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे हैद्राबाद मुक्तिसंग्राम दिन आणि विद्यापीठाचा वर्धापन दिन यानिमित्ताने दि.११ ते १९ सप्टेंबर या दरम्यान विविध शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा आणि बौद्धिक उपक्रमांच्या माध्यमातून उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. असे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मनोहर चासकर यांनी दि. ११ सप्टेंबर रोजी विद्यापीठामध्ये आयोजित पत्रकार परिषदेमध्ये सांगितले.

दि.११ सप्टेंबर रोजी जिल्हास्तरावर वक्तृत्व व निबंध स्पर्धा होणार आहेत. यामध्ये वक्तृत्व स्पर्धेसाठी राष्ट्रीय शिक्षण धोरण व मराठवाड्यातील उच्च शिक्षणाच्या दिशा हा विषय असणार आहे. यास्पर्धा लातूर येथील जयक्रांती महाविद्यालय, परभणी येथील शिवाजी महाविद्यालय, हिंगोली येथील आदर्श महाविद्यालय, आणि नांदेड येथील एन. एस. बी. महाविद्यालय येथे आयोजित करण्यात आल्या आहेत. तर निबंध स्पर्धेसाठी उच्च शिक्षणातील संधी आणि आव्हाने व मराठवाड्यातील उच्च शिक्षण: भविष्यकालीन दिशा हे दोन विषय असणार आहेत. यास्पर्धा लातूर येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, परभणी येथील महिला महाविद्यालय, हिंगोली येथील शिवाजी महाविद्यालय आणि नांदेड येथील सायन्स कॉलेज येथे आयोजित करण्यात आली आहे. दि.१२ सप्टेंबर रोजी भित्तिपत्रके, ग्रंथ प्रदर्शन आणि रांगोळी स्पर्धा विद्यापीठातील ज्ञानस्रोत केंद्रामध्ये आयोजित करण्यात येणार आहेत. यामध्ये भिंतीपत्रके हैदराबाद मुक्तिसंग्राम व विद्यापीठाचा वैभवशाली इतिहास यावर असणार आहेत. तर रांगोळी स्पर्धेचा विषय हैदराबाद मुक्तिसंग्राम असा आहे. दि.१३ सप्टेंबर रोजी विद्यापीठ स्तरावरील वक्तृत्व व निबंध स्पर्धा होणार आहेत. यामध्ये वक्तृत्व स्पर्धेसाठी राष्ट्रीय शिक्षण धोरण व मराठवाड्यातील उच्च शिक्षणाच्या दिशा हा विषय असणार आहे. ही स्पर्धा विद्यापीठाच्या अधिसभा सभागृह येथे आयोजित करण्यात आली आहे. तर निबंध स्पर्धेसाठी उच्च शिक्षणातील संधी आणि आव्हाने व मराठवाड्यातील उच्च शिक्षण: भविष्यकालीन दिशा हे दोन विषय असणार आहेत. ही स्पर्धा विद्यापीठाच्या ज्ञानस्रोत केंद्र येथे आयोजित करण्यात आली आहे. दि.१५ सप्टेंबर रोजी हैद्राबाद मुक्तिसंग्राम समजून घेतांना या विषयावर लातूर येथील दयानंद कला महाविद्यालय, परभणी येथील स्वा. सै. सुर्यभानजी पवार महाविद्यालय, पूर्णा, हिंगोली येथील बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमत आणि नांदेड येथील यशवंत महाविद्यालयामध्ये व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे. दि.१६ सप्टेंबर रोजी पीपल्स कॉलेज, नांदेड येथे परिसंवादाचे आयोजन करण्यात येणार आहे. या परिसंवादाचा विषय राष्ट्रीय शिक्षण धोरण व मराठवाड्यातील उच्च शिक्षणाच्या दिशा असा असणार आहे. तसेच याचदिवशी म्हणजे १६ सप्टेंबर रोजी विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी खेळांच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. दि.१७ सप्टेंबर रोजी ध्वजारोहण सोहळा पार पडल्यानंतर लगेचच विद्यापीठ परिसर. उपपरिसर व विद्यापीठ परिक्षेत्रातील महाविद्यालयामध्ये वृक्षरोपण करण्यात येणार आहे. विद्यापीठाचा ३१ वा वर्धापन दिन आणि हैदराबाद मुक्तिसंग्रामाचा ७८ वा वर्धापन दिन अशी दोन्ही मिळून १०९ रोपांचे वृक्षारोपण विद्यापीठ परिसरात करण्यात येणार आहे. याचबरोबर देशभक्तीपर समूहगीत गायन स्पर्धा विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात घेण्यात येणार आहे. याच दिवशी विद्यापीठ परीक्षेतील चारही जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी समवेत सहविचार सभेचे आयोजन करण्यात येणार आहे. १८ सप्टेंबर रोजी हैदराबाद मुक्तिसंग्राम दिन व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त सन २०२४ ते २०२५ या वर्षासाठीचे विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे. यामध्ये परीक्षा विभागामार्फत गुणवंत विद्यार्थ्यांना दिले जाणारे विविध पुरस्कार, विद्यार्थी विकास विभागामार्फत दिले जाणारे विविध पुरस्कार, क्रीडा विभागामार्फत दिले जाणारे विविध पुरस्कार, राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत दिले जाणारे विविध पुरस्कार, विद्यापीठ कर्मचारी यांच्या गुणवंत पाल्यांचा गुणगौरव, शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांच्या क्रीडा स्पर्धेमधील विजेत्यांचा सत्कार, वर्धापन दिन सप्ताहात संपन्न झालेल्या विविध स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ पार पडणार आहे. १९ सप्टेंबर रोजी हैदराबाद मुक्तिसंग्राम दिन व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त सन २०२४ ते २०२५ या वर्षासाठीचे विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे. यामध्ये जीवनसाधना गौरव पुरस्कार, उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार, उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार, उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार, उत्कृष्ट संशोधन व तंत्रज्ञान योगदान पुरस्कार, पेटंट प्राप्त शिक्षक पुरस्कार, उत्कृष्ट प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी पुरस्कार, सेट/नेट उत्तीर्ण व पीएच.डी. प्राप्त शिक्षक/अधिकारी/कर्मचारी गौरव समारंभ पार पडणार आहे.

या पत्रकार परिषदेमध्ये विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. अशोक महाजन यांनी आभार मानले. याप्रसंगी कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, प्रा. डॉ. शशिकांत ढवळे, प्रा. बालाजी मुधोळकर, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम यांची प्रमुख उपस्थिती होती.

## मराठा आरक्षण आंदोलनात सहभागी समाज बांधवांचा सत्कार

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ११ सप्टेबर-**

नांदेड दक्षिण मतदार संघात असलेल्या जिल्हा परिषद सर्कल सोनखेड, धनेगाव ,बळीरामपुर ,वाजेगाव मधील प्रत्येक गावातील आरक्षणासाठी करण्यात आलेल्या मुंबई येथील आंदोलनात सहभागी झालेल्या समाज बांधवांचा माजी जिल्हा परिषद सदस्य मनोहर पाटील शिंदे यांनी दिनांक १० सप्टेंबर रोजी प्रत्येक गावी भेट देऊन भगवी दस्ती घालून सत्कार करण्यात आला. या कार्याचे सर्व गावातून मनोहर शिंदे यांचे कौतुक होत आहे.



मराठा समाजाला आरक्षण मिळवण्यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी मुंबई येथे आझाद मैदानावर उपोषण केले होते. या उपोषणास पाठिंबा म्हणून महाराष्ट्र सह मराठवाड्यातील मराठा

समाज बांधवांनी कसल्याच बाबींचा विचार न करता या उपोषणात सहभागी होऊन शासनास धारेवर धरले होते. या आंदोलनात सहभागी झालेल्या दक्षिण मतदार संघातील जिल्हा परिषद सर्कल मधील सोनखेड धनेगाव वाजेगाव बळीरामपूर येथील या चारही सर्कल मधून बाभुळगाव , तुप्पा , काकांडी, राहेगाव भायेगाव,किकी यासह चारही जिल्हा परिषद सर्कल मधील सर्व गावातील आंदोलनात सहभागी झालेल्या तरुण व ज्येष्ठ मंडळीचे माजी जिल्हा परिषद सदस्य मनोहर पाटील शिंदे यांनी भगवी दस्ती घालून स्वागत केले याप्रसंगी गावातील समाज बांधवांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. मनोहर पाटील शिंदे यांनी केलेल्या या उल्लेखनीय कार्याबद्दल सर्व गावातून त्यांचे कौतुक होत आहे.

## संक्षिप्त वृत्त

### उमरी ग्रामिण रुग्न कल्याण समितीवर संजय कुलकर्णींची निवड


**उमरी** -उमरी ग्रामिण रुग्नालयाचे रुग्न कल्याण समितीवर आमदारांचे प्रतिनिधी म्हणून उमरीचे माजी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी यांची नेमणूक



नायगाव विधानसभेचे आ. राजेश पवार यांनी एका पत्रकाव्दारे केली आहे. उमरी तालूक्यातील ६२ गावातील गोरगरीब जनतेचा आधार असलेले हे ग्रामिण रुग्नालय असून त्याठिकाणी वैद्यकिय सोयी, सुविधा पुरविणे, रुग्णालयीन कर्मचाऱ्यांचे कामाचा आढावा घेणे, रुग्नांना मोफत औषधी व इतर सेवा उपलब्ध करुन देणे आदीं ह्या समितीची कर्तव्य आहेत.मागिल रुग्न कल्याण समितीवर आमदार प्रतिनिधी म्हणून सौ. पुनम ताई राजेश पवार ह्या होत्या. जिल्हाशल्य चिकित्सकांना दिलेल्या पत्रात उमरी साठी संजय कुलकर्णी, नायगाव साठी सौ. पुनम ताई पवार आणि धर्माबाद साठी राम पाटील बन्नाळीकर यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. ह्या निवडीचे मतदार संघातील अनेक कार्यकर्त्यांनी स्वागत केले असुन संबधितांचे अभिनंदन केले आहे. माजी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी यांनी ह्यानिवडी बध्दल आ. राजेश पवार यांचे आभार मानले आहेत. विषेश म्हणजे दिवंगत आ. वसंतराव चव्हाण यांचे कार्यकाळात त्यांचे प्रतिनिधी म्हणून संजय कुलकर्णी यांनी उमरी ग्रामीण रुग्णालयात रुग्न कल्याण समिती सदस्य म्हणून काम केलेले आहे.

### कालवश भगवानराव कांबळे यांच्या पुण्यतिथीनिमित्त विद्यार्थ्यांना फळ वाटप

**मुदखेड**-मुदखेड शहरातील भीम नगर येथील माजी सहाय्यक सहकार अधिकारी, व सिद्धार्थ एज्युकेशन सोसायटी मुदखेड द्वारा संचलित वसंतराव नाईक अध्यापक व मिलिंद हायस्कूलचे संस्थापक अध्यक्ष समाज हितासाठी नोकरीचा राजीनामा देऊन समाजकार्यात सक्रिय असणारे



सामाजिक कार्यकर्ते व माजी नगरसेवक का.भगवानराव विठ्ठलराव कांबळे यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांचे चिरंजिव हर्षवर्धन कांबळे, विलास कांबळे,राहूल कुमार कांबळे,मनोज कांबळे, यांच्या वतीने दरवर्षी अनेक उपक्रम राबविले जातात जसे कि रक्तदान शिबिर, गरजूंना आर्थिक मदत,असे सामाजिक उपक्रम का.भगवानराव कांबळे यांची प्रेरणा घेऊन त्यांचे चिरंजीव हा उपक्रम राबवीत असतात. त्याच अनुषंगाने दि. ११ सप्टेंबर रोजी का.भगवानराव कांबळे यांच्या १७ व्या पुण्यतिथीनिमित्त कांबळे परिवार व मित्रमंडळाच्या वतीने मुदखेड ग्रामीण रुग्णालय व निवासी मुकबधीर विद्यालय येथील मुकबधिर विद्यार्थ्यांना फळ व बिस्कीट पुडे वाटप करण्यात आले. यावेळी उपस्थित असलेले डॉ. अशिष कदम, विलास कांबळे, मनोज कुमार कांबळे, भावेश कांबळे, सैनिक फेडरेशनचे तालुकाध्यक्ष सुनील चौदंते,,डॉ गायकवाड, काँग्रेस जिल्हाउपाध्यक्ष राजू चौदंते,नितीन चौदंते,अमोल चौदंते, गफार भाई पारेवाले, शेख बिलाल, संघर्ष चौदंते, अंकुश मामीडवार,अश्विन चौदंते,रवी सावते, गोपी कवानकर, शीलवंत डोंगरे, निखिल चौदंते,राम पाचपोळे, आनंद बगाटे, बालाजी कोलते, अमोल एडके, सचिन चौदंते, गोटू सिरसागर, रोहीत झगडे, रोहित कांबळे,आरुण चौदंते, यासह कांबळे परिवार व मित्रमंडळ यांची उपस्थीती होती.

### आ.भीमराव केराम यांच्या हस्ते एमबीबीएस निवड झालेल्या भूमी वर्मा हिचा सत्कार

**माहूर**-कु.भूमी हिने कठीण अभ्यासाच्या अथक परिश्रमातून एमबीबीएस च्या पहिल्याच यादी मध्ये मिळवलेले यश हे निश्चीतच किनवट-माहूर सारख्या आदिवासी बहुल,दुर्गम डोंगराळ भागातील सर्व व्घ्यिार्थ्यांसाठी प्रेरणादायी असून, आद्य पत्रकार दिवंगत दत्त वर्मा यांची नात कु.भूमी हिच्या यशाचे सत्कार निमित्ताने कै.दत्त वर्मा यांच्या मैत्री पूर्ण संबंधाच्या स्मृती आज ताज्या झाल्या आहेत! भूमीने आजोबांचे स्वप्न पूर्ण करत त्यांना खऱ्या अर्थाने आनंदाजली अर्पण केली आहे! असे भावनिक प्रशसोंद्गार आमदार भीमराव केराम यांनी काढले. माहूर येथील कु.भूमी रणजीतसिंह वर्मा हिची श्रीमती काशीबाई नवले वैद्यकीय महाविद्यालय, पुणे येथे एम. बी. बी. एस. या वैद्यकीय शिक्षणासाठी निवड झाल्याबद्दल तीचा अभिनंदनासह सहृदय सत्कार दि.०३ सप्टेंबर रोजी दुपारी ०४:०० वाजता शहरातील शासकीय विश्रामगृहात आयोजित एका विशेष सत्कार समारंभात किनवट-माहूरचे आमदार भीमराव केराम यांच्या हस्ते अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला. तर यावेळी माझ्या गल्लीतील तथा माहूर शहरातील मुलींमधून एम. बी. बी. एस. डॉक्टर होण्याचा बहुमान भूमीने प्राप्त केला असल्याने सर्वांसाठी निश्चितच ही अभिमानास्पद बाब आहे! असे मनोगत भाजपाचे ज्येष्ठ नेते अनिल वाघमारे यांनी व्यक्त केले .सत्कार प्रसंगी भूमीने आपल्या या यशाचे श्रेय हे आई जयश्रीवर्मा, वडील रणजीत वर्मा, मनिषा वर्मा ,जितेंद्र वर्मा, सुमित्रा वर्मा यांच्या आशीर्वादाचे फळ असल्याचे सांगितले. यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष निळकंठ मस्के, शहराध्यक्ष तथा नगर सेवक गोपू महामुने, नगरसेवक तथा प्राचार्य राजेंद्र केशवे, जीवन अग्रवाल, हर्षदीप दिक्षीत, अशोक जोशी ,जयकांत मोरे, विनायक मुसळे विजय सूर्यवंशी, संगीता सूर्यवंशी यांची उपस्थिती होती.या सत्कार सोहळ्याचे संचालन महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे माहूर तालुकाध्यक्ष शेषराव पाटील यांनी केले.

## माहूर ते मोहपूर बसफेरी सुरू; भाजपा कार्यकर्ते अजय पवार यांच्या प्रयत्नांना यश

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. ११ सप्टेबर-**

आमदार भीमराव केराम यांच्या मार्गदर्शनाखाली आणि त्यांच्या आदेशाने भारतीय जनता पक्षाचे माजी तालुका उपाध्यक्ष अजय पवार यांच्या सार्थक प्रयत्नाने माहूर तालुक्यातील ग्रामीण भागातील वानोळा सर्कल मध्ये माहूर ते मोहपूर ही बहुप्रतिक्षित बस सेवा बुधवार दि. १० सप्टेंबर पासून सुरू करण्यात आली. या बसफेरीचा लाभ वानोळा सारख्या पहाड पट्टीतील नागरीकांसह शेतकरी व विद्यार्थ्यांना मिळणार असल्याने आनंदाचे वातावरण पसरले असून, आमदार केराम यांच्यासह भाजपा कार्यकर्ते अजय पवार यांचे आभार व्यक्त करण्यात येत आहे.

.माहूर आगारातून ही बस सकाळी ०७:०० वाजता सुटणार असून, दत्तमांजरी,वजरा (शेफ), मांडवा, पानोळा, वानोळा, पाचुंदा, कुपटी,साकुर, दिगडी या मार्गे सकाळी ०८:४५ वाजता मोहपुर येथे पोहोचणार आहे. तर पुन्हा परतीच्या प्रवासाला मोहपुर येथून सकाळी



०९:०० वाजता निघणार असून, दिगडी, साकुर, कुपटी, पाचुंदा, वानोळा, पानोळा, मांडवा, वजरा (शेफ),दत्तमांजरी, दत्त शिखर मार्गे सकाळी १०:३० वाजता माहूर बसस्थानकात पोहोचणार आहे. तर दुसरी फेरी ही सायंकाळी माहूर वरून ०५:१५ वाजता सुटणार असून, दत्तमांजरी, वजरा (शेफ), मांडवा,पानोळा, वानोळा,पाचुंदा,कुपटी, साकुर, दिगडी यामार्गे सायंकाळी ०६:३० वाजता मोहपुर येथे पोहोचणार आहे. परतीच्या प्रवासाला मोहपुर येथून ०६:४५ वाजता निघणार असून, दिगडी, साकुर, कुपटी, पाचुंदा, वानोळा, पानोळा मांडवा ,वजरा (शेफ), दत्तमांजरी, दत्त शिखर मार्गे माहूर बसस्थानकात रात्री ०७:३० वाजता पोहोचणार असल्याची माहिती भाजपचे माजी तालुका उपाध्यक्ष तथा धडाडीचे कार्यकर्ते अजय पवार यांनी दिली आहे.

अजय पवार यांनी मागील जवळपास दहा महिन्यांपासून माहूर येथून वानोळा सर्कल मधील ग्रामीण भागात बस सेवा सुरु करण्यात यावी, यासाठी आमदार भीमराव केराम यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या माध्यमातून सतत पाठपुरावा करून अखेर सार्थक प्रयत्नाने या मार्गावर सर्वसामान्य नागरिकांना परवडणारी व सुरक्षित प्रवासाची हमी देणारी एसटीची बससेवा सुरू केली असल्याचे त्यांनी दैनिक तरुण भारत शी बोलताना सांगितले.

## संतांची शिकवण: समतेचा दीप प्रज्वलित करणारा प्रकाश

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. ११ सप्टेबर-**



आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात माणूस प्रगतीच्या शिखरावर पोहोचत असला, तरी त्याच्या मनातील माणुसकी आणि समतेच्या मूल्यांना तडा जाऊ लागला आहे. अशा काळात संतांचे विचारच समाजाला योग्य दिशा दाखवू शकतात, असे प्रतिपादन समतादूत श्री. दिलीप सोंडारे यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्या वतीने जिल्हा परिषद हायस्कूल मांजरम येथे संत समतेची शिकवण प्रबोधन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना सोंडारे यांनी संतांची शिकवण, भारतीय संविधानातील मूल्ये, शिक्षणाचे महत्व, समाज कल्याणाच्या विविध योजना आणि विद्यार्थ्यांमधील संस्कार यावर अत्यंत प्रभावी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक टिकाने सर होते. यावेळी व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष उमाकांत मंगनाळे, तसेच स.शि. सय्यद, बैस सर, फुलारी सर, पाटील सर, नामवाडे सर, पटलेवाड सर, सौ. मठपती, सिरसाठ सर आणि पत्तेवार सर आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संयोजन बार्टीचे महासंचालक श्री. सुनील वारे, निबंधक सौ. इंदिरा आस्वार, विभाग प्रमुख व प्रकल्प अधिकारी नसरीन तांबोळी, सहायक समाजकल्याण आयुक्त श्री. शिवानंद मिनगीरे, व नांदेड जिल्हा प्रकल्प अधिकारी मुंजाजी कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. समतादूतांच्या प्रभावी विचारांनी विद्यार्थ्यांच्या मनात परिवर्तनाचे बीज पेरले. समतेचा संदेश घेऊन गेलेले हे विचार त्यांना नक्कीच उज्वल भविष्याची वाट दाखवतील.

## आ.कोहळीकर यांच्यातर्फे मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. ११ सप्टेबर-**

हदगाव- हिमायतनगर तालुक्यातील सर्व जनतेचे आरोग्याचे प्रश्न आपण सोडवण्यास प्राधान्य देण्यास कटिबद्ध असून त्यास आपले प्रथम कर्तव्य राहणार असल्याचे प्रतिपादन आ. कोहळीकर यांनी केले. त्यांच्याच संकल्पनेतून व दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्था संचालित आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय सावंगी (मेघे)यांच्या संयुक्त विद्यमानाने हदगावात दि.१४ सप्टेंबर रोजी जिल्हा परिषद हायस्कूल येथे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती कळविण्यात आली. तरी या मोफत सर्व रोग निदान व उपचार शिबिराचे लाभ घेण्याचे आव्हान आ. कोहळीकर यांच्यामार्फत करण्यात आले. सामान्य जनतेची आरोग्याची काळजी घेणे ही समाजप्रतिनिधीची प्राथमिक जबाबदारी असून त्याच अनुषंगाने आरोग्य शिबीर आयोजित केले असून यामध्ये नामांकित व अनुभवी तज्ञ डॉक्टरांकडून विविध आजार जसे की, हृदयरोग, डोळ्यांचे विकार, दंतविकार, हाड विकार, किडनी, नाक-कान -घसा, स्त्रीरोग,यासह गंभीर आजारांवरती मोफत शस्त्रक्रिया भरती रुग्णांना खाट शुल्क व जीवन मोफत राहणार आहेत.

**आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे ही माझी प्राथमिक जबाबदारी :आ. कोहळीकर**

सामान्य जनतेला उत्तम व मोफत आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे ही माझी



प्राथमिक जबाबदारी असून यापूर्वी सुद्धा मतदारसंघात ५ वेळा अशी शिबिरांचे यशस्वी आयोजन झाले असून त्याचे अनेक नागरिकांनी लाभ सुद्धा घेतली आहेत तरी या आयोजनाचे गरजू नागरिकांनी अधिकाधिक लाभ घेण्याचे आवाहन आ. कोहळीकर यांच्या वतीने करण्यात आले.

## खा. आष्टीकर यांच्या पत्नी सुषमा आष्टीकर अनंतात विलीन

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. ११ सप्टेबर-**

हिंगोली लोकसभा मतदारसंघाचे खा. नागेश पाटील आष्टीकर यांच्या पत्नीचे अल्पशा आजाराने बुधवारी मुंबईतील जसलोक हॉस्पिटल येथे निधन झाले होते. त्या ५१ वर्षाच्या होत्या त्या मागील वर्षापासून मूत्रपिंडाच्या आजाराने ग्रस्त होत्या. २२ जुलै रोजी त्यांना मुंबईतील जसलोक रुग्णालयात दाखल करण्यात आले होते पण काही दिवसापासून त्यांची प्रकृती खालवत गेली डॉक्टरांनी त्यांना वाचविण्याचे शर्तीचे प्रयत्न केले पण अखेर दि. १० सप्टेंबर रोजी दुपारी तीन वाजता त्यांची प्राणज्योत माळवली त्यांच्या पार्थिवावर मूळ गावी आष्टी येथे हजारोंच्या संख्येने उपस्थित असलेल्या जनसमुदायाच्या साक्षीने शोकाकुल वातावरणात अंतिम संस्कार करण्यात आले.

यावेळी खा. अशोकचव्हाण, खा. संदिपान भुमरे, माजी केंद्रीय राज्यमंत्री सूर्यकांता पाटील, माजी मंत्री माधवराव किन्हाळकर, संपर्कप्रमुख बबन थोरात, खा. रवींद्र चव्हाण, आ. प्रताप चिखलीकर, आ. श्रीजया चव्हाण, आ.राजू नवघरे, आ. बालाजी कल्याणकर, आ. आनंद बोंढारकर, आ. बाबुराव कोहळीकर, आ. किशनराव वानखेडे, माजी खा. सुभाष वानखेडे, माजी खा. शिवाजी माने, माजी आ. माधवराव जवळगावकर, माजी आ. हनमंत बेटमोगरेकर, माजी आ. मोहन हंबर्डे, माजी आ. सुभाष साबणे, माजी आ. ओमप्रकाश पोकर्णा, माजी आ. अनुसया खेडकर, माजी आ.गजानन घुगे, माजी आ. रोहिदास चव्हाण, माजी आ. अमर राजूरकर, माजी आ. प्रकाश देवसरकर आदींची उपस्थिती होती.

## आठवड्यातून एक दिवस 'कोरडा दिवस' पाळण्याचे आवाहन

**नांदेड**-जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख यांनी नांदेड जिल्ह्यातील ग्रामस्थांना दर आठवड्याला एक दिवस 'कोरडा दिवस' पाळण्याचे आवाहन केले आहे. आजारांचा प्रसार होण्याचा धोका वाढला आहे. या पार्श्वभूमीवर दर बुधवारी 'कोरडा दिवस' काटेकोरपणे पाळावा, असे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी दिले आहेत.

## जंगमवाडी येथील मनपा शाळेत शालेय साहित्य वाटप



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ११ सप्टेबर-**

भारतीय जनता पार्टीचे नांदेड दक्षिण विधानसभा अध्यक्ष डॉ. सचिन पाटील उमरेकर यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टीचे क्षितिज जाधव व मित्र परिवाराच्या वतीने जंगमवाडी येथील महानगरपालिकेच्या शाळेत शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

भारतीय जनता पार्टीचे वैद्यकीय आघाडी संयोजक तथा नांदेड दक्षिण विधानसभा अध्यक्ष डॉ. सचिन पाटील उमरेकर यांचा वाढदिवस जंगमवाडी येथील शाळेत उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी बालाजी सूर्यवंशी, मुकुंद धानोरकर, तुलजाराम बागडिया, साईप्रसाद महाजन, कामाजी सरोदे, शिवा लोट, दिनेश यादव, चिद्रावार, गाडीवान यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते तसेच डॉ. सचिन पाटील उमरेकर यांच्या हस्ते महापालिकेच्या शाळेतील प्राथमिक व माध्यमिकच्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी संतोष गवळी, विलास देवके, शिवाजी पांचाळ, किरण भालेराव अरविंद गोधणे, प्रफुल कांबळे, पंकज खाडे, मनोज चिंचोलीकर, सोनू पुंडगे, सादिक शेख, बिकुल खंदारे, अनुराग बावस्कर, पवन जाधव, सुनील दूधमल, यशोदास निखाते माधव खंडागळे, लड्डू खंदारे, जय थोरात, अनिकेत नितळे, सौरभ कदम, संदेश सावतकर आदींनी परिश्रम घेतले.

## किनवट शहरातील विद्युत पुरवठा सुरळीत करा : किरण किनवटकर

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ११ सप्टेबर-**

शहरात गेल्या काही दिवसांपासून विजेचा लपंडाव सुरू असून, वीज वितरण कंपनीचे अधिकारी व कर्मचारी याकडे दुर्लक्ष करत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीपासून आजपर्यंत वारंवार वीज खंडित होत असल्याने शहरातील नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे, शहरातील विद्युत पुरवठा तातडीने सुरळीत करावा, अशी मागणी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष किरण किनवटकर यांनी केली आहे.



नागरिकांकडून वारंवार तक्रारी दाखल करूनही वीजपुरवठ्याचा प्रश्न सुटत नसल्याचे निदर्शनास आले आहे. शहरातील अनेक ठिकाणचे ट्रान्सफॉर्मर व केबल्स जुने झाल्याने त्यांची तातडीने अदलाबदल आवश्यक आहे. नवीन लाईन टाकण्याबाबत वेळोवेळी मागणी केली असली तरी त्याकडे अद्यापही दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे.

डी.पी.वर फ्युज नसणे, ट्रान्सफॉर्मरचा तुटवडा, झाडांची कापणी न होणे, देखभाल कामे टाळणे अशा समस्या कायम असल्याने नागरिक त्रस्त आहेत. देखभालीसाठी नागरिकांकडून नियमितपणे वसुली केली जाते; मात्र प्रत्यक्षात काम होत नसल्याची तक्रारही नागरिकांनी केली आहे. तसेच, शहरी भागातील वीज ग्राहकांच्या तक्रारी नोंदविण्यासाठी असलेले कॉल सेंटर अनेकदा बंद असते. कर्मचारी फोन न उचलल्याने आणि कार्यालयात रात्री कोणतीही व्यवस्था नसल्याने विजेच्या खंडित पुरवठ्यामुळे नागरिकांचे हाल होतात.

स्थानिक अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये समन्वयाचा अभाव असल्याने वीजपुरवठा व्यवस्थापन कोलमडले आहे. नियमितपणे वीज बिले भरूनही ग्राहकांना सुरळीत वीजपुरवठा मिळत नसल्याने लोकांचा संयम सुटत चालला आहे.

दरम्यान, या संदर्भात संपर्क साधला असता किनवट वीज उपविभागाचे अभियंता श्री. नामदेव केंद्रे यांनी सांगितले की, शहरातील वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. येत्या काही दिवसांत परिस्थिती नियंत्रणात आणली जाईल,✻ असे आश्वासन त्यांनी दिले.